अर्थसंवाद

ISSN 0973 - 8452

मनुष्याणाम् वृत्तिरर्थः ।

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

# अर्थसंवाद

भारतीय सौर अश्विन–मार्गशीर्ष 1932
ऑक्टोंबर–डिसेंबर 2010/ खंड 34 अंक 3





- आदर्श गोसेवा आणि अनुसंधान प्रकल्प, म्हैसपूर, जि. अकोला या संस्थेचा आर्थिक अभ्यास
- महाराष्ट्रातील सहकारी साखर उद्योगाची सद्यस्थिती व उपाययोजना
- प्राचीन भारतातील आधुनिक तत्थ्ये : ग्राहक संरक्षणाच्या विशेष संदर्भात
- राष्ट्रीयकृत व खाजगी बँकांच्या ए.टी.एम. सेवा वापरणाऱ्या ग्राहकांच्या समाधानपातळीचा तुलनात्मक अभ्यास
- स्वर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजनेचा लाभार्थींवरील आर्थिक परिणाम
- सुवर्णमहोत्सवी महाराष्ट्रात आदिवासी
- दक्षिण आणियातील (सार्क) आर्थिक एकात्मिकरण
- सांगली जिल्ह्यातील लघु उद्योगांच्या अपयशाच्या कारणांचा अभ्यास
- सातारा व सांगली जिल्ह्यातील मेंढपाळांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचा अभ्यास

लोककल्याणमूलस्य अर्थशास्त्रस्य सिध्दये ।
शोधचर्चाविवादार्थ संवादोऽयं प्रवर्तित: ।।

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

# अर्थसंवाद

मनुष्याणाम् वृत्तिरर्थ:।

www.marthpari.org

ऑक्टोबर – डिसेंबर 2010/खंड 34, अंक 3

प्रमुख संपादक
जगन्नाथ शामराव पाटील

सहायक संपादक
संतोषकुमार बबनराव यादव

सल्लागार मंडळ
(2009-12)
लालासाहेब घाटगे
मोहन चौधरी
शिवाजी अंभोरे
संतोष कदम

संपादकीय पत्रव्यवहार
जगन्नाथ शामराव पाटील
शांती प्लाझा, बी- 9,
880/881, शनिवार पेठ.
सातारा. 415 002
मो.9423261796
फोन:(02162)233152

। अ नु क्र म णि का ।

आदर्श गोसेवा आणि अनुसंधान प्रकल्प, म्हैसपूर, जि. अकोला या संस्थेचा आर्थिक अभ्यास
श्रीकृष्ण राऊत . . . . . 212

महाराष्ट्रातील सहकारी साखर उद्योगाची सद्यस्थिती व उपाययोजना
प्रताप बापूसो लांड . . . . . 222

प्राचीन भारतातील आधुनिक तथ्ये : ग्राहक संरक्षणाच्या विशेष संदर्भात
बी. आर. सोनवणे . . . . . 229

राष्ट्रीयकृत व खाजगी बँकांच्या ए.टी.एम्. सेवा वापरणाऱ्या ग्राहकांच्या समाधानपातळीचा तुलनात्मक अभ्यास
विजय मा. कुंभार . . . . . 236

स्वर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजनेचा लाभार्थींवरील आर्थिक परिणाम
राजेंद्र य. शिंदे . . . . . 244

सुवर्णमहोत्सवी महाराष्ट्रात आदिवासी
मारोती तेगमपुरे . . . . . 256

दक्षिण आशियातील (सार्क) आर्थिक एकात्मिकरण
उषा य. साळुंखे . . . . . 269

सांगली जिल्ह्यातील लघु उद्योगांच्या अपयशाच्या कारणांचा अभ्यास
उल्हास म. माळकर . . . . . 279

सातारा व सांगली जिल्ह्यातील मेंढपाळांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचा अभ्यास
टी.डी. महानवर, जे. एस. चौधरी . . . . . 286

पीएच.डी. प्रबंधाचा सारांश
मंजूषा मुसमाडे . . . . . 295

ग्रंथपरिक्षण : अधिअपसामान्य अर्थशास्त्र
शि. ना. माने . . . . . 298

**मराठी अर्थशास्त्र परिषद**

**कार्यकारी मंडळ(2010-11)**

**अध्यक्ष**

मुक्ता दिगंबर जहागिरदार

**कार्याध्यक्ष**

दिलीप खंडेराव पाटील (सांगली)

**कार्यवाह–खजिनदार**

अनिल बाबुराव सूर्यवंशी (बार्शी)

**प्रमुख संपादक अर्थसंवाद**

जगन्नाथ शामराव पाटील (सातारा)

**विश्वस्त**

ज. फा. पाटील (कोल्हापूर)

के.जी.पठाण (पुणे)

चारूदत्त गोखले (जळगांव)

**सदस्य**

1) हिरालाल चव्हाण(जळगाव)
2) प्रशांत काटोले (अमरावती)
3) अविनाश निकम (शहादा)
4) रामकृष्ण टाले (नागपूर)
5) विकास सुकाळे (नांदेड)
6) ज्ञानोबा मोरे (उस्मानाबाद)
7) महंमद रफिक मुलाणी (पुणे)
8) तानाजी भोसले (सांगली)
9) श्रीरंग मंडले (सिंधुदुर्ग)
10) वनिता चोरे (अमरावती)
11) बाळासाहेब माने (सांगली)
12) शामराव कुलकर्णी (बदलापूर)



**अर्थसंवादसाठी अनुदानाबद्दल आभार :**

1) भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद, दिल्ली

2) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

(टीप : म.रा.सा.सं.मंडळाने अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ आणि राज्य शासन सहमत असेलच असे नाही.)



**कार्यालयीन पत्रव्यवहार**

(आजीव सदस्य नोंदणी, जाहिरात पाठविणे)

अनिल बाबुराव सूर्यवंशी

कार्यवाह – खजिनदार – मराठी अर्थशास्त्र परिषद,

"गोदाई" शिवशक्ती मैदानाजवळ, शिवाजीनगर,

बार्शी 413 411. जि.सोलापूर

दूरध्वनी (02184) 224294 मो. 8805691406

**परिषदेचे प्रमुख कार्यालय :**

मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा / सेंटर फॉर दी स्टडी ऑफ सोशल चेंज, एम.एन.रॉय ह्यूमन डेव्हलपमेंट कँपस प्लॉट क्र.6 एफ. ब्लॉक, कार्डिनल ग्रेशियस स्कूल जवळ, सहकारी वसाहत इमारत क्र. 323 समोर, बांद्रे (पूर्व) मुंबई 400051


**वर्गणी :**

**अ) परिषदेचे सदस्य :**

| | |
|---|---|
| आजीव सदस्य (एकरकमी) | : रू. 2000 |
| साधारण सदस्य | : रू.300 (वार्षिक) |

**आ) संस्था सदस्य व अर्थसंवाद वर्गणीदार**

| | |
|---|---|
| शैक्षणिक संस्था | : रू.250 (वार्षिक) |
| व्यावसायिक संस्था | : रू.600 (त्रैवार्षिक) |
| ग्रंथालये | : रू.1000(पंचवार्षिक) |

**इ) वर्षगणना** 1 एप्रिल ते 31 मार्च

*** संस्थांना आजीव सभासद होता येत नाही.**

*** कृपया आजीव सदस्य वर्गणी डिमांड ड्राफ्टनेच मराठी अर्थशास्त्र परिषद या नावाने कार्यवाहांकडे पाठवावी.**

* अर्थसंवादची वर्गणी डिमांड ड्राफ्टनेच मराठी अर्थशास्त्र परिषद या नावाने प्रमुख संपादकांकडे पाठवावी.

# आदर्श गोसेवा आणि अनुसंधान प्रकल्प, म्हैसपूर, जि. अकोला या संस्थेचा आर्थिक अभ्यास

**श्रीकृष्ण राऊत**
श्री. शिवाजी महाविद्यालय, अकोला

**प्रस्तावना :**

'गावो विश्वस्य मातरः' गायीला विश्वाची जननी म्हणून सन्मानीत केले गेले आहे. भारतामध्ये गाय ही केवळ धार्मिकदृष्ट्याच पूजनीय नाही तर आर्थिकदृष्ट्या ती प्रगतीचा मुख्य स्त्रोत आहे. आपल्या देशातील 63.67 प्रतिशत लोकसंख्या ही शेतीवर अवलंबून आहे आणि शेती ही पूर्णत: गोवंशावर आधारीत आहे. पाश्चात्त्य विचारसरणीचे लोक म्हणतात की, भारतातील जवळ जवळ 19 कोटी गोवंश निकृष्ट आणि देशासाठी भार आहे. हे निश्चित की भारतीय गोवंशाची दूध देण्याची आणि भार वहन करण्याची क्षमता कमी आहे. शेकडो वर्षांपासून त्याकडे दुर्लक्ष झाल्यामुळे हे घडले आहे. परंतु शास्त्रीय संशोधनातून असे निष्पन्न झाले आहे की, भारतीय गायींमध्ये उच्च प्रतीची उत्पादनक्षमता आहे. योग्य काळजी घेतल्यास ती वाढविता येते. भारत सरकारने काही वर्षांपूर्वी भारतीय गोवंशाच्या संरक्षणासाठी एक समिती स्थापित केली होती. त्या समितीच्या अहवालात म्हटले आहे की, ''प्राचीन काळापासून आपल्या अर्थव्यवस्थेत गोवंशाचे विशेष योगदान राहिले आहे. जसे, शेतजमिनीची मशागत करणे, विहिरीतून पाणी ओढणे, ग्रामीण क्षेत्रात वाहतूकीसाठी, मनुष्याला दूध व दुग्धजन्य पदार्थ, शेतीला बैल, खत इत्यादी बाबी देत आहे. भारतीय अर्थव्यवस्थेत गोवंशाचे स्थान अतिशय महत्त्वाचे आहे''.

भारतामध्ये गायीला कामधेनू असे म्हणतात. डेअरी इंडिया, 1987 च्या अहवालानुसार देशातील 49 हजार 'ग्रामीण दुग्ध-उत्पादन सहकारी संस्थांशी संबंधित 50 लाख पेक्षा जास्त परिवार 80 लाख टन दूध विकून आपली उपजिविका चालवितात. भारतीय अर्थव्यवस्थेत पशुधनाचा वाटा 15 कोटी रु. इतका मानला जातो. त्यामध्ये 70 प्रतिशत दूध आणि त्यासंबंधित उत्पादनांचा वाटा आहे. रामेश्वर गोशाळा, वाराणसी येथे गायींच्या सुयोग्य संगोपनाने सिद्ध केले आहे की, 1 लिटर 800 ग्रॅम दूध देणारी गाय 4 लिटर पर्यंत दूध द्यायला लागली आहे. तिचे वासरु 7 लिटर आणि वासराची वासरी 11 लिटर दूध देत आहे. जेथे एका भारतीयाला सरासरी 100 ग्रॅम दूध मिळणे

अशक्य, तेथे सरासरी 500 ग्रॅम दूध सहज शक्य होवू शकते. दूध उत्पादनातून लाखो कुटुंब आपला चरितार्थ चालवू शकतात.

एवढ्या सगळ्या उपलब्धी असताना कत्तल खान्यांमधून गायींची राजरोसपणे कत्तल केली जात आहे. गोसेवा प्रकल्पाच्या स्थापनेमागे आध्यात्मिक कारण आहे. 1986 मध्ये प.पू. श्री. रामचंद्रजी डोंगरे महाराजांना अकोला येथील कार्यकर्त्यांनी 'जीवनात सफल होण्याचा सोपा मार्ग सांगा' असे म्हटल्याबरोबर ते म्हणाले, ''आपण कत्तलीसाठी जाणाऱ्या गायींचे रक्षण करा ती आपल्याला पुढील मार्ग दाखवेल.'' त्यातून जोरकस प्रयत्न सुरु झाले ते गोहत्या थांबविण्यासाठी. अकोला जिल्ह्यातील म्हैसपूर येथे आदर्श गोसेवा आणि अनुसंधान प्रकल्पामध्ये गायीचे शेण, गोमूत्र, गायीचे दूध, दही आणि तूप यांचा वापर करुन विविध आजारांवर उपयुक्त पंचगव्य औषधांची निर्मिती, वनौषधींची निर्मिती आणि दैनंदिन उपयोगी वस्तूंची निर्मिती सुरु झाली आणि हा प्रकल्प सर्व दृष्टींनी प्रगतीपथावर मार्गक्रमण करु लागला.

**गृहितक:**

गोधनाचे संवर्धन आणि संरक्षण झाल्यास समाजाला आणि राष्ट्राला आर्थिक, सामाजिक आणि व्यावसायिक लाभ होईल. तसेच पंचगव्याचा वापर करुन विविध औषधे आणि दैनंदिन जीवनात उपयोगी पडणाऱ्या वस्तूंचे उत्पादन केले जाऊ शकते.

**उद्दिष्टे:**

१.गाय आर्थिक आणि राष्ट्रीयदृष्टया महत्त्वपूर्ण आहे. तेव्हा या संस्थेच्या विविध कार्यांचे अध्ययन करणे.

२.वर्तमान स्थितीमध्ये गोसेवा केंद्राचे सामाजिक, आर्थिक, व्यावसायिक आणि राष्ट्रीय दृष्ट्या महत्त्व अभ्यासणे.

3.कत्तलखान्यामध्ये जाणाऱ्या गायींना पकडून त्यांचे प्रबंधन कसे केले जाते याचे अध्ययन करणे.

4.पंचगव्याद्वारे उत्पादित विविध उत्पादनांचे अध्ययन करणे.

**अभ्यास पद्धती:**

प्रस्तुत शोधनिबंध हा पूर्णपणे दुय्यम साधनसामग्रीवर आधारीत आहे. यामध्ये गोसेवा केंद्राचे प्रत्येक वर्षीचे वार्षिक अहवाल, अंकेक्षित लेखे, कार्यालयीन दस्तऐवज आणि इतर साहित्याचा आधार घेण्यात आला आहे. यामध्ये 2004-05 ते 2008-09 या पाच वर्षांचा अभ्यास करण्यात आला आहे.

**गोसेवा केंद्राची स्थापना:**

श्री रामचंद्रजी डोंगरे महाराजांच्या सूचनेवरुन गोरक्षणाचे कार्य 1987 पासून सुरु झाले आणि ते 1993 पर्यंत सातत्याने सुरु होते. 1993 मध्ये कार्यकर्त्यांद्वारा कत्तलीसाठी जाणाऱ्या गायींना सोडविण्यासाठी न्यायालयात रु 25,000 जमा करण्यात आले. 'आदर्श संस्कार मंडळ' या नावे न्यायालयातून सुपूर्दनामा घेण्यात आला. परंतु या सोडविलेल्या गायी ठेवण्यास कोणतीच गोरक्षण संस्था किंवा एखादा गो प्रेमी तयार न झाल्यामुळे या गायींच्या संगोपनाची आणि पालनपोषणाची समस्या निर्माण झाली. अकोल्याचे सामाजिक कार्यकर्ते स्व. शंकरलाल उर्फ काकाजी खंडेलवाल यांनी आपल्या जन्मदिनी अकोल्यापासून 13 कि.मी. दूर वाशीम रोडवर माधवनगर, म्हैसपूर फाटा येथे दहा एकर जमीन आदर्श संस्कार मंडळाला दान दिली. दि. 14 एप्रिल, 1993 रोजी या प्रकल्पाची मुहूर्तमेढ रोवली गेली. अशा प्रकारे सध्याचा आदर्श गोसेवा आणि अनुसंधान प्रकल्प कार्यरत झाला. प्रकल्पाचे मुख्य प्रशासकीय कार्यालय गांधी रोड, अकोला येथे आहे. तेरा लोक संचालक मंडळात आहेत. त्यामध्ये वकील, अधिव्याख्याते, विविध

व्यावसायिक आहेत. त्यामधून अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, कोषाध्यक्ष निवडले जातात. सचिवांच्या मार्गदर्शनात व्यवस्थापक समस्त कारभार पाहतात. संस्थेच्या संचालनामध्ये गोवत्सलांची भूमिका महत्त्वाची आहे.

संस्थेने केंद्र व राज्य सरकार ची मान्यता प्राप्त केली आहे. त्यामुळे त्यांना केंद्र व राज्य सरकारची मदत उपलब्ध होते. धर्मदाय आयुक्त, अकोला, भारतीय जीवजंतू कल्याण बोर्ड, चेन्नई, खादी आणि ग्रामोद्योग आयोग, भारत सरकार, मुंबई, महाराष्ट्र राज्य गोशाळा, पांजरापोळ संघ, मुंबई, भारतीय गोवंश रक्षण संवर्धन परिषद, नवी दिल्ली या संस्था व इतर अनेक संस्थांद्वारा नोंदणी व मान्यता प्राप्त झाली आहे. परिणामी आयकर कायद्याच्या कलम 80 (G)नुसार संस्थेला मिळणाऱ्या सर्व देणग्या करमुक्त आहेत.

**संस्थेची उद्दिष्टे:**

1)अकोला जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी गो प्रेमी बांधवांच्या मदतीने प्रकल्प स्थापन करणे आणि गायीचे महत्त्व समाजापर्यंत पोहोचविणे.

2) गोरक्षण – कत्तलीसाठी जाणाऱ्या गायींचे रक्षण करणे.

3) गोसंगोपन– गायींचे पालन–पोषण करणे.

4) गोसंवर्धन– गो वंशाच्या विकासासाठी संशोधन, चांगले बैल व सांड यांच्या जाती विकसित करणे.

5) देशी गायीचे दूध, दही, ताक, लोणी, तूप इत्यादींचे उत्पादन वाढविणे.

6) शेतकऱ्यांना उत्तम दर्जाचे नॅडेप, कम्पोस्ट खत उपलब्ध करुन देणे तसेच त्यांच्या उत्पादनाचे प्रशिक्षण वर्ग आयोजित करणे.

7) पंचगव्य– गोमूत्र, गायीचे शेण, गायीचे दूध, गायीचे तूप या द्वारा उत्पादित औषधांमुळे रोगप्रतिकारक शक्ती वाढते. विविध रोग बरे होण्यास या औषधांची मदत होते. त्यांच्याशी निगडीत संशोधन करुन ती माहिती व औषधे जनतेपर्यंत पोहोचविणे.

8) देशी गायींच्या संदर्भात संत–महात्म्यांच्या माध्यमातून धार्मिक जनजागृती करणे.

**संस्थेची कार्ये :**

वरील उद्देशांच्या पूर्तीसाठी संस्था पुढील कार्ये करीत आहे.

1. संस्थेने आलेगाव येथे 33 एकर,तर म्हैसपूर येथे 18 एकर अशी एकूण 51 एकर जमीन खरेदी केली आहे.
2. संस्थेच्या स्थापनेपासून आजतागायत 2000 गायींचे कत्तलीला जाण्यापासून संरक्षण केले. त्यापैकी 1,100 गायींचे विविध संस्था आणि व्यक्तींना वाटप करण्यात आले. उर्वरीत 900 गायींचे संगोपन संस्थेमध्ये केले जात आहे.
3. गायींना विश्राम घेता यावा म्हणून विविध इमारतींचे निवाऱ्यासाठी बांधकाम करण्यात आले आहे. तसेच गायींच्या उष्णशीतरोधक निवाऱ्याचे बांधकाम पूर्ण करण्यात आले आहे.
4. गायीचे शेण आणि गोमूत्रावर संशोधन करुन विविध आरोग्यरक्षक औषधांची निर्मिती करणे व खत निर्मिती करणे.
5. आरोग्यरक्षक औषधे व खत निर्माण प्रशिक्षण वर्गांचे आयोजन केले जाते.
6. स्वस्थ व चांगल्या नक्षत्रावर नवजात बालकांचा जन्म नैसर्गिकरित्या व्हावा म्हणून गर्भवती मातांसाठी सप्त गौ प्रदक्षिणा मंदिर बांधण्यात आले आहे.
7. पाण्याचे पुनर्भरण करुन पाणी पुरवठा व्यवस्थेत वाढ करण्यात आली आहे.
8. आरोग्यरक्षक औषधांच्या उत्पादनासाठी धन्वंतरी भवन बांधण्यात आले आहे. 42 औषधांच्या निर्मितीचे लायसन्स प्राप्त झाले आहेत.

9. पश्चिम विदर्भातील पाच जिल्ह्यांमधील शेतकऱ्यांसाठी जाणीव जागृती शिबिर घेणे तसेच माती, पाणी, सेंद्रीय खत परीक्षण प्रयोगशाळा म्हणून खादी ग्रामोद्योग आयोग, भारत सरकार द्वारे संस्थेची निवड झाली आहे.

10. 13 डिसेंबर,2005 ला जवळ-जवळ 9000 शेतकऱ्यांसाठी जाणीव जागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

11. कॅन्सर या दुर्धर आजारावर पंचगव्यापासून औषध निर्मितीचे प्रयत्न केले जात आहेत.

**आर्थिक विकासाच्या दृष्टीने कार्य:**

महात्मा गांधीजींची विकेंद्रीत अर्थव्यवस्थेची संकल्पना आणि डॉ. कुमारप्पांच्या शाश्वत अर्थव्यवस्थेच्या विचारांनी प्रेरित होवून संस्था कार्य करीत आहे. संस्थेद्वारा पुढील आर्थिक उपक्रम राबविले जातात.

**1. गोग्रास योजना :**

भारतीय संस्कृतीत गोग्रासचे फार महत्त्व आहे. ते लक्षात घेऊन गो वत्सल आणि गो प्रेमी व्यक्तींच्या माध्यमातून ही योजना चालविली जाते. ही योजना पुढीलप्रमाणे:

अ) स्वयंपाकघरात पहिली पोळी गायीसाठी बनवून तिला खाऊ घालणे.

ब) दररोज एक मुठ्ठी पीठ गायीसाठी काढणे व तिला खाऊ घालणे. हे शक्य न झाल्यास,

क) दररोज गोग्रास म्हणून गोशाळेला एक रुपया सदोतीस पैसे याप्रमाणे एक वर्षाचे रु ५००/- दान करणे.

**2. गोचारा योजना :**

या योजनेअंतर्गत व्यक्ती आपला वाढदिवस, लग्नाच्या वाढदिवस प्रसंगी किंवा इतर चांगल्या प्रसंगी संस्थेला रु. 15,000/- देऊन या योजनेत सहभागी होऊ शकते. ही राशी बँकेत फिक्स डिपॉझिट करुन त्यावरील व्याजातून गायींसाठी चारा खरेदी केला जातो.

**3. गोदान:**

भारतीय संस्कृतीमध्ये मृत्यूपूर्वी गोदान करण्याला फार महत्त्व आहे. हे लक्षात घेऊन गोदान योजना सुरु करण्यात आली आहे. ज्या व्यक्तीला गोदान करावयाचे आहे त्याने संस्थेकडे रु २५०१/- जमा करायचे. संस्था ट्रॅक्टरमधून गाय व ब्राम्हण त्या व्यक्तीकडे पाठविते. दानविधी पूर्ण करुन गाय पुन्हा संस्थेमध्ये आणली जाते. दर वर्षी संस्थेकडे या माध्यमातून एक मोठा निधी तयार होतो.

**4. गोवंश रक्षण वर्ग :**

अकोला जिल्ह्यातील कत्तलीसाठी जाणाऱ्या गायींचे रक्षण व्हावे, ग्रामीण भागातील शेतकऱ्यांनी आपले गोधन कसायाला (खाटिक) विकू नये आणि समाजाला गोधनाच्या उपयोगितेची माहिती व्हावी इत्यादी हेतूंनी गोवंश रक्षण वर्गांचे वेळोवेळी आयोजन केले जाते. प्रत्येक तालुक्यातील एका खेड्यातून दहा गोरक्षक या वर्गाला येतात आणि वर्गाचा लाभ घेतात. त्यानंतर आपल्या गावात जाऊन गोरक्षणाचे कार्य करतात. गोवंश रक्षणाचे हे एक प्रभावी साधन आहे. अनेक खेड्यांमधून लोकांनी कसायाला गाय अथवा बैल विकू नये असे ठरावच पारीत केलेले दिसून येतात.

**5. गोपाष्टमी उत्सव:**

संस्थेमध्ये दर वर्षी दिवाळीनंतर कार्तिक शुक्ल अष्टमीला गोपाष्टमीचा उत्सव मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. या दिवशी गोपूजन, गो परिक्रमा आणि गोपाळांच्या पूजेचे विशेष महत्त्व आहे. विश्वामध्ये गोहत्या बंद करण्याच्या उद्देशाने श्रीविष्णूयज्ञाचे आयोजन केले जाते. त्यासाठी मुख्य यजमानपद निर्माण केले जाते. मुख्य यजमान समस्त कार्यांची आर्थिक जबाबदारी स्वीकारतो. लोक यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित राहतात, गो

पूजनासोबतच दान धर्म केला जातो. हा उत्सव आर्थिक उपक्रमाचा एक भाग आहे.

**6. मकर संक्रांत:**

आपल्याकडे दरवर्षी १४ जानेवारीला मकर संक्रांत साजरी केली जाते. या दिवशी गाईचे पूजन आणि दान याला विशेष महत्त्व आहे. धार्मिक वृत्तीचे लोक मकरसंक्रांतीला गोपूजन करतात व दान धर्म करतात. या माध्यमातूनही वस्तू रुपात आणि आर्थिक स्वरुपात मोठी देणगी मिळते.

**7. वनौषधींचा विकास:**

संस्थेने स्वत:चे वनौषधी उद्यान स्थापन केले आहे. ज्यामध्ये विविध प्रकारच्या वनौषधींची लागवड करुन संवर्धन केले जाते. त्यापासून औषधी तयार करुन त्यांची विक्री केली जाते. संस्था विशेष रोगांवर उपचारासाठी मोफत रोग निदान शिबिरे आयोजित करते. त्यामध्ये गायीचे दूध, गायीचे तूप, गोमूत्र, गायीचे शेण आणि वनौषधींचा उपयोग केला जातो. परिणामी अनेक लोकांना आराम मिळतो. पुढे हेच लोक पंचगव्य निर्मित औषधींचा आणि वनौषधींचा नियमित उपयोग करतात व त्याचा प्रचार आणि प्रसारही करतात.

**8. धन्वंतरी उत्पादने :**

गायीचे शेण, गोमूत्र, गायीचे दूध, गायीचे दही आणि तूप या पंचगव्यांचा वापर करुन सद्यपरिस्थितीमध्ये या ठिकाणी ४२ औषधांचे उत्पादन केले जाते. पंचगव्य चिकित्सा पद्धतीमध्ये आधुनिक विज्ञान आणि प्राचीन दिव्य ज्ञानाचा समन्वय साधला गेला आहे. तज्ज्ञ वैद्यांची चमू औषध उत्पादनाच्या कार्यात कार्यरत आहे. गोमूत्र आसव, कपिला हरडे चूर्ण, कुष्टहर लेप, कपिला इसब लेप वडी, जात्यादी घृत, चंदनादी यमक इत्यादी अनेक उपयुक्त औषधे उत्पादित केली जातात. तसेच दैनंदिन उपयोगाच्या काही वस्तूंचे उत्पादन करुन त्याची विक्री केली जाते. जसे कपिला दंतमंजन, कपिला शाम्पू, गोविश्वदेव धूप, कपिला फिनाईल, कपिला आफ्टर शेव्ह, कपिला बिफोर शेव्ह, नॅडेप कम्पोस्ट खत, वर्मी कम्पोस्ट इत्यादी.

**९. ग्रामीण रोजगार :**

संस्थेमध्ये ५० ते ६० ग्रामीण भागातील युवक आणि महिलांना रोजगार प्राप्त झाला आहे. या ठिकाणी शेतीची कामे, गो संगोपन, गो संवर्धन, पंचगव्य औषधींचे उत्पादन, वृक्षारोपण, वेदविज्ञान आश्रमशाळा, बांधकाम, कंपोस्ट खताचे उत्पादन इत्यादी विभागांमधून हे लोक काम करतात.

संस्थेची ही सर्व कार्ये पाहून भारत सरकारच्या ग्रामीण विकास मंत्रालयाअंतर्गत येणाऱ्या भारतीय जीवजंतू कल्याण बोर्ड, चेन्नई द्वारे प्रकल्पाला मान्यता प्रदान करण्यात आली असून एका मॉडेल गोशाळेचा दर्जा देण्यात आला आहे. खादी आणि ग्रामोद्योग आयोग भारत सरकारद्वारा येथे आयोजित प्रशिक्षण वर्गांना विशेष आर्थिक मदत प्रदान करण्यात येते.

तक्ता क्र.1

संस्थेचे उत्पन्नाचे स्त्रोत रू.

| विवरण | 2004-05 | 2005-06 | 2006-07 | 2007-08 | 2008-09 |
|---|---|---|---|---|---|
| भाडे | 75,000 | 75,000 | 75,000 | 75,000 | 75,000 |
| बँकेतील ठेवीवर व्याज | 35,376 | 53,860 | 29,051 | 35,533 | 52,254 |
| गोग्रास आणि इतर देणग्या | 9,48,992 | 8,59,432 | 11,54,329 | 16,25,642 | 21,68,730 |
| प्राणी कल्याण बोर्ड, चेन्नई | – | 5,08,670 | - | - | - |
| इतर साधनांपासून उत्पन्न | - | - | 1,27,861 | 10,199 | 2,97,221 |
| पंचगव्य औषधींपासून उत्पन्न | 5,58,263 | 4,78,943 | 5,85,537 | 6,61,525 | 5,32,633 |
| लाभांश | - | - | - | - | 70 |
| दूधापासून उत्पन्न | 75,238 | 1,21,983 | 97,201 | 14,880 | - |
| एकूण उत्पन्न | 16,92,869 | 20,97,888 | 20,68,979 | 24,22,779 | 31,25,908 |

(स्त्रोत : वार्षिक अहवाल सन ते सन )

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की, संस्थेला दर वर्षी रु. भाड्यापासून प्राप्त होतात. संस्थेचे एक गोदाम आहे. त्यामध्ये व्यापारी, स्थानिक शेतकरी आपला माल ठेवतात आणि त्यापासून भाडे प्राप्त होते. भाड्यापासून मिळणारे उत्पन्न स्थिर आहे. च्या तुलनेत मध्ये बँकेतील ठेवीवर मिळालेले व्याज रु. इतके जास्त आहे. परंतु मध्ये त्यात घट आलेली आहे. आणि मध्ये पुन्हा ठेवीवरील व्याजापासूनच्या उत्पन्नात हळूहळू वाढ झाली आहे. गोग्रास आणि इतर देणग्या 2004-05 च्या तुलनेत मध्ये रु. ने कमी झाल्या आहेत. परंतु पासून त्यात सातत्याने वाढच झालेली दिसून येते. 2006-07, 2007-08 आणि मध्ये अनुक्रमे रु. रु. 4,71,313 आणि रु. 5,43,088 इतकी शुध्द वाढ झाली आहे. पंचगव्य औषधांपासून मिळणाऱ्या उत्पन्नात देखील वाढ होतांना दिसून येते. मात्र आणि मध्ये त्यात थोडी घट झालेली निदर्शनास येते. संस्थेला दुधापासून सुध्दा उत्पन्न मिळते. मात्र मध्ये उत्पन्नापेक्षा खर्च जास्त असल्याने दुधापासूनचे उत्पन्न दिसून येत नाही. संस्थेच्या एकूण उत्पन्नात भरघोस वाढ होतांना आढळून येते. परंतु, 2006-07 मध्ये 2005-06 च्या तुलनेत रु. 28,909 ने एकूण उत्पन्न कमी झाले आहे. 2007-08 मध्ये पुन्हा रु. 3,53,800 आणि 2008-09

मध्ये रु. 7,03,129 ने एकूण उत्पन्नात शुद्ध वाढ झाली आहे. एकंदरीत संस्थेच्या उत्पन्नाच्या स्त्रोतांमध्ये निरंतर वाढ होत आहे असे लक्षात येते.

**तक्ता क्र.2**

**संस्थेचे खर्चाचे स्त्रोत**

रू.

| विवरण | २००४-०५ | २००५-०६ | २००६-०७ | २००७-०८ | २००८-०९ |
|---|---|---|---|---|---|
| संपत्तीशी संबंधित खर्च | 3,45,044 | 4,01,052 | 4,19,645 | - - | |
| इमारत देखभाल आणि दुरुस्ती खर्च | - | 18,970 | 24,146 | 2,485 | 22,507 |
| प्रशासकीय खर्च | 32,417 | 25,489 | 4,80,295 | 3,65,781 | 4,04,027 |
| घसारा | 3,50,917 | 4,74,070 | 5,75,987 | 6,80,475 | 7,47,631 |
| ट्रस्टच्या उद्देशपूर्ती साठीचा खर्च | 9,55,527 | 10,81,538 | 5,52,965 | 9,48,111 | 12,53,364 |
| अंशदान आणि शुल्क | - | - | - | 39,927 | - |
| औषध खरेदी व स्थापना खर्च | - | - | - | 27,680 | 93,323 |
| प्रशिक्षण खर्च | - | - | - | 3,170 | 7,597 |
| एकूण खर्च | 16,83,959 | 20,01,119 | 20,53,080 | 20,67,629 | 25,28,449 |

(स्त्रोत : वार्षिक अहवाल सन 2004-05 ते सन 2008-09)

संस्थेच्या खर्चाच्या स्त्रोतांचा विचार केल्यास असे निदर्शनास येते की, 2003-04 ते 2005-06 या वर्षामध्ये संपत्तीशी संबंधित खर्च झाला आहे आणि 2007-08 आणि 2008-09 मध्ये हा खर्च दिसून येत नाही. प्रशासकीय खर्चामध्ये चढ उतार होतांना दिसून येते. परंतु घसाऱ्याचा खर्च दर वर्षी वाढतच गेल्याचे लक्षात येते.2004-05 मध्ये घसाऱ्याची एकूण राशी रु. 3,50,917 इतकी आहे. तर 2008-09 मध्ये ही राशी रु. 7,47,631 इतकी आहे. या पाच वर्षाच्या काळात घसाऱ्याच्या राशीमध्ये रु.3,96,714 इतकी वाढ झाली आहे. ट्रस्टच्या उद्देशपूर्तीसाठीचा खर्च 2004-05 च्या तुलनेत 2005-06 मध्ये रु. 1,26,011 ने जास्त झाला आहे. परंतु 2006-07 मध्ये एकूण ट्रस्टच्या खर्चात रु. 5,28,573 इतकी जास्त घट झालेली दिसून येते. 2007-08 आणि 2008-09 मध्ये पुन्हा ट्रस्टच्या उद्देश पूर्तीसाठीच्या खर्चात वाढ झालेली आहे. संस्थेच्या एकूण खर्चाचा आढावा घेतल्यास असे लक्षात येते की, त्यामध्ये सातत्याने वाढ होत आहे. 2004-05 मध्ये एकूण खर्च रु. 16,83,959 इतका झाला आहे, तर 2008-09 मध्ये एकूण खर्च रु.25, 28,449 इतका झाला आहे. एकूण खर्चामध्ये पाच वर्षात तब्बल रु.8,44,490 इतकी वाढ झाली आहे.

**तक्ता क्र.3**
**संपत्तीचे विवरण**

रू.

| विवरण | 2004-05 | 2005-06 | 2006-07 | 2007-08 | 2008-09 |
|---|---|---|---|---|---|
| चल संपत्ती | 1,65,221 | 1,63,587 | 3,81,102 | 3,33,458 | 6,52,758 |
| बँकेच्या भागात गुंतवणूक | 500 | 500 | 500 | 500 | 500 |
| जीवंत स्कंध | 5,83,730 | 7,61,280 | 9,45,130 | 10,13,730 | 10,46,630 |
| अंतिम स्कंध | 1,40,742 | 86,752 | 2,41,095 | 2,12,520 | 284,290 |
| अधमर्ण | 4,40,283 | 3,27,875 | 2,80,009 | 3,04221 | 1,93,138 |
| रोख राशी आणि बँकेत जमा राशी | 4,82,840 | 4,73,084 | 5,28,273 | 5,84,378 | 7,79,434 |
| जमा ठेवी | 34,570 | 34,570 | 34,570 | 34,570 | 35,070 |
| कृषी जमीन | 3,06,257 | 3,43,257 | 3,43,257 | 3,43,257 | 3,43,257 |
| इमारत आणि पाण्याची पाईप लाईन तसेच गार्यींचा निवारा | 29,17,941 | 47,72,233 | 57,31,302 | 62,92,499 | 60,54,783 |
| अदत्त भाडे | - | - | - | - | 75,000 |
| एकूण संपत्ती | 50,72,084 | 69,63,138 | 84,85,238 | 91,19,123 | 94,64,860 |

(स्त्रोत : वार्षिक अहवाल सन 2004-05 ते सन 2008-09)

संस्थेकडील संपत्तीचा आढावा घेतल्यास असे लक्षात येते की, संस्थेकडे असलेल्या चल संपत्तीमध्ये सातत्याने वाढ होत आहे. 2004-05 मध्ये रु. 1,65,221 ची चल संपत्ती होती.तर 2008-09 मध्ये रु. 6,52,758 इतकी चल संपत्ती आहे. एकूण चल संपत्तीत रु. 4,87,537 इतकी वाढ झाली आहे. संस्थेचा जीवंत स्कंध म्हणजे गाय, बैल, वासरु आणि सांड होत. या जीवंत स्कंधामध्ये सुध्दा निरंतर वाढ होतांना दिसून येते. 2004-05 मध्ये रु.5,83,730 इतका जीवंत स्कंध दिसून येतो. तर 2008-09 मध्ये रु. 10,46,630 इतका जीवंत स्कंध दिसून येतो. जीवंत स्कंधात एकूण रु. 4,62,900 इतकी वाढ झालेली आहे. ही वाढ जवळ जवळ पन्नास प्रतिशत इतकी आहे. 2004-05 मध्ये संस्थेचे अधमर्ण खूप जास्त आहेत. परंतु 2008-09 मध्ये संस्थेचे अधमर्ण खूप कमी झालेले दिसून येतात. संस्थेजवळील कृषी जमीन स्थिर आहे असे दिसून येते. संस्थेची इमारत, गार्यींचा निवारा आणि पाण्याची पाईपलाईन ही संपत्ती सातत्याने वाढतच गेलेली दिसून येते. 2004-05 मध्ये ही संपत्ती रु.29,17,941 इतकी आहे तर 2008-09 मध्ये रु. 60,54,783 इतकी आहे, त्यात एकूण रु. 31,36,842 इतकी वाढ झाली आहे. 2004-05 च्या तुलनेत झालेली ही वाढ

107 प्रतिशत इतकी आहे. संस्थेच्या एकूण संपत्तीचा विचार केल्यास त्यामध्ये दर वर्षी वाढ होत गेली असे आढळून येते. 2004-05 मध्ये एकूण संपत्ती ही रु. 50,72,083 इतकी आहे.तर 2008-09 मध्ये एकूण संपत्ती रु. 94,64,860 इतकी आहे. एकूण संपत्तीत झालेली वाढ ही 86.61 प्रतिशत इतकी जास्त आहे. यावरुन संस्थेची प्रगती ही निरंतर होत आहे असे म्हटल्यास वावगे ठरु नये.

**तक्ता क्र.4**

**देयतांचे विवरण** रू.

| विवरण | 2004-05 | 2005-06 | 2006-07 | 2007-08 | 2008-09 |
|---|---|---|---|---|---|
| अदत्त देयता | 5,544 | 16,593 | 12,373 | 19,071 | 15,575 |
| उत्तमर्ण | 617 | 12,226 | 1,34,720 | 30,750 | 45,057 |
| न्यास (ट्रस्ट) निधी | 64,151 | 64,151 | 64,151 | 64,151 | 64,151 |
| गाय न्यास निधी | 5,19,600 | 6,37,400 | 7,81,700 | 8,08,300 | 8,16,400 |
| इमारत निधी | 43,69,480 | 60,23,307 | 70,51,422 | 77,02,424 | 79,34,425 |
| उत्पन्नाचे खर्चावरील आधिक्य | 1,12,692 | 2,09,461 | 2,49,547 | 3,03,103 | 3,67,928 |
| इतर निधी | - | - | 1,91,325 | 1,91,324 | 1,91,324 |
| ठेवी | - | - | - | - | 30,000 |
| एकूण देयता | 50,72,084 | 69,63,138 | 84,85,238 | 91,19,123 | 94,64,860 |

(स्रोत : वार्षिक अहवाल सन 2004-05 ते सन 2008-09)

संस्थेच्या देयतांचा आढावा घेतल्यास असे आढळून येते की, अदत्त देयता आणि उत्तमर्ण यांच्या राशीत चढ उतार होत आहेत. गाय न्यास निधी मध्ये सातत्याने वाढ होत आहे. 2004-05 मध्ये रु.5,19,600 असलेला गाय न्यास निधी 2008-09 मध्ये रु.8,16,400 इतका झाला आहे. इमारत निधी मध्ये सुद्धा वाढ झालेली आहे. 2004-05 मध्ये हा निधी रु.43,69,480 इतका आहे. तर 2008-09 मध्ये रु. 79,34,425 इतका आहे. उत्पन्नाचे खर्चावरील आधिक्याचा विचार केल्यास हे आधिक्य सतत वाढत आहे. 2004-05 मध्ये हे आधिक्य रु. 1,12,692 इतके, तर 2008-09 मध्ये रु. 3,67,928 इतके आहे. यात झालेली वाढ ही 226.49 प्रतिशत इतकी आहे. संस्थेची उलाढाल वाढत गेल्याने नफ्याचे प्रमाण वाढत गेले हे स्पष्ट होते. एकूण देयतांमध्ये निरंतर वाढ होत आहे. 2004-05 मध्ये रु.50,72,084 तर 2008-09 मध्ये रु.94,64,860 इतक्या देयता आहेत. 2004-05 ते 2008-09 या पाच वर्षात देयतांमध्ये रु. 43,92,776 इतकी वाढ झाली आहे.

## निरीक्षणे व नोंदी:

आदर्श गोसेवा आणि अनुसंधान प्रकल्प, म्हैसपूर फाटा, ता.जि. अकोला हा भारत सरकारद्वारा

मान्यता प्राप्त आहे. याठिकाणी गायींचे संरक्षण आणि संवर्धन केले जाते. ग्लोबल वॉर्मिंगच्या संकटामुळे पावसाचे प्रमाण कमी झाले आहे. शेतकऱ्यांपुढे गुरा-ढोरांच्या चाऱ्याची व पिण्याच्या पाण्याची समस्या आ वासून उभी आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढल्या आहेत. त्यांना आपल्या गुराढोरांना कत्तलखान्याला व खाटिकाला विकण्याशिवाय पर्याय उरला नाही. अशा काळामध्ये ही संस्था एक मॉडेल संस्था म्हणून पुढे आली आहे. येथे गोवंशाच्या रक्षणासाठी प्राधान्य दिले जात आहे. त्याकरिता धार्मिक अधिष्ठिनासोबतच संशोधनात्मक दृष्टिकोनही विकसित केला गेला आहे. जिल्ह्यातील शेतकरी बांधव व इतरांसाठी येथे विविध विषयांवर प्रशिक्षण व व्याख्यानांचे आयोजन केले जाते. येथे गायीचे भारतीय अर्थव्यवस्थेतील महत्त्व तर सांगितले जातेच; शिवाय तिच्या संगोपनामागील वैज्ञानिक दृष्टिकोनही सांगितला जातो. उदा. गायीचे गोमूत्र जमिनीवर पडून त्याची जी धूप होते, त्यामुळे ओझोनच्या थराला पडलेले भगदाड कमी होण्यास मदत होते हे सांगितले जाते. गायीचे शेण, गोमूत्र, दूध, दही आणि तूप यापासून पंचगव्य औषधांच्या उत्पादनासाठी धन्वतरी भवन उभारण्यात आले आहे. येथे वनौषधी व पंचगव्यांचा वापर करुन 42 प्रकारची औषधी व दैनंदिन उपयोगाच्या वस्तू तयार केल्या जातात. या भागातील लोकांना चांगल्या दर्जाच्या वस्तू माफक किंमतीत उपलब्ध तर होतातच; शिवाय रोजगाराच्या संधीही उपलब्ध होतात. संस्थेच्या सततच्या जनजागृती अभियानामुळे अनेक खेड्यांमधून गायी खाटिकाला व कत्तलखान्याला न विकण्याचा निर्धार शेतकऱ्यांनी केला आहे. लोकांना गायींचे संगोपन करणे शक्य झाले नाही.तर ते संस्थेकडे आणून देतात. संस्था कोणालाही याबाबतीत नकार देत नाही. प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी असलेल्या शाखेमध्ये आलेल्या गायींना समायोजित केले जात आहे. अनेक गोवत्सल व गोप्रेमी व्यक्ती पुढे येवून संस्थेला तन, मन आणि धनाने मदत करतात. संस्था गो अकादमी स्थापन करु इच्छिते. ज्या माध्यमातून शिक्षण व प्रशिक्षण देऊन लोकांना रोजगार व स्वयंरोजगार उपलब्ध करुन देण्याचा संस्थेचा मानस आहे. इतरेजनांनी संस्थेकडे धर्म व राजकारणाच्या दृष्टीने न बघता आर्थिक कारणाच्या दृष्टीने बघितल्यास ''आदर्श गोसेवा आणि अनुसंधान प्रकल्प'' एक आदर्श उदाहरण म्हणून सांगता येईल. एकविसाव्या शतकामध्ये ही संस्था निश्चितच नावारुपाला येईल.

# महाराष्ट्रातील सहकारी साखर उद्योगाची सद्यस्थिती व उपाययोजना

**श्री. प्रताप बापूसो लाड**
अधिव्याख्याता, क्रांतीअग्रणी जी. डी. बापू लाड
महाविद्यालय, कुंडल, जि सांगली
भ्रमणध्वनी. 9766327181

**प्रस्तावनाः-**

महाराष्ट्रातील साखर उद्योग हा आर्थिक, सामाजिक आणि राजकीय दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा उद्योग आहे. सहकारी साखर कारखान्यांनी महाराष्ट्रामध्ये उल्लेखनीय कामगिरी केली आहे. ग्रामीण भागात पाणीपुरवठा संस्था, पतपुरवठा संस्था, दुध उत्पादक संस्था इ. शेतीशी निगडीत सहकारी संस्था निर्माण झाल्या आहेत.त्याचबरोबर महाराष्ट्रात सहकारी कारखानदारीमुळे अल्कोहोल, वीज निर्मिती, कागद, ॲसिड, पशुखाद्य, मिठाई हे पदार्थ, खत उद्योग, इत्यादी उद्योगामुळे ग्रामीण भागाचा विकास होण्यास हातभार लागला आहे. मात्र बदलत्या स्पर्धात्मक वातावरणात सहकारी साखर उद्योग अडचणीत सापडला आहे. साखरेची किमान वैधानिक किंमत, केंद्र आणि राज्य सरकारचे नियंत्रण मुक्त धोरण यामुळे सहकारी साखर कारखानदारी अधिकच अडचणीत येत आहे. सहकारी साखर उद्योगाच्या विकासासाठी शासनाने आपल्या आर्थिक धोरणामध्ये बदल करुन साखर उद्योगाच्या विकासासाठी प्रोत्साहन दिले पाहिजे. प्रस्तुत शोध निबंधामध्ये महाराष्ट्रातील सहकारी साखर उद्योगाची सद्यस्थितीचा अभ्यास व त्यावरील उपाययोजना इत्यादींचा आढावा घेण्यात आला आहे.

**महाराष्ट्रातील सहकारी साखर उद्योगाचा इतिहासः**

महाराष्ट्रात सर्वप्रथम 1919 मध्ये ब्रिटिशांनी पहिला साखर कारखाना अहमदनगर जिल्हयात हरेगांव येथे सुरु केला. त्यानंतर सहकारी क्षेत्रामध्ये साखर कारखाना उभारणीची कल्पना सन 1912 मध्ये श्री. आर. एन्. हिरेमठ आणि जी. एन्. सहस्त्रबुध्दे यांनी मांडली. या कल्पनेला मूर्त स्वरुप देण्याचे काम सहकार तज्ज्ञ लल्लूभाई समळदास आणि जी. एन. सहस्त्रबुध्दे यांनी केले. त्यांनी 1918 मध्ये 'दि निरा व्हॅली सहकारी साखर कारखाना' या

नावाने महाराष्ट्रातील पहिला सहकारी साखर कारखाना पुणे जिल्हयातील बारामती येथे सुरु केला. पुढे हा कारखाना बंद पडला. सन 1933 ते 1934 या कालावधीमध्ये सहा नवीन कारखाने निघाले. त्यानंतर 1941 पर्यंत महाराष्ट्रात 12 साखर कारखाने कार्यरत होते. सन 1950 मध्ये सहकार महर्षी डॉ. विठ्ठलराव विखे-पाटील यांनी अहमदनगर जिल्हयातील लोणी याठिकाणी प्रवरा सहकारी साखर कारखाना सुरु केला. हा साखर कारखाना महाराष्ट्रातील सहकारी साखर उद्योगाला स्फूर्तिस्थान ठरला. त्यानंतर दुसरा सहकारी साखर कारखाना सांगली येथे 'पद्मभूषण वसंतदादा पाटील यांनी शेतकरी सहकारी साखर कारखाना स्थापन करुन महाराष्ट्रातील साखर उद्योगाला प्रोत्साहन दिले.

महाराष्ट्रात सन 1950 ते 1955 या कालावधीमध्ये एकूण 15 कारखाने साखर उत्पादन करीत होते. त्यापैकी सहकारी क्षेत्रामध्ये दोन कारखाने होते. त्यानंतर सहकारी साखर उद्योगाची वेगाने वाढ होत गेली. आर्थिक सुधारणांच्या कालावधीमध्ये (1994-95) महाराष्ट्रात एकूण 107 साखर कारखाने होते. त्यापैकी 104 सहकारी साखर कारखाने कार्यरत होते. अलीकडे सन 2006-07 या वर्षामध्ये महाराष्ट्रात एकूण नोंदणीकृत 202 कारखाने होते. त्यापैकी 163 साखर उत्पादनात होते. तर यांतील 141 सहकारी क्षेत्रातील साखर कारखाने साखर उत्पादन करीत होते.

**महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्यांची साखर उत्पादनाची स्थिती:**

महाराष्ट्रात मार्च 2005 अखेर 202 साखर कारखाने नोंदणीकृत होते. त्यापैकी 101 साखर कारखाने कार्यरत होते. या वर्षामध्ये 84 सहकारी साखर कारखाने उत्पादन करीत होते. या सहकारी साखर कारखान्याने 3.24 लाख मे. टन ऊस गाळप करुन 204 लाख मे. टन. साखर उत्पादन केले होते. अलीकडील काळातील महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्यांची साखर उत्पादन क्षमता पुढील कोष्टकात दर्शविली आहे.

**महाराष्ट्रातील साखर उत्पादन (सन 2000-01 ते 2006-07)**

| | वर्ष | ऊस गाळप (लाख मे.टन) | | साखर उत्पादन (लाख मे.टन) | | सरासरी साखर उतारा | वार्षिक गाळप क्षमता |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | सहकारी | एकूण | सहकारी | एकूण | टक्के | टक्के |
| 1 | 2000-01 | 556.52 | 576.55 | 64.76 | 67.05 | 11.63 | 88 |
| 2 | 2001-02 | 459.61 | 483.86 | 53.42 | 56.12 | 11.60 | 98 |
| 3 | 2002-03 | 505.74 | 534.73 | 58.95 | 62.21 | 11.63 | 86 |
| 4 | 2003-04 | 272.18 | 290.76 | 29.75 | 31.74 | 10.92 | 81 |
| 5 | 2004-05 | 180.69 | 194.28 | 20.87 | 22.33 | 11.49 | 63 |
| 6 | 2005-06 | 414.96 | 445.79 | 48.59 | 51.97 | 11.66 | 86 |
| 7 | 2006-07 | 732.28 | 798.38 | 83.53 | 90.95 | 11.39 | 93 |

संदर्भ:www.mahasuggrfed.org

वरील कोष्टकात असे दिसून येते की, महाराष्ट्रातील सन 2000-01 या वर्षामध्ये एकूण 576.55 लाख मे. टन एवढे ऊस गाळप होते. त्यापैकी सहकारी साखर कारखान्यांनी 556.52 लाख मे. टन ऊस गाळप केले होते व महाराष्ट्रातील एकूण साखर उत्पादन 67.05 लाख मे.टन होते. त्यापैकी 64.76 लाख मे. टन साखर उत्पादन सहकारी साखर कारखान्यांनी केले होते. या वर्षामध्ये सरासरी साखर उतारा 11.63 टक्के इतका होता, तर वार्षिक गाळप क्षमता 88 टक्के होती. त्यानंतर सन 2004-05 मध्ये महाराष्ट्रातील एकूण ऊस गाळप 194.28 लाख मे. टन एवढे कमी झाले होते. त्यापैकी 180.69 लाख मे. टन ऊस गाळप सहकारी साखर कारखान्यांनी केले होते. या वर्गामध्ये महाराष्ट्रातील एकूण साखर 22.33 लाख मे.टन होते. त्यापैकी 20.87 लाख मे. टन. साखर उत्पादन सहकारी साखर कारखान्यांनी केले होते. वर्षातील साखर उतारा 11.49 टक्के होता. तर वार्षिक गाळप क्षमता 63 टक्के एवढी कमी झाली होती.

सन 2006- 07 मध्ये महाराष्ट्रातील एकूण ऊस गाळप 798.38 लाख मे. टन एवढे झाले होते. त्यापैकी 732.28 लाख मे.टन ऊस गाळप सहकारी साखर कारखान्यांनी केले होते. या वर्षामध्ये महाराष्ट्रातील एकूण साखर 90.95 लाख मे. टन होते. त्यापैकी 83.53 लाख मे. टन. साखर उत्पादन सहकारी साखर कारखान्यांनी केले होते. वर्षातील साखर उतारा 11.39 टक्के होता. तर वार्षिक गाळप क्षमता 93 टक्के एवढी झाली होती.

महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्यांची साखर उत्पादन क्षमता वाढत असल्याचे दिसून येते. सन 2000-01 या वर्षामध्ये महाराष्ट्रातील 128 सहकारी साखर कारखान्यांनी 64.76 लाख मे. टन. साखर उत्पादन केली होती. त्यानंतर सन 2004-05 पर्यंत साखर उत्पादनात घट होऊन ती 20.87 मे. टन. एवढी झाली. त्यानंतर सन 2006-07 या वर्षामध्ये महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्यांनी 83.53 लाख मे. टन साखर उत्पादन केल्याचे दिसून येते.

यावरुन असे दिसून येते की, अलीकडील काळात महाराष्ट्रातील साखर कारखान्यांची गाळप क्षमता व साखर उत्पादन क्षमता वाढल्याचे दिसून येते. मात्र सन 2004-05 या वर्षामध्ये ऊस गाळप व साखर उत्पादन घटण्याचे कारण म्हणजे महाराष्ट्रात या वर्षामध्ये दुष्काळ मोठया प्रमाणात होता. त्यामुळे ऊस लागवडीचे क्षेत्र कमी होऊन ऊस कमतरतेमुळे ऊस गाळप कमी झाल्याचे दिसून येते. या कालावधीमध्ये महाराष्ट्रात 46 कारखाने ऊसा अभावी बंद अवस्थेत होते.

**महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्यांची सद्यस्थिती:**

अलीकडील बदललेल्या महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्यांनी वेगाने प्रगती केली असली तरी जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे शासनाकडून होणाऱ्या मदतीचे प्रमाण कमी होत आहे. त्यामुळे सहकारी साखर कारखानदारीच्या समोर अनेक आव्हाने निर्माण झाली आहेत. ती आव्हाने पेलण्यासाठी महाराष्ट्र शासन काही प्रमाणात मदत करीत असले तरी सहकारी साखर कारखान्यांच्या काही समस्या गंभीर आहेत. त्या समस्यांची चर्चा करणे आवश्यक आहे.

**1)किमान वैधानिक किंमत:**

सन 1966 च्या ऊस नियंत्रण कायदयानुसार केंद्र सरकार प्रत्येक हंगामासाठी

ऊसाची वैधानिक किंमत ठरवून देते. ही किंमत सरकारच्या कृषि मूल्य आयोगाच्या शिफारशीवर अवलंबून असते. या आधारभूत किंमतीचा हेतू सामान्य शेतकऱ्यांना ऊसाच्या दराची हमी आणि साखर उत्पादनासाठी कारखान्यांना नवीन तंत्रज्ञान स्वीकारण्यासाठी चालना देण्यासाठी आहे. तथापि ही आधारभूत किंमत ऊस लागवडी पूर्वी घोषित होणे आवश्यक असते. परंतु शासन किमान वैधानिक किंमत उशिरा घोषित करते आणि त्याचा परिणाम ऊस लागवडीवर आणि साखर उत्पादनावर होतो. ऊस नियंत्रण कायदयानुसार ऊसाची आधारभूत किंमत ठरवित असताना काही बाबी विचारात घेणे आवश्यक आहे. त्या म्हणजे ऊस उत्पादन व त्याची किंमत इतर वस्तूंच्या किंमती, ऊसाचा सरासरी साखर उतारा, तयार साखरेची किंमत व बाजारपेठेतील साखरेची उपलब्धता या बाबी विचारात घेऊन शासनाने किमान वैधानिक किंमत ठरविणे गरजेचे आहे.

सन 2000-01 मध्ये ऊसाचा किमान वैधनिक दर प्रती क्विंटल 59.05 इतका होता तर 2007-08 मध्ये 81.18 प्रती क्विंटल असा होता. त्यानंतर सन 2008-09 मध्ये देखील किमान वैधनिक दर 81.18 हा कायम राहिल्याचे दिसून येते. ऊसाच्या वैधनिक दरामध्ये फारशी वाढ झाल्याचे दिसून येत नाही. मात्र शेतकऱ्यांचा ऊस उत्पादनाचा खर्च वेगाने वाढत आहे.

ऊसाचा किमान वैधनिक दर ठरविताना ऊसाची लागवड, खते, मशागत, पाणी, औषधे, किटकनाशके इत्यादी ऊस उत्पादन खर्चाचा विचार करुन कृषिमूल्य आयोगाकडमन ऊसाची किमान वैधनिक किंमत ठरविण्यात येत होती. मात्र अलीकडे साखर उद्योग नियंत्रण मुक्त करण्यासाठी केंद्र सरकारने नवीन विधेयक आणले आहे. या विधेयकानुसार सध्याच्या किमान वैधानिक दराची जागा वाजवी किफायतशीर किंमत (F.R.P.) घेत आहे. या विधेयकानुसार केंद्राने प्रतीक्विंटल 129.84 रु. प्रती क्विंटल वाजवी किफायतशीर किंमत ठरविली आहे. साखर उताऱ्याच्या वाढीसाठी 4 टक्के साखर उताऱ्यावर किमान वैधनिक दर हा 9.5 टक्केपर्यंत वाढविण्याचे ठरविले आहे. म्हणजेच ऊसाची वाजवी किंमत ठरविताना साखर उतारा हे पुर्वीप्रमाणे निश्चित करणे आवश्यक आहे.

**2) सहवीज निर्मिती व कारखाने :**

महाराष्ट्रातील सध्याची वीज निर्मिती क्षमता व वीजेचा वापर यामध्ये प्रचंड तफावत आहे. 5000 ते 6000मे. वॅट एवढा वीज तुटवडा आहे. म्हणून सध्या महाराष्ट्रात भारनिमन करावे लागत आहे. शहरात 4 ते 8 तास व खेडयात 12 ते 16 तास भारनियमन करावे लागत आहे. काहीवेळा या भारनियमनामध्ये बिघाड निर्माण झाल्यास ग्रामीण भागात वीजेची तीव्रता जाणवते. वीज नाही म्हणून, पाणी नाही व पाणी नाही म्हणून शेती नाही त्यामुळे शेतकरी नाराज आणि जनता हैराण असा गंभीर प्रकार आज ग्रामीण भागात दिसून येत आहे. महाराष्ट्रात सहकारी साखर कारखाना हे ग्रामीण भागात स्थानिकीकरण झाले आहे. कारखाना हा वीज निर्मितीसाठी मोठा स्त्रोत आहे. सहकारी साखर कारखान्यांनी वीज निर्मिती केल्यास वीजेचा प्रश्न सुटेल व शेतकऱ्यांच्या आणि साखर कारखान्यांच्या सहवीज निर्मितीने वीजेचा प्रश्न सुटणार आहे. वीजनिर्मितीसाठी केंद्र आणि राज्यशासन मदत करण्यासाठी प्रयत्नशील आहे. केंद्रशासनाने जे साखर कारखाने वीज निर्मिती करतील त्यांना बॉयलरच्या दाबाच्या प्रमाणात अनुदान देत आहे.

40 बार त्यावरील बॉयलर वापरणाऱ्या वीजनिर्मिती प्रकल्पांना 40 लाख रु. प्रती मे. वॅट तर 60 बार व त्यावरील बॉयलरचा वापर करणाऱ्या प्रकल्पांना 50 लाख रु. प्रती मे. वॅट अनुदान जाहीर केले आहे.

महाराष्ट्र शासनाने ऑक्टोबर 2008 पासून अपारंपरिक उर्जा स्त्रोतापासून नवीन धोरण जाहीर केले आहे. यामध्ये ऊसाच्या चिपाडावर आधारीत सहवीज प्रकल्पासाठी हरित ऊर्जा निधीमधून सवलती व अनुदान जाहीर केले आहे. जे कारखाने सहवीज निर्मिती प्रकल्प उभे करतील त्यांना गाळपासाठी येणाऱ्या ऊसावर 3 टक्के करातून 100 टक्के सूट 10 वर्षासाठी देण्यात येईल. सहवीज निर्मिती प्रकल्पांना हरित ऊर्जा निधीतून प्रकल्पाच्या उच्च दाब उप-केंद्रासाठी प्रती प्रकल्प १ कोटी अनुदान देण्याचे शासनाने ठरविले आहे.

**3) कॅग अहवाल :**

कॅग म्हणजे कंट्रोलर अॅन्ड ऑडिटर जनरल यांनी महाराष्ट्रातील सहकारी तत्त्वावर चालविल्या जाणाऱ्या 22 सहकारी साखर कारखान्यांच्या केलेल्या नमुना लेखा परीक्षणात असंख्य गंभीर बाबी दिसून आल्या आहेत. सहकारी साखर उद्योगावर कटाक्ष टाकणारा हा अहवाल आहे. या अहवालाने सहकारी साखर उद्योगातील घोटाळयाचा लेखाजोखा मांडला आहे. 22 कारखान्याकडे केंद्र सरकारची 2658.65 कोटीची थकबाकी असून व भाग भांडवल 72.15 कोटी रुपयाचा हिशेब संशयास्पद असल्याचे सन 2006-2007 च्या वित्तीय अहवालात नमूद केले आहे. महाराष्ट्रात सद्यस्थितीला 202 सहकारी साखर कारखाने नोंदणीकृत आहेत. त्यापैकी 116 कारखाने तोटयात आहेत. 74 कारखान्यांनी वाटचाल नकारात्मक व्यवहाराच्या दिशेने सुरु आहे. 31 कारखाने अवसायनात निघाले आहेत. तर 61 कारखान्यांची गेल्या दीड दशकापासून लेखापरीक्षण केलेले नाही. या पार्श्वभूमीवर कॅगने अवघ्या 22 सहकारी साखर कारखान्यांचे लेखा परीक्षण केले नाही असा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. राज्यातील सहकारी साखर कारखानदारीबरोबर,साखर सम्राटाबरोबर सरकार देखील कसे जबाबदार आहे याचा कॅगने लेखाजोखा मांडला आहे.

**4) शिवाजीराव देशमुख यांनी उच्च न्यायालयात केलेल्या शिफारशी :**

महाराष्ट्रातील साखर संचालक पदावर काम केलेले श्री. शिवाजीराव देशमुख यांची उच्च न्यायालयाने समिती स्थापन केली होती. राज्यातील सर्व ऊसाचे गाळप होण्यासाठी सध्या अस्तित्वात असलेल्या कारखान्यांची क्षमता वाढवावी का?, कार्यक्षमपणे चालणाऱ्या कारखान्यामध्ये ऊसाचे क्षेत्रनिहाय फेरवाटप करावे का ? व राज्यात नवीन साखर कारखाने स्थापन करावेत का ? या तीन मुद्द्यांवर उच्च न्यायालयाने तज्ञांचा अहवाल मागविला. त्यानुसार श्री. शिवाजीराव देशमुख यांची सहकारी साखर उद्योगाचा तज्ञ म्हणून नेमणूक केली होती. श्री. देशमुख यांनी सखोल अभ्यास करुन उच्च न्यायालयात अहवाल सादर केला. या अहवालाकडे साखर उद्योगातील राज्यकर्त्यांचे व शेतकऱ्यांचे लक्ष लागले होते. त्यांनी उच्च न्यायालयात केलेल्या शिफारशी पुढीलप्रमाणे :-

1) महाराष्ट्रात यापुढे नवीन साखर कारखाने स्थापन करु नयेत.

2) अतिरिक्त ऊसाचा प्रश्न हा तात्कालिक आहे.

3) राज्यात ऊसाची कमतरता व गाळप क्षमता अधिक आहे.

4) सहकारी साखर कारखान्यांच्या ऊसावर खाजगी साखर कारखानदार अवलंबून आहेत.

5) आजारी कारखाने विलीन करावेत किंवा विकावेत.

6) आजारी कारखान्यांच्या भाग भांडवलावर सरकारने पाणी सोडावे.

7) आजारी कारखाने कोणत्याही परिस्थितीत भाडे तत्वावर दिले जाऊ नयेत.

वरील प्रकारच्या शिफारशी शिवाजीराव देशमुख यांनी उच्च न्यायालयाला सादर केल्या आहेत. या शिफारशी महाराष्ट्र सरकारने व साखर कारखानदारीतील राज्यकर्त्यांनी गांर्भीयाने घेणे गरजेचे आहे.

**महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्यांसाठी उपाययोजना :**

महाराष्ट्रातील साखर उद्योगाला नवीन आर्थिक धोरणाच्या पार्श्वभूमीमुळे सरकारी मदतीचे प्रमाण कमी होत आहे. तसेच विदेशी साखरेशी स्पर्धा करावी लागत आहे. त्याचबरोबर साखर उद्योगामध्ये ऊस दराची स्पर्धा निर्माण झाली आहे. त्यामुळे साखर उद्योगास साखर उत्पादनाचा खर्च वाढत चालल्याचे दिसून येते. तसेच शासनाचे बदलते साखर दराबाबतचे धोरण यामुळे साखर उद्योग अडचणीत सापडला आहे. या अडचणीतून सोडवणूक करण्यासाठी साखर उद्योगासाठी पुढील उपाययोजना सुचविल्या आहेत.

1) सहकारी साखर कारखान्यांनी केंद्र शासनाने जाहीर केलेल्या किमान वैधानिक दराचे तंतोतंत पालन करणे आवश्यक आहे. तसेच अंतिम ऊस दराचे प्रस्ताव पूर्व मान्यतेसाठी पाठविणे आवश्यक आहे.

2) कारखान्यातील यंत्र सामग्री, कामगारूंचे वेतन, मजुरी, विद्युत व पाण्याचा खर्च ऊस तोडणी व वाहतूकीचा खर्च त्वरीत अदा करुन कारखान्याबाबत विश्वास निर्माण करणे आवश्यक आहे.

3) सरकारने ठरवून दिलेली लेव्ही साखर ठेवून व शिल्लक साखर निर्यात करणे आवश्यक आहे.

4) सहकारी साखर कारखान्यांनी लेखापरीक्षण करणे गरजेचे आहे. त्यामुळे कारखान्यातील गैरव्यवहाराला आळा बसण्यास मदत होईल.

5) सहकारी साखर कारखान्यांनी ऊस संशोधन व साखर संशोधन केंद्राची कारखाना स्थळावर उभारणी करणे गरजेचे आहे.

6) सहकारी साखर कारखान्यांनी बगॅसवर आधारीत उपपदार्थ निर्मिती उद्योग (पेपर, पार्टीकल बोर्ड, पशुखाद्य, खते, इंधन व रसायन उद्योग) इत्यादी उभारणे गरजेचे आहे.

7) कारखान्याने सहवीज निर्मिती प्रकल्प उभारुन उत्पादनासाठी लागणाऱ्या विजेची व ग्रामीण भागातील शेतकऱ्यासाठी वीज उपलब्ध करुन, ऊस शेतीला हातभार लावणे आवश्यक आहे.

8) सहकारी साखर कारखान्यांनी वीज आणि पाणी वापराबाबत नियमन व नियंत्रण घालणे आवश्यक आहे. पाण्याचा योग्य वापर करुन कारखान्यातून वाया जाणाऱ्या पाण्यावर फळबागा, फुलबागा निर्माण करणे आवश्यक आहेत.

9) सहकारी साखर कारखान्यांनी ऊस उत्पादक शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी खते, औषधे व बियाणे यासाठी अर्थ सहाय्य देणे आवश्यक आहे.

10) सहकारी साखर कारखान्यांनी स्वतःची तांत्रिक

कार्यक्षमता सुधारण्यासाठी कामगारांसाठी प्रशिक्षण, चर्चासत्र, कार्यशाळांचे आयोजन करणे आवश्यक आहे.

**संदर्भ :**


1. महाराष्ट्र सहकारी चळवळ एक दृष्टीक्षेप, सन 2007.
2. सहकारी साखर उद्योगाची चार दशके, -जयदत्त प्रकाशन
3. अर्थसंवाद मासिकाचे विविध अंक
4. दै. लोकसत्ता, दि.11 सप्टेंबर 2009
5. दै. पुढारी अंक, दि. 20 जानेवारी 2010
6. साखर डायरी, सन 2007,08,10 अंक
7. www.mahaSugarFed.org
8. www.Co-OpSugar.org


## वर्गणीबाबत सुचना

एप्रिल 2011 पासून अर्थसंवाद वर्गणीदार (ग्रंथालये) संस्था सदस्य (शैक्षणिक संस्था, व्यावसायिक संस्था) (रू. 250 वार्षिक / रू. 600 त्रैवार्षिक / रू. 1000 पंचवार्षिक) तसेच साधारण सदस्य (रू. 300 वार्षिक) यांनी आपल्या वर्गणीची रक्कम नवनियुक्त प्रमुख संपादक 'अर्थसंवाद' अविनाश रामलाल निकम, शहादा यांच्या पत्त्यावर पाठवावी. जगन्नाथ शामराव पाटील, सातारा यांच्या पत्त्यावर वार्षिक वर्गणी पाठवू नये. त्यांच्या प्रमुख संपादक पदाचा कार्यकाळ 31 मार्च 2011 रोजी पूर्ण होईल. वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.

पत्ता :
अविनाश रामलाल निकम
प्लॉट नं. 30, परिमल कॉलनी
यशवंत क्लासेसच्या मागे, शहादा
जि. नंदूरबार 425 409
भ्रमणध्वनी : 9822665141

# प्राचीन भारतातील आधुनिक तत्थ्ये : ग्राहक संरक्षणाच्या विशेष संदर्भात

**बी.आर.सोनवणे**
औरंगाबाद
भ्रमणध्वनी : 9423453325

**प्रास्ताविक:**

समाज अनेक घटकांनी बनलेला असतो.आपांपसात त्यांच्या हितसंबंधात बऱ्याचदा परस्परविरोध देखील असतो. त्या करिता शासन यंत्रणेस समग्र समाजाच्या कल्याणाचा विचार करावा लागतो. उचित व्यवस्था आणि कायद्याचे राज्य निर्माण करावे लागते. कारण कायद्यानेच समाजकंटकांना दंडीत केले जाते तर अगतिकांना न्याय दिला जातो. न्यायाचे महत्त्व विशद करतांना महान समाजशास्त्रज्ञ सैंट ऑगस्टाईन म्हणतात,ज्या 'समाजात न्याय नाही तो समाज फक्त डाकूची झूंड असतो.'

वरील उद्देशाने प्रेरित होऊनच शासन व्यवस्थेने वेगवेगळया समाज घटकांच्या हितांच्या संवर्धनासाठी वेळोवेळी वेगवेगळे कायदे पारित करून त्यांना संरक्षित केले. ग्राहक हा देखील अनेक समाज घटकांपैकी एक असतो. ह्या ग्राहक समाजाच्या संरक्षणार्थ देखील शासनाने वेळोवेळी अनेक तरतुदी पारित केल्या आहेत. जसे फौजदारी न्यायदान प्रक्रिया कायदा (1860),वस्तू विक्री अधिनियम (1930), कृषी उत्पन्न व प्रतवारी विपणन कायदा (1937), ड्रग्ज ॲण्ड कॉस्मेटीक्स ॲक्ट (1940), भारतीय मानक संस्था अधिनियम (1952), अन्न भेसळ प्रतिबंधक कायदा (1954), भोंदू औषधे व जादूटोना कायदा (1954), जीवनावश्यक वस्तू कायदा (1955), एकाधिकार व अनुचित व्यवहार प्रतिबंधात्मक कायदा (1969), खाद्य तेल गुणवत्ता कायदा (1972), पर्यावरण नियंत्रण कायदा (1976), पॅकेज कमॉडीटी ॲक्ट (1977), वैधानिक वजनमाप कायदा (1978), ग्राहक संरक्षण कायदा (1986) इ.

**विषय निवड :**

अर्वाचीन भारतातील ह्या संरक्षण तरतूदीप्रमाणेच प्राचीन काळात देखील तेंव्हाच्या शासकांनी ग्राहक हित जपण्यासाठी अनेक तरतूदी केलेल्या

होत्या. त्या जाणून घेण्यासाठी आपल्याला भूतकाळाच्या गर्भात शिरावे लागेल. सोबतच हेही पक्के ध्यानात असू द्यावे लागेल की,प्राचीन इतिहास म्हणजे निव्वळ देवादिकांच्या दंतकथा, राजे-जवाड्यांच्या लढाया, भाकड कर्मकांडे यांचेच मनोरंजक चर्वण नसून तत्कालीन प्रशासकीय, आर्थिक, राजकीय व सामाजिक क्षेत्रात साधलेल्या प्रगतीचा उलगडा होय. म्हणूनच ग्राहक संरक्षण हा विषय निश्चित करून प्राचीन भारतात त्या संदर्भात काय व्यवस्था होती हे जाणून घेण्यासाठीच सदरचा लेखनप्रपंच.

**शोधनिबंधाची उद्दिष्टे**

ह्या संशोधनपर लेखाची खालील उद्दिष्टे निश्चित करण्यात आलेली आहेत.

1. अर्वाचीन भारतातील ग्राहक संरक्षण कायद्यांची माहिती घेणे.
2. प्राचीन काळात नियमनात असलेल्या ग्राहक संरक्षण तरतूदींचा आढावा घेणे.
3. पूर्वीच्या काळी अस्तित्वातील वजनमापे व भेसळ या संदर्भातील अनुचित प्रथा व त्यासंदर्भातील दंडात्मक कारवाईचे अध्ययन करणे.
4. आजच्या काळातील ग्राहक संरक्षण तरतूदी व प्राचीन काळातील ग्राहक हितार्थ केलेले नियम यात असलेले साम्य शोधणे.

**संशोधन पध्दती**

प्रस्तुत संशोधन हे पूर्णपणे दुय्यम प्रकारच्या संशोधन साधनांवर आधारीत आहे. ह्या शोधनिबंधाचा मुख्य उद्देश ज्ञान प्राप्ती करणे हा असल्यामुळे या संशोधनासाठी विविध पौराणिक ग्रंथ जसे महाभारत, रामायण, याज्ञवल्क्य स्मृती, नारदीय स्मृती व मनुस्मृती तसेच आयुर्वेद इत्यादींवर भाष्य करणाऱ्या संदर्भ ग्रंथांचा वापर करण्यात आलेला आहे. याशिवाय विविध मासिके, अनियतकालिके, व वर्तमानपत्रे यातील संशोधन लेखांचाही उपयोग करून घेण्यात आलेला आहे. तसेच कौटीलीयम अर्थशास्त्रम, मध्ययुगीन भारताचा इतिहास, ग्राहक कल्याण मंत्रालयाच्या विविध पुस्तिका यांचाही संदर्भ घेण्यात आलेला आहे.

**ग्राहक संरक्षण तरतुदी**

प्राचीन भारतातील ग्राहक संरक्षण तरतूदींचे सविस्तर अध्ययन करण्याअगोदर लेखाच्या सुलभीकरणासाठी प्राचीन कालखंडाचे पुढीलप्रमाणे विभाजन करण्यात आले आहे.

1. वैदीक कालखंड
2. मौर्यकालीन कालखंड
3. मध्ययुगीन कालखंड

यानंतर उपरोक्त कालखंडात प्रचलनात असलेल्या ग्राहक संरक्षण तरतूदींचा सविस्तर आढावा घेऊ.

**1. वैदीक कालखंडातील तरतूदी :**

गुप्त काळाच्या आरंभापर्यंतचा इतिहास म्हणजे वैदीक कालखंड.इ.स.पूर्व 1500 ते 500 हा वैदीक ग्रंथाच्या रचनेचा काळ. ह्या काळातील महत्त्वाच्या साहित्यकृती म्हणजे रामायण, महाभारत व चार वेद, 18 पुराणे तसेच अनेक प्रकारच्या श्रृती, स्मृती, उपनिषदे या सारखे धर्मग्रंथ ह्या होत. सदर ग्रंथसंपदेत तत्कालीन ऋषिमुनींनी मानवी जीवनाचे चार पुरुषार्थ सांगितलेत-धर्म,अर्थ,काम आणि मोक्ष.तसेच अर्थ व्यवहाराला अर्थपुरुष म्हटले. या अर्थपुरुषाचे ग्राहक ही चेतनाशक्ती तिचा

व्यवहारातील अर्थ म्हणजे, व्यापाऱ्यांनी धर्म आणि मोक्षाच्या नैतिक कल्पना डोळयासमोर ठेऊनच अर्थ प्राप्तीचा व्यवहार करावा व ग्राहक हितास महत्त्व द्यावे. तसेच तत्कालीन ऋषीमुनी अन्नग्रहण करतांना

''अन्नब्रम्हा रसो विष्णु
भोक्तो देवो महेश्वरा।''

असे श्लोक म्हणत; म्हणजे ते ग्राहकास महेश्वराची म्हणजेच सर्वात मोठ्या देवाची उपमा देत. ह्या वैदीक कालखंडातील ग्रंथसंपदेत अनेक ठिकाणी तत्कालीन ग्राहक संरक्षण तरतूदींचा उल्लेख आढळतो.त्यावरून आपण ह्या निष्कर्षाप्रत पोहचतो की, वैदीक काळात देखील ग्राहक कल्याणाला तेव्हाच्या प्रशासकांनी आजच्या सारखेच महत्त्व दिलेले होते.ग्रंथसंपदेनुसार त्याचे पुरावे पुढील प्रमाणे.

### 1 अ. महाभारतकालीन तरतूदी

जीवन आचरणाविषयी सखोल मार्गदर्शन करणारा ग्रंथ म्हणजे 'गीता'. उचित, अनुचित व्यवहाराबद्दल गीतेने फारच मौलिक मार्गदर्शन केलेले आहे. व्यापाऱ्याकडून उचित व्यवहारांची अपेक्षा करतांना गीतेच्या अठराव्या श्लोकात पुढील मार्गदर्शन करण्यात आलेले आहे–

''कृषि गौरक्ष्यमवाणिज्य वैश्यकर्म स्वभावजनम ।
परिचर्यात्मकं कर्म शुद्रस्मापि स्वभावजनम ।।''

याचा अर्थ व्यापारी वर्गाने आपले खरेदी विक्रीचे व्यवहार चोख ठेवावेत. फसवणूकीस तेथे वाव असू नये. तसेच वस्तूंच्या खरेदीविक्रीच्या वेळी तोल माप, वजने इत्यादीत जास्त घेणे किंवा कमी देणे हा लबाडीचा व्यवहार नसावा.

याशिवाय ग्राहक कल्याण संवर्धित करण्यासाठी तेराव्या अध्यायातील सातव्या श्लोकात गीताकार म्हणतात –

''अमानित्व मदभित्वमहिंसा क्षान्तिरार्जवम ।
आचार्योपालन शौर्च स्थैर्यमात्मविनिग्रह :।।''

म्हणजे व्यापाऱ्यांनी आपले व्यवहार व आचरण शुध्द ठेवावे. अनुचित व्यापारी प्रथा टाळूनच अर्थ प्राप्ती करावी. याचा अर्थ आज व्यापार व्यवहारासंदर्भात व्यापाऱ्यांकडून जे आचरण अपेक्षित आहे, तसेच आचरण महाभारत काळात म्हणजे आजपासून सुमारे 5000 वर्षापूर्वी गीता कारांनी अपेक्षीलेले होते. याचा अर्थ अनेक सहस्त्रका पूर्वीची व्यापारी वर्गासंदर्भातील आचारसंहिता आजच्या काळाशी साम्य दाखविते असे म्हणता येईल.

### 1 ब.श्रीयाज्ञवल्क्यस्मृती कालीन तरतूदी:

मालात भेसळ, अप्रस्तुत किंमती व वजनात खोट ही ग्राहक शोषणाची त्रिसूत्री त्यास प्रतिबंध घालणे म्हणजेच ग्राहक संरक्षण.वैदीक काळातील श्रीयाज्ञवल्क्य स्मृतीच्या अभ्यासावरून लक्षात येते की, त्याकाळी म्हणजे सुमारे पाच हजार वर्षापूर्वी देखील मालात भेसळ, खोटी वजने मापे यासारख्या अनुचित व्यापारी प्रथांचे प्रचलन होते. म्हणूनच तत्कालीन व्यवस्थेत ग्राहक संरक्षणार्थ अनेक तरतूदी तेव्हाही केल्या गेल्याचे दिसते. उदा. खोटी वजनमापे वापरून ग्राहकांची फसवणूक करणाऱ्या व्यापाऱ्यांसंदर्भात स्मृती म्हणते –

''मानेन तुल्या वापि यो रामहटमकं हरते ।
दण्ड स दाप्यो द्विशतं वृध्दो हातौच कल्पितम ।''

उपरोक्त श्लोकाचा अर्थ–'जो कोणी व्यापारी तांदूळ,कापूस यासारख्या मालाचा आठवा भाग देखील वजनमापात हातचलाखी करुन चोरतो त्यास दोनशे पण दंड आकारावा.' याचा अर्थ भारत

सरकारने ग्राहक कल्याणार्थ अलीकडे पारित केलेला वजन मापे परिमाण कायदा (1976)तत्कालीन स्वरुपात तेंव्हाही महाभारत काळात प्रचलनात होता.

आज व्यापारी वर्गाकडून व्यक्ति गत फायद्यासाठी समाजाच्या आरोग्यास अपायकारक ठरणारा भेसळीचा अनुचित व्यापार केला जात आहे.त्याची काही उदाहरणे - पपईच्या बीया मिऱ्यामध्ये,लाकडाचा भुसा मिरची पुडात, लाल दगडे शेंगदाण्यात,भगर खसखशीत,मक्याचा तूरा केसरात; तर लाकडाची साल दालचीनीत. त्याकाळी देखील अशाच अन्न भेसळीचा अपायकारक अनुचित व्यापार व्यवहार होता. ज्याचे श्री - याज्ञवल्क्य स्मृतीच्या अध्ययनावरुन पुढील काही नमुने हाती येतात. मातीला वनस्पतीचा वास लावून औषध म्हणून विक्री करणे, मांजराच्या चामड्याला रंगवून वाघाचे कातडे भासविणे, कापसाच्या सुतास रंगवून रेशीम म्हणून विकणे,बेलाचे लाकूड चंदन म्हणून विकणे, लवंगात कंकोळीची भेसळ करणे वगैरे. अशा ह्या मानवी आरोग्यास अपायकारक, ग्राहक हितास ठेच पोहचवणाऱ्या अनुचित व्यवहारास प्रतिबंध करण्यासाठी व्यापाऱ्यांवर गुन्ह्याच्या तीव्रतेनुसार दंड आकारण्याची तरतूद त्याकाळी देखील केलेली होती हे खालील श्लोकावरुन लक्षात यावे.

''भेषजस्नेहल वणगन्ध धान्य गुडादिष्णु ।
पण्येशु, प्राक्षपेन हीनं पणान्दाष्यस्तु षोडश ।।''

म्हणजे, जर औषधी द्रव्य, तूप, तेल, मीठ, वाळा,धान्य, गूळ,हिंग,मिरची अशा पदार्थात भेसळ केली तर त्या व्यापाऱ्यास सोळा पण दंड आकारावा. याशिवाय जर एखाद्या व्यापाऱ्याने कमी किंमतीची माती,चामडे,रत्ने,लाकूड,वस्त्रे हे जुने असून त्यास रंग देऊन नवे भासविले व ग्राहकांची फसवणूक केली तर त्या व्यापाऱ्यास विक्री मूल्याच्या आठ पट दंड आणि बनावट कस्तूरी विकणाऱ्यास शंभर पण दंड लादावा अशी दंडात्मक तरतुद सांगितली.याचा अर्थ ग्राहकांचे सरक्षण व्हावे म्हणून तत्कालीन प्रशासकीय व्यवस्थेत अनेक प्रकारच्या ग्राहक संरक्षण तरतूदी प्रचलित केल्या होत्या हे सिध्द होते.

**1.क मनुस्मृतीकालीन तरतूदी :**

व्यक्तिंच्या आचरणासंदर्भात विस्तृत विवेचन करणारा ग्रंथ म्हणजे मनुस्मृती. मनुस्मृतीत बाजारपेठेत महत्त्वाचे घटक असलेले ग्राहक आणि विक्रेत यांच्या खरेदी विक्री व्यवहाराविषयी सविस्तर विवेचन आलेले आहे. जसे -

''कीत्वा विक्रीय वा किंविद्यस्येहनुशयो भवत ।
सो मर्दशाहान्त द्रव्यं दद्यचैवाददीनच ।।''

वरील श्लोकाचा सरळ अर्थ म्हणजे,'जर ग्राहकाने व्यापाऱ्याकडून एखादी वस्तू खरेदी केली परंतु ग्राहकाला वाटले की, आपण केलेला व्यवहार तोटयाचा आहे.तर तो विक्रेत्यास आपला माल पुढील अटींच्या अधीन राहून परत करू शके. दुसऱ्या दिवशी वस्तू परत केली तर 1/3 रक्कम, तिसऱ्या दिवशी परत केल्यास 2/3 रक्कम ग्राहकाला कमी घ्यावी लागेल.'

मनुस्मृतीत याचेही पुरावे मिळतात की, राजाने वस्तूंच्या खरेदी विक्रीचे दर निश्चित करावेत. म्हणजे आज आपण ग्राहक कल्याणार्थ जे किंमत नियंत्रण धोरण अंगिकारले आहे तशाच प्रकारचे धोरण हजारो वर्षांपूर्वी देखील व्यवहारात असल्याचे आढळून येते. याचा अर्थ तत्कालीन राज्यकर्ते ग्राहक संरक्षणाबाबत बरेच दक्ष होते.

**1 ड. आयुर्वेद कालीन तरतूदी :**

इ.स.पूर्व 5000 ते1000 हा आयुर्वेदाच्या

रचनेचा कालखंड. अथर्ववेदात समाविष्ट असलेला पाचवा वेद, असा आयुर्वेदाचा उल्लेख केला जातो. वैद्यकशास्त्राशी संबंधित असलेल्या ह्या ग्रंथावरुन हजारो वर्षापासून मानवी शरीररचना व आरोग्य यांचे शास्त्रीय ज्ञान भारतीयांना होते, हे जाणवते. एवढेच नव्हे तर त्याकाळी वैद्यकीय उपचारात हलगर्जी दाखविणाऱ्या वैद्यास दंडात्मक कारवाईचा नियम पारीत करुन रुग्ण ग्राहकास संरक्षण पुरविले जाई. खालील श्लोक या संदर्भात पुरेसा बोलका आहे.

''देहेन्द्रीय वीनाशेषु यथा दण्ड प्रकल्पयेत ।
समुत्थानव्ययं चासौ दयात व्रण निरोपणात ।।''

उपरोक्त श्लोकाचा मतितार्थ हा की, देहातील एखाद्या इंद्रीयावर उपचार करतांना जर अवयवाचे नुकसान झाले तर नुकसानीनुसार वैद्याला दण्ड आकारावा. तसेच रुग्ण बरा होईपर्यंतचा सर्व खर्च त्याकडूनच वसूल करावा. म्हणजे आजच्या Medical Negligency Consumer Protection Act चे मूळ प्राचीन काळात सापडते.

**2. मौर्यकालीन तरतूदी :**

प्राचीन काळातील इतिहासाचा मागोवा घेतला असता असे लक्षात येते की, तत्कालीन शासन व्यवस्था ग्राहक हित दक्ष होती. याची यथोचित साक्ष म्हणजे इ.स.पूर्व चौथ्या शतकातील कौटीलीय अर्थशास्त्रम् हा ग्रंथ होय. कौटील्याने आपल्या ग्रंथात 'वैदेहकरक्षणम्' म्हणजेच ग्राहकांच्या संरक्षणावर एक स्वतंत्र अध्यायच लिहून प्रभावी राज्यव्यवस्थेसाठी दंडशक्तीची विविध रुपे सांगितलेली आहेत. त्यासंदर्भात खालील श्लोक पुरेसा बोलका आहे.

''तुलाभान्तरमर्धवणोन्तरं वा धरकस्थ माषकस्य
वा पणमूल्यादष्टभागं हस्त दोषेणाचरतो
द्विशते दण्ड:।
मेन द्विशतोसरा दण्डवृध्दिर्व्याव्यात ।''

याचा अर्थ तराजूस झटका देणे, खोटी वजनमापे वापरणे, मालात भेसळ करणे या क्लृप्त्यांचा वापर करुन जो व्यापारी ग्राहक हितास बाधा पोहचवेल, त्यास 200 पण (चलन) दंड आकारावा. विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे आज वजनमापासंबंधी जी रुढ नियमावली आहे, ती त्या काळात देखील अस्तित्वात असल्याचे कौटील्याच्या पुढील श्लोकावरुन स्पष्ट होते.

''चतुर्मासीकं प्रगतिवेधनिकं कारयेत ।
अप्रतिविध्दस्यात्ययः सपादः सप्तवीशतीपण:।।''

कौटील्याच्या मते, 'शासन व्यवस्थेने ग्राहक हितार्थ वजन माप निरीक्षकाची नियुक्ती करावी. त्याने प्रत्येक चार महिन्यांनी वजन माप पाहाणी करावी, वजन मापे शिक्के मारुन प्रमाणित करुन द्यावीत. अप्रमाणित वजन मापे वापरणाऱ्या व्यापाऱ्यांना सव्वास्तावीस पण दंड करावा. शिवाय वजनमापे अशा धातूंची असावीत की जी पाण्याने ओली झाली किंवा उष्णतेने तापली तरी मूळ वजनात अंशाचाही फरक पडायला नको.' ग्राहकांची फसवणूक करणाऱ्या व्यापाऱ्या संदर्भात कौटील्य म्हणतो-

''सारभाण्डनित्य सारभाडं, मज्जात मित्यतज्जत,
रादायुक्त मुपाधियुक्तं।
समुद्र परिवर्तनं वा विक्रयाधानं नयतौ हीतमूल्यं
चतुष्पश्चाशडपणे दण्ड: ।।''

याचा अर्थ वस्तू किंवा माल हलका असतांना तो उच्च प्रतीचा भासविणे, जेथे तयार झाला नाही त्या जागेचा निर्देश करणे, भेसळयुक्त असतांना शुध्द भासविणे असा व्यवहार व्यापारी करीत असेल

त्याला चौपण्ण पण दंडाची शिक्षा करावी. अनुचित व्यापारी प्रथांचे आचरण करणाऱ्या व्यापाऱ्या संदर्भात कौटिल्य म्हणतो-

''वैदेहकाना वा सम्भूय पण्यमवरून्धतामनर्घेण ।
विक्रीणतां क्रीणतां वा सहस्र दण्ड ।।''

म्हणजे 'जे व्यापारी संगनमत करुन बाजार बंद करतील, शेती वस्तूंचे खरेदीचे दर उतरवतील व आपल्या स्वार्थासाठी विक्री किंमत वाढवतील अशांना एक हजार पण दण्ड आकारावा.' तसेच धान्य व्यापाऱ्यांना नैतिक समज देतांना कौटील्य म्हणतो -

''तेन धान्यापण्यविक्रये व्यवहारेतानुग्रहण प्रजानम्।''
याचा अर्थ, 'व्यापाऱ्यांनी धान्य विकतांना नेहमीच ग्राहक हित डोळ्यासमोर ठेवावे.'

थोडक्यात, आजही उपयुक्त ठराव्यात अशा प्रकारच्या ग्राहक संरक्षण तरतूदी इ.स.पूर्व चौथ्या शतकात देखील प्रचलित होत्या.

### 3. मध्ययुगीन कालखंड:

भारतात मध्ययुगाचा प्रारंभ सुलतान शाहीपासून झाला. साधारणत: इ.स.12 वे ते 15 वे शतक म्हणजे मध्ययुगीन कालखंड होय. भारतात अल्लाउद्दीन खिलजीच्या काळात ग्राहक कल्याणार्थ अनेक तरतूदी नियमनात असल्याचे आढळून येते. या काळात अल्लाउद्दीन खिलजी असा एकमेव शासक होता की, ज्याने बाजार नियंत्रणासाठी विस्तृत नियम केले व त्यासाठी 'शुहना' बाजार प्रमुखाची नेमणूक केली.व्यापारी वर्ग निर्धारीत मूल्यांवर वस्तुंची विक्री करतो किंवा नाही याची पाहणी करणे व जे व्यापारी या संदर्भात दोषी आढळून येतील त्यांना दण्डीत करणे हे ह्या शुहनाचे काम. त्याच प्रमाणे प्रत्येक व्यापाऱ्याने शासनाकडे पंजीकरण करण्याचे देखील बंधन त्या काळात व्यापाऱ्यांवर घालण्यात आले होते. अल्लाउद्दीन खिलजीने त्या काळात आजच्या सारखीच खाद्यान्न वितरण व्यवस्थेची प्रभावी व्यवस्था निर्माण केलेली होती. ज्यामुळे व्यापाऱ्यांना भाववाढ किंवा मालाची कृत्रिम टंचाई करता येत नव्हती. त्याने दिल्लीत शाही भांडाराची व्यवस्था तर केलीच शिवाय स्थानिक अधिकाऱ्यांना सक्त ताकीद दिलेली होती की, कोणीही व्यापारी/शेतकरी निर्धारीत दरापेक्षा जास्त किंमतीत माल विकणार नाही.असे झाल्यास त्यांचे धान्य जप्त करावे. याशिवाय असा ही दंडक घातला की, प्रत्येक शेतकऱ्याने 10 मणापेक्षा जास्तीचे झालेले धान्य मंडीत आणून विकावे. त्यामुळे बाजारात धान्यपुरवठा वाढून किंमतींवर आपोआपच नियंत्रण प्रस्थापित होत असे. यामागे उद्देश हाच की, नगरजनांणा उचित किंमतीवर जीवनाश्यक वस्तू उपलब्ध व्हाव्यात व ग्राहकांचे हित साधावे.

अल्लाउद्दीन खिलजी ग्राहक कल्याणार्थ किती संवेदनशील होता याची साक्ष म्हणजे तो स्वत: बाजारात गुप्तहेर वा लहान मुलांना पाठवून व्यापारी उचित किंमतीस माल विकतात काय? प्रमाणित वजनेमापे वापरतात काय? याविषयी माहिती घेत असे. जर एखाद्या व्यापाऱ्याने ग्राहकास फसविले, तर तेवढ्या वजनाच्या दुप्पट त्या व्यापाऱ्याचे मांस कापले जाई. खेदाची गोष्ट म्हणजे अल्लाउद्दीन खिलजीच्या मृत्यूनंतर (1316) त्याचा मुलगा मुबारक खान सत्तेत आला व त्याने उत्पादकांची बाजू घेत ग्राहक संरक्षणार्थ पारीत केलेल्या सर्व तरतूदी तडकाफडकी रद्दबातल केल्या.

**समारोप :**

इतिहासाचे धांडोळे धुंडाळतांना लक्षात येते की, पूर्वीचा समाज जो नीतीप्रधान व धार्मिक आचरणास महत्त्व देणारा असतांना देखील तेंव्हाच्या शासकांनी व्यापारी/वैश्य यांच्या व्यवहार प्रवृत्ती विषयी काही नियम करुन ठेवलेले होते. याचा अर्थ असत् प्रवृत्ती,अनुचित प्रथा,लालसी मन यांचे अस्तित्व त्याकाळी देखील असावे. त्यामुळे ग्राहक समाजाची लूट होत असावी. ती थांबविण्यासाठीच तत्कालीन प्रशासकांनी आजच्या सारख्या ग्राहक संरक्षण तरतूदी पारीत केल्यात. ज्यामुळे वजनात खोट,मालात भेसळ, अवास्तव किंमती अशा अनुचित व्यापारी प्रथांपासून ग्राहकांना संरक्षित करुन समाजहित साध्य करण्याचे प्रयत्न करण्यात आलेत.

**संदर्भ सूची**


1. कानेटकर मेघा,भारतीय ग्राहक चळवळ, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर,२००६.
2. ग्राहक कल्याण उच्चाधिकार समिती, महाराष्ट्र शासन मुंबई, ग्राहक कल्याण नवनीत,पुस्तक दुसरे, मे 1998.
3. ग्राहक कल्याण उच्च धिकार समिती, महाराष्ट्र शासन मुंबई, ग्राहक कल्याण नवनीत, पुस्तक पहिले, मार्च.1998.
4. ग्राहक कल्याण उच्चधिकार समिती, महाराष्ट्र शासन मुंबई, ग्राहक कल्याण नवनीत,पुस्तक तिसरे, सप्टें.1998.
5. ग्राहक कल्याण उच्चधिकार समिती, महाराष्ट्र शासन मुंबई, ग्राहक कल्याण नवनीत,पुस्तक चौथे, जानेवारी1998.
6. फडके दिलीप-ग्राहक संरक्षणाचा त्रिशूल, ग्राहक कल्याण उच्चाधिकार समिती,महाराष्ट्र शासन मुंबई.
7. आपटे वसंत, उचित व्यापार अ.भा.ग्राहक पंचायत, पुणे - 2, 2000.
8. गीता प्रेस गोरखपूर,श्रीमभ्दगवतगीता.
9. सतीशचंद्र, मध्यकालीन भारत, (1206-1526), जवाहर पब्लिशर्स ॲण्ड डिस्ट्रीब्युटर्स ,नवी दिल्ली, 2007.
10. सोनवणे बी.आर, ग्राहक कायदा आणि ग्राहक सक्षमीकरण, योजना मासिक,फेब्रुवारी 2009,अंक 7, माहिति आणि प्रसारण मंत्रालय, भारत सरकार.
11. कंगले र.प. कौटिलीयम अर्थशास्त्र, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई 1982.
12. शर्मा रामशरण, प्राचीन भारताचा परिचय, ओरिएन्ट लॉंगमन प्रकाशन, मुंबई 2007.

# राष्ट्रीयकृत व खाजगी बँकांच्या ए.टी.एम्. सेवा वापरणाऱ्या ग्राहकांच्या समाधानपातळीचा तुलनात्मक अभ्यास

**प्रा. विजय मा. कुंभार**
टिचर फेलो, अर्थशास्त्र विभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
vijay.kumbhar9@gmail.com
भ्रमणभाष : 9860176059

**प्रस्तावना :**

अलीकडील काळात बँकींग व्यवसायामध्ये माहिती तंत्रज्ञानाचा वापर मोठया प्रमाणात वाढत असून भारतीय बँकींग व्यवसायातही ही प्रवृत्ती दिसून येत आहे. भारतात सन 1985 मधील सी. रंगराजन समितीने सूचवलेल्या योजनेनुसार भारतीय रिझर्व्ह बँकेने बँकांच्या संगणकीकरणाचा कार्यक्रम हाती घेतलेला होता. तथापि, अनेक खाजगी बँकांनी आपल्या सर्व शाखा संगणकीकृत केलेल्या असून राष्ट्रीयकृत बँकांच्या एकूण शाखांपैकी 97% शाखा संगणकीकृत झालेल्या आहेत. बँकांच्या संगणकीकरणाबरोबरच ग्राहकांना विविध प्रकारच्या अत्याधुनिक सेवा-सुविधा उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. त्यामध्ये कोअर बँकींग, इन्टरनेट बॅकींग, मोबाईल बँकींग, इलेक्ट्रॉनिक्स फंड ट्रान्स्फर, मायकर चेक, ए. टी. एम्. क्रेडीट कार्ड, डेबीट कार्ड इत्यादीचा समावेश होतो. भारतीय बँकींग व्यवसायात अत्याधुनिक सेवा उपलब्ध करुन देण्याबाबतची स्पर्धा निर्माण झालेली असून सर्वच बँका आपल्या ग्राहकांना सोयिस्कर व आधुनिक सेवा पुरविण्याचा प्रयत्न करत आहेत. परिणामी ग्राहकांना अनेक पर्यायी बँकींग सेवा (Alternative Banking Services) उपलब्ध होत आहेत.

**1. विषय निवडण्यामागील कारणमीमांसा :**

युरोपियन राष्ट्रीमध्ये तंत्रज्ञानाधारित (ई-बँकींग) सेवांची सुरुवात 1960 च्या दशकातच झालेली असली तरी भारतात या सेवा 1980 च्या उत्तरार्धात सुरु झालेल्या दिसून येतात. तथापि ई-बँकींग मधील इन्टरनेट बँकींग, मोबाईल बॅकींग, इलेक्ट्रॉनिक क्लिअरिंग इ. सेवांपेक्षा ए.टी.एम्. सेवांचा वापर सद्या वाढत असून सर्वच बँका ही सुविधा उपलब्ध करुन देत आहेत. सध्या भारतात

राष्ट्रीयकृत बँकांची 17,277 खाजगी बँकांची 15,320, तर विदेशी बँकांची बहुतांश ए.टी. एम्. केंद्र सुरु आहेत. अलीकडील काळात सर्वच बँका आपल्या खातेदारांना सर्रास ए.टी. एम्. कार्ड देत आहेत. त्यामध्ये अल्पशिक्षित, मध्यम, शिकलेले, उच्चशिक्षित अशा सर्वांचाच समावेश आहे. तसेच ए.टी.एम् द्वारे पैसे काढण्याबरोबरच इतरही सेवा पुरवल्या जात आहेत. परंतु, या सेवा कितपत लाभदायक आहेत व ए. टी. एम् सेवांचा दर्जा काय आहे, हे तपासण्याची आवश्यकता असल्यामुळे एक नमुना अभ्यास म्हणून या विषयाची निवड करण्यात आलेली आहे.

### 1.1 अभ्यासाची उदिष्टचे :

प्रस्तुत अभ्यास खाली नमूद केलेल्या उद्दिष्टांच्या अनुषंगाने करण्यात आलेला आहे.

1. ए.टी.एम् सेवा वापरणाऱ्या ग्राहकांचे वय, शिक्षण, उत्पन्न व व्यवसाय याबाबतची माहिती घेणे.
2. ए.टी.एम् मधील विविध सेवांच्या वापराबाबतची माहिती घेणे.
3. राष्ट्रीयकृत व खाजगी बँकांच्या ए. टी. एम् सेवांच्या दर्जा तपासणे.
4. राष्ट्रीयकृत व खाजगी बँकांच्या ए.टी. एम् सेवा वापरणाऱ्या ग्राहकांची समाधानपातळी मोजणे.
5. ए.टी.एम् सेवेतील उणिवा शोधून योग्य उपाययोजना सुचवणे.

### 1.2 नमुना निवड व माहिती संकलन

प्रस्तुत अभ्यासासाठी भारतीय स्टेट बँक व बँक ऑफ महाराष्ट्र या राष्ट्रीयकृत बँका, आय.डी. बी.आय. लि. व एच.डी.एफ.सी. बँक लि या खाजगी बँकांच्या कोल्हापूर (महाराष्ट्र) शहरातील ग्राहकांची निवड करण्यात आलेली असून गैरसंभाव्यता (Non-Probability) नमुना निवड पध्दतीने राष्ट्रीयकृत बँकांचे 30 व खाजगी बँकांच्या 30 ग्राहकांकडून प्रश्नावली भरुन घेण्यात आलेल्या आहेत. सदर प्रश्नावली ही पॅराशूरमन, झैतमल व बेरी (2005) यांनी सुचवलेल्या पध्दतीनुसार (परंतु ए.टी.एम् सेवेची गुण वैशिष्टये लक्षात घेऊन) तसेच क्रोनीन व टेलर (1914) यांनी सुचवल्याप्रमाणे ''फक्त सादरीकरण''(Performance Only) तंत्राच्या आधारे तयार करण्यात आलेली आहे. तथापि, ग्राहकांचा प्रतिसाद नोंदवण्यासाठी होय/नाही पध्दतीऐवजी पाच बिंदू लिकर्ट तंत्र (Five Point Likert Scale) वापरलेले आहे-1=पूर्ण असहमत 2=असहमत,3=तटस्थ (ना सहमत ना असहमत), 4=सहमत, 5=पुर्ण सहमत (पहा परिशिष्ट-1) प्राथमिक माहितीबरोबर आवश्यक दुय्यम माहिती वेबसाईट, अहवाल व संशोधन पत्रिकेतून घेतलेली आहे.


### 2.ग्राहकांचे समाधान व सैध्दांतिक पार्श्वभूमी:

ग्राहकांचे समाधान हा घटक अर्थ - शास्त्रापेक्षा व्यवस्थापकीय अर्थशास्त्र (Managerial Economics) व्यावसायिक अर्थशास्त्र (Business Economics) व विपणन विषयक (Marketing) अभ्यासामध्ये अधिक हाताळलेला दिसून येतो. विशेषतः सेवा क्षेत्रातील ग्राहकांचे समाधान व सेवांचा दर्जा मोजण्यासाठी पॅराशुरमन, झैतमल व बेरी (1985 व 1988) यांनी SERUQUAL किंवा RETAR (Reliability, Empathy,Tangiblity, Assurance and Responsivness) तंत्र विकसित केले, परंतु SERVQUAL हे सर्वसाधारण व परंपरागत सेवांसाठीच उपयुक्त आहे. तथापि, पॅराशुरमन

(2005) यानीच इलेक्ट्रॉनिक तंत्रज्ञानावर आधारीत सेवांचा दर्जा व ग्राहकांची समाधानपातळी मोजण्यासाठी E-S-Quai (E-Service Quality) हे नवीन तंत्र मांडले. या दोन्ही तंत्रामध्ये सेवांच्या दर्जाबाबतचे विविध पैलू (Dimensions) वापरण्यात आलेले आहेत. तथापि, सन 1994 मध्ये क्रोनीन व टेलर यांनी SERVPERT (Service Performance) हे तंत्र विकसित केले. त्यांच्या मते SERVPERT तंत्रामध्ये ग्राहकांच्या अपेक्षा व प्रत्यक्ष सेवेचा दर्जा (Expectation and perception of service quality) यामधील तफावत (Service Quality Gap) मोजली जाते. परंतु प्रत्येक ग्राहकांच्या अपेक्षा वेगवेगळया असल्यामुळे व प्रत्येक ग्राहकास सेवेच्या दर्जाबाबत योग्य माहिती नसल्यामुळे तो अपेक्षेबाबत योग्य प्रतिक्रिया देऊ शकत नाही, हे त्यांनी सिध्द करुन दाखविले व SERVPERT ची वैधता (Reliability) सिध्द झालेली आहे.

उपलब्ध संशोधन साहित्याचा अभ्यास केल्यानंतर असे दिसून येते की, ग्राहकांचे सेवाविषयक समाधान व सेवेचा दर्जा यामध्ये घनिष्ट संबंध आहे. पॅराशुरमन (1985,1988 व 2005), झैतमल (1993,2000 व 2002), कोनीन व टेलर (1994), अरोरा व मल्होत्रा (1997) आणि झाम व खान (2008) यांच्या संशोधनातून ही बाब सिद्ध झालेली आहे. ओलीवर (1980) यांच्या मते ग्राहकांचे समाधान ही एक मानसिक जाणीव (State of mind) असून ती ग्राहकांची सेवेविषयीची अपेक्षा व गरज आणि प्रत्यक्ष प्राप्त झालेली सेवा याच्यातील तफावतीवर अवलंबून असते. असे असले तरी प्रत्येक सेवेची सर्वच गुण वैशिष्टये अथवा पैलू अपेक्षेनुरुप समाधानकारक किंवा असमाधानकारक नसतात. काही वेळेस एखाद्या सेवेतील काही पैलू चांगले तर काही वाईट असतात.त्यामुळे सेवाविषयक समाधानपातळी तपासण्यासाठी एखाद्या विशिष्ट सेवेची सर्व महत्त्वाची गुण वैशिष्टे अथवा पैलू विचारात घेणे आवश्यक असते. कारण ग्राहकाने खर्च केलेले पैसे व श्रम यांच्या मोबदल्यात त्याला प्राप्त होणारा सकल लाभ (Perceived Aggregate Value) व त्यामधून प्राप्त होणारे समाधान हे सेवेच्या दर्जावर अवलंबन असते. सेवा क्षेत्रामध्ये सेवेचा दर्जा व समाधानपातळी यामधील फलनात्मक सहसंबंध आकृती क्र. 1 मध्ये दर्शविल्याप्रमाणे असतो.

**आकृती क्र.१: ग्राहकाचे समाधान**




**2.1 ए.टी.एम्. सेवेच्या दर्जाबाबतचे निर्देशक** (Dimensions of A.T.M. Service Quality):

सर्वसाधारण ई-सेवा व बँकींग संस्थाद्वारे पुरवल्या जाणाऱ्या ई-सेवा यांच्यामध्ये मूलभूत फरक असतो. कारण बँकेच्या ई-सेवांमध्ये वित्तीय धोका (Financial Risk) असतो. तसेच सेवेतील त्रूटीमुळे ग्राहकाचे वित्तीय नुकसान तसेच मानहानीही होऊ शकते. म्हणून ए.टी.एम् सेवेचा दर्जा तपासण्यासाठी सर्वसाधारण ई-सेवांच्या निर्देशांकाबरोबरच इतर नवीन पैलुंचाही विचार करुन

पुढील 11 निर्देशक विचारात घेतलेले आहेत.

**1.सेवेची उपलब्धता(System Availability):**

यामध्ये बँकेने बसवलेल्या ए.टी.एम. ची संख्या, नेटवर्क जोडणीतील सातत्यता व सेवेतील नियमितता यांचा विचार केलेला आहे.

**2.सेवेतील परिपूर्णता (Fulfillment):**

सेवेतील परिपूर्णता हा ग्राहक समाधानासाठी महत्त्वाचा घटक असून यामध्ये आवश्यक सुविधांची उपलब्धता, मशीनमधील (शॉटकट) मेनू, अश्वासित सेवांची परिपूर्ती यांचा विचार केलेला आहे.

**3.कार्यक्षमता (Efficiency):**

ई-सेवांमध्ये कार्यक्षमता हा अत्यंत महत्त्वाचा घटक असून यामध्ये पैसे प्रदान करण्याची निर्देशित माहिती पुरवण्याची व प्रक्रियेची गती विचारात घेतलेली आहे.

**4.सूरक्षितता (Security)**

ए.टी.एम. सेवेचा संबंध थेट ग्राहकाच्या पैशांशी असल्यामुळे या सेवेतील सुरक्षितता हा महत्वाचा पैलू असतो. यामध्ये ग्राहकाची माहिती, पिन नंबर व व्यवहाराची माहिती सुरक्षित ठेवणे अपेक्षित असते.

**5.सुलभता (Easiness) :**

ए.टी.एम. ही तंत्रज्ञानाधारित सेवा असल्यामुळे तिचा वापर करण्यासाठी सोयिस्कर व सुलभ पर्याय असणे महत्त्वाचे असते. मेनूची हाताळणी पध्दती, परिचित भाषा व सोयिस्कर मेनू हे घटक सुलभतेसाठी महत्त्वाचे असतात.

**6.सोयिस्करता(Convenince)**

सोयिस्करतेमध्ये सर्वकाळ (Any Time) सेवेची उपलब्धता, पैसे काढण्याची न्यूनतम व उच्चतम मर्यादा व मूळ बँकेच्या ए.टी.एम् व्यतिरिक्त इतर बँकांच्या ए.टी.एम्. सेवेची उपलब्धता हे घटक महत्त्वाचे असतात.

**7.मितव्ययता (Economies)**

ए.टी.एम. मुळे बॅकींग सेवा वापरण्याचा खर्च कमी होणे अपेक्षित असते, परंतु इतर बँकांचे ए.टी.एम. वापरल्यामुळे इन्टर बँक ए.टी.एम् ट्रान्झेक्शन चार्ज आकारल्यामुळे मितव्ययता निर्माण होते का? तसेच पैसे काढण्यासाठी बँकेत जाण्याचा खर्च वाचत असल्यामुळे मितव्याता निर्माण झालेली आहे का? या बाबीचा विचार केलेला आहे.

**8.जबाबदारपणा (Responsiveness)**

ए.टी.एम. सेवा ही बॅठकेने उपलब्ध करुन दिलेली पर्यायी सेवा असल्यामुळे या सेवेत निर्माण होणाऱ्या समस्या तात्काळ सोडवणे अपेक्षित असते. यामध्ये गैरव्यवहाराबाबतचीही जबाबदारी समाविष्ट असते.

**9.समस्या हाताळणी (Problem Handling)**

ए.टी.एम. ही तंत्रज्ञानावर आधारित सेवा असल्यामुळे अनेक समस्या निर्माण होण्याची शक्यता असते. अशा समस्या तात्काळ सोडवणे अपेक्षित असते.अन्यथा सेवेमध्ये अनियमितता निर्माण होऊ शकते.

**10.क्षतिपूर्ती (Compensation)**

ए.टी.एम. यंत्रणेतील त्रूटी अथवा तंत्रज्ञानुचा गैरवापर करुन खातेदाराच्या खात्यातील पैसे परस्पर काढून घेण्याचे प्रकार निर्देशनास येत असतात. अशा परिस्थितीत बँकेने नुकसानभरपाई देणे आवश्यक असते.

**11.संपर्कव्यवस्था (Contact)**

ग्राहकास आपल्या ए.टी.एम.सेवेसाठी व त्यामधील अडचणी सोडवून सेवा वापरत असताना येणाऱ्या अडचणी सोडवण्यासाठी व माहिती

घेण्यासाठी बँकेच्या कर्मचाऱ्याशी संपर्क करण्याची यंत्रणा तसेच खात्याबाबतची माहिती ग्राहकांना देण्यासाठी सुसज्ज व जलद यंत्रणा आवश्यक असते.

(**टीप** सदर १ ते ११ हे निर्देशकांचे क्रमांक कोष्टक क्र.३ व ४ मध्ये वापरले आहेत.)

## 3.0 ए.टी.एम.सेवा वापरणाऱ्या ग्राहकांची सर्वसाधारण माहिती

संशोधनासाठी निवडलेल्या कार्यक्षेत्रातील सर्वेक्षणावरुन असे दिसून येते की, ए.टी. एम. वापरणाऱ्या ग्राहकांमध्ये 65% ग्राहक वय वर्षे 18 ते 35 या गटातील आहेत.तर मध्यमवयीन लोकांमधील केवळ 28.3%लोकच या सेवा वापरत आहेत. तथापि वय वर्षे 51 ते 60 मधील 6.7% लोक प्रत्यक्ष ए.टी.एम. सेवा वापरतात.तर (सर्वेक्षण काळात) वय वर्षे 60 पेक्षा अधिक वयाचे ग्राहक ए.टी.एम. वापरत नसल्याचे आढळून आले आहे. कोष्टक्र क्र. 1 वरुन असे दिसून येते की, ही सेवा वापरणारे बहुतांश ग्राहक H.S.C. पेक्षा अधिक शिक्षण घेतलेले असले तरी H.S.C. पेक्षा कमी शिकलेले ग्राहकही 33.3% आहेत. एकूण ग्राहकांपैकी 68% ग्राहक नोकरदार तर 13.3% विद्यार्थी आहेत. या सेवा वापरणाऱ्यांमध्ये व्यावसायिकांचे प्रमाण केवळ 6.7% च आहे, तर उत्पन्नाचा विचार करता 3 लाख रु. पर्यंत उत्पन्न असणारे ग्राहक अधिक आहेत.

**कोष्टक क्र. १ : सर्वेक्षणातील ग्राहकांची सर्वसाधारण माहिती**

| वय वर्षे | % | शिक्षण | % | व्यवसाय | % | उत्पन्न (वार्षिक) | % |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १८.२५ | ३३.३ | >H.S.C | ३३.३ | नोकरदार | ६८.३ | १ लाख रू. | ३६.७ |
| २६-३५ | ३१.७ | H.S.C | २०.० | व्यावसायिक | ६.७ | १-३ लाख रू. | ३० |
| ३५-५० | २८.३ | पदवीधर | ३३.३ | विद्यार्थी | १३.३ | ३-८ लाख रू. | २० |
| ५१-६० | ६.७ | पदव्युत्तर | १३.४ | निवृत्त व इतर | ११.७ | ८-१० लाख रू. | ९.३ |
| ६० < | ००.० | | | | | १० लाख < | ४. |

**संदर्भ :** कोल्हापूर शहरातील सर्वेक्षण

व्यापारी बॅकांनी बसवलेल्या ए.टी.एम. मध्ये पैसे काढणे, शिल्लक तपासणे, खाते उतारा घेणे मोबाईल रिचार्ज करणे, पैसे ट्रान्स्फर करणे, देणगी देणे, पीन नंबर बदलणे इत्यादी सेवा उपलब्ध असल्या,तरी प्रत्यक्षात बहुतांश ग्रहक सर्व सेवांचा लाभ घेत नाहीत. 33.3% ग्राहक केवळ पैसे काढण्यासाठी तर 16.7% ग्राहक पैसे काढणे व शिल्लक तपासणे, 36.7% ग्राहक पैसे काढणे, शिल्लक तपासणे आणि खाते उतारा घेण्यासाठी ए.टी.एम. चा वापर करतात. (पहा कोष्टक क्र. 2) मोबाईल रिचार्जसाठी ए.टी.एम. चा वापर करणारे ग्राहक केवळ 10% आहेत. तर देणगी देण्यासाठी व पैसे पाठविणेसाठी ए.टी.एम् चा वापर केला जात नसल्याचे दिसून आलेले आहे. कोष्टक क्र.2 वरुन असेही दिसून येते की,46.7% लोक महिन्यातून 1-5 वेळा, 38.3% महिन्यातून 11-15 वेळा, 10% लोक महिन्यातून 6-10 वेळा ए.टी.एम. सेवेचा वापर करतात. तथापि, 15 पेक्षा जास्त वेळा वापर करणाऱ्या ग्राहकांचे प्रमाण केवळ 5%आहे.

| कोष्टक क्र. २ : ए.टी.एम् सेवांचा वापर | | | |
|---|---|---|---|
| महिन्यातील सरासरी वापर | % | सेवा प्रकार | % |
| १ ते ५ वेळा | ४६.७ | पैसे काढणे, | ३३.३ |
| ६ ते १० वेळा | १०.० | पैसे काढणे, शिल्लक तपासणे | १६.७ |
| ११ ते १५ वेळा | ३८.३ | पैसे काढणे, खातेउतारा घेणे | ३.३ |
| १६ ते २० वेळा | ५.० | पैसे काढणे, शिल्लक, खातेउतारा | ३६.७ |
| दररोज | ००.० | पैसे काढणे, शिल्लक, खातेउतारा व मोबाईल रिचार्ज | १०.० |
| संदर्भ : कोल्हापूर शहरातील सर्वेक्षण | | वरील सर्व सेवाबरोबर देणगी देणे व पैसे पाठविणे | ००.० |

### 3.1 राष्ट्रीयकृत बँकांच्या ए. टी. एम. सेवा

भारतीय बँकींग व्यवसायातील वाढत्या स्पर्धेमुळे राष्ट्रीयकृत बँकाही दर्जेदार सेवा उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न करीत आहेत. तथापि ए. टी. एम. सेवाविषयक प्रत्यक्ष ग्राहकांच्या प्रतिक्रिया कोष्टक क्र.3 मध्ये दर्शविलेल्या आहेत.

| कोष्टक क्र. ३ ATM सेवेबाबत राष्ट्रीयकृत बँकांच्या ग्राहकांची प्रतिक्रिया (%) | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | निर्देशकाचे क्रमांक | | | | | | | | | | |
| प्रतिक्रिया | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| पुर्ण असमाधानकारक | - | - | - | - | - | - | १० | - | - | ३.३ | |
| असमाधानकारक | २० | - | - | - | - | - | - | २३.३ | १३.३ | - | - |
| मध्यम | - | १० | - | १० | १० | १० | १० | २० | ४० | २० | - |
| समाधानकारक | ४३.३ | ७३.३ | ४३.३ | ५३.३ | ६३.३ | ७३.३ | २३.३ | २६.७ | ३६.७ | ६६.७ | ५३.३ |
| पुर्ण समाधानकारक | ३६.७ | १६.७ | ५६.७ | ३६.७ | २६.७ | १६.७ | ५६.७ | ३० | १० | १० | ४६.७ |
| टिप : १ ते ११ हे २.१ मध्ये दिल्याप्रमाणे निर्देशकाचे क्रमांक आहेत. | | | | | | | | | | | |

संदर्भ : कोल्हापूर शहरातील सर्वेक्षण

राष्ट्रीयकृत बँकांच्या ए. टी. एम. सेवेची कार्यक्षमता (3) व संपर्क यंत्रणा (11) याबाबत बहुतांश ग्राहक समाधानी आहेत. तर सेवेची उपलब्धता (9) याबाबत 10 ते 23% च ग्राहक समाधानी आहेत. तथापि सेवेतील परिपूर्णता (2), सुरक्षितता (4), सुलभता (5) व सोयीस्करतेबाबत (6) 10% ग्राहक ना समाधानी ना असमाधानी अशा मध्यम स्थितीत आहेत. म्हणजेच राष्ट्रीयकृत बँका ए.टी.एम. सेवेतील परिपूर्णता, सुरक्षितता, सुलभता व सोयीस्कर हाताळणी पध्दती उपलब्ध करुन देण्यामध्ये कमी पडत आहेत.

### 3.2 खाजगी बँकांच्या ए.टी.एम. सेवा

खाजगी व्यापारी बँका व्यावसायिक दृष्टिकोन डोळ्यासमोर ठेवून ग्राहकांना अधिकाधिक स्पर्धात्मक पध्दतीने उत्तम सेवा पुरवण्याचा प्रयत्न करीत असतात. कोष्टक क्र. 4 नुसार असे म्हणता येते की,(1) खाजगी बँकांच्या ए टी. एम. सेवेमधील परिपूर्णता (2),कार्यक्षमता (3) व संपर्क यंत्रणेबाबत बहुतांश ग्राहक समाधानी व पूर्ण समाधानी आहेत. तर ए. टी. एम. मधील सुलभता (4) सोयीस्करता (6) एम. टी. एम. च्या समस्येबाबत बँकेचा जबाबदारपणा (8) व बँकेची समस्या हाताळण्याची

प्रक्रिया याबाबत बहुतांश ग्राहक समाधानी असले तरी 6.7% ते 13.3% ग्राहक ना समाधानी ना असमाधानी या स्थितीत आहेत. तथापि , ए. टी. एम.सेवेची उपलब्ध (1) सुरक्षितता (4) मितव्ययता (7) व संपर्क यंत्रणा (10) बाबत 6.7% ते 26.7% ग्राहक असमाधानी किंवा पूर्ण असमाधानी आहेत.

**कोष्टक क्र. ४ : ATM सेवेबाबत खाजगी बँकांच्या ग्राहकांची प्रतिक्रिया (%)**

| | निर्देशकाचे क्रमांक | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्रतिक्रिया | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| पुर्ण असमाधानकारक | – | – | – | – | – | – | १३.३ | – | – | ६.७ | |
| असमाधानकारक | २६.७ | – | – | १० | – | – | – | – | – | – | – |
| मध्यम | – | – | – | ३० | ६.७ | १० | ६.७ | १३.३ | १३.३ | ६.७ | – |
| समाधानकारक | ४६.६ | ९० | ४६.७ | ३६.७ | ८० | ८६.७ | ३० | ४६.७ | ३० | ६६.७ | १३.३ |
| पुर्ण समाधानकारक | २६.७ | १० | ५३.३ | २३.३ | १३.३ | ३.३ | ५० | ४० | ५० | २० | ४६.७ |

टिप : १ ते ११ हे २.१ मध्ये दिल्याप्रमाणे निर्देशकाचे क्रमांक आहेत.

संदर्भ : कोल्हापूर शहरातील सर्वेक्षण

### 3.3 तुलनात्मक स्थिती व उपाययोजना :

ए.टी.एम.सेवा या तंत्रज्ञानाधारित असल्यामुळे तिच्या काही निर्देशांकाबाबत खाजगी व राष्ट्रीयकृत बँकेच्या ग्राहकांच्या प्रतिक्रिया सारख्याच आहेत. राष्ट्रीयकृत व खाजगी व्यापारी बँकांच्या ए. टी. एम. सेवांचा दर्जा व त्यामुळे ग्राहकांना मिळणारे समाधान यामध्ये फारसा लक्षणीय फरक नाही. तथापि काही गुण वैशिष्ट्यांमध्ये निश्चितपणे फरक आहे. या सेवेतील सुरक्षिततेबाबत खाजगी बँकांचे ग्राहक राष्ट्रीयकृत बँकांच्या ग्राहकापेक्षा अधिक असमाधानी आहेत. तसेच समस्या हाताळणी पध्दती व जबाबदारपणा याबाबत खाजगी बँकांचे ग्राहक राष्ट्रीयकृत बँकांच्या ग्राहकांपेक्षा अधिक असमाधानी आहेत.सुधारुन खाजगी बँकांनी ए.टी.एम सेवेतील सूरक्षितता व राष्ट्रीयकृत बॅकानी समस्या पडताळणी सुधारुन जबाबदारीची भावना स्वीकारल्यास ए. टी. एम. ग्राहकांच्या समाधनपातळीत वाढ होऊ शकते. तंत्रज्ञानावर आधारित सेवामध्ये सूरक्षितता अत्यंत महत्त्वाची असल्याने ग्राहकांची या सेवेवरील विश्वासार्हता वाढवण्यासाठी सुरक्षिततेसाठी अधिकाधिक उपाय योजने आवश्यक आहे.तथापि, जेथे बँक कर्मचाऱ्यांच्या वर्तनाचा संबंध येतो तेथे राष्ट्रीयकृत बँकांचे ग्राहक असमाधनी असल्याचे दिसून येते. यावरुन असे म्हणता येते की, या बँकानी ए. टी. एम. सेवेचा दर्जा वाढवण्यासाठी प्रामुख्याने सुरक्षितता, जबाबदारपणा, मितव्ययता व समस्या हाताळणी पध्दती यामध्ये बदल करणे आवश्यक आहे. तसेच राष्ट्रीयकृत व खाजगी बॅकांनी बसवलेल्या ए.टी.एम. ची संख्या वाढवणे, नेटवर्क जोडणीतील सातत्यता व सेवेतील नियमितता ठेवणे आवश्यक आहे.

### पुढील संशोधनाची दिशा

सेवा क्षेत्रामध्ये विशेषतः आधुनिक बँकींग सेवा वापरणाऱ्या ग्राहकांची समाधानपातळी मोजण्यासाठी त्या सेवांचा दर्जा व प्रत्यक्ष प्राप्त झालेले सकल मूल्य उपयुक्तता मोजणे आवश्यक आहे. सदर संशोधन एका शहरातील मोजक्या बँका

व ग्राहकांच्या सर्वेक्षणावर आधारित असले तरी या शोधनिबंधात वापरलेल्या निर्देशकांच्या आधारे व्यापक संशोधन कार्य हाती घेता येईल.

## संदर्भ सूची :-


1 Arora and Malhotra, (1997), Customer Satisfaction: A Comparative Analysis of Public and Private Sector Banks, Decision, Vol. 24. No. 1 (Jan-Dec,1997).

2 Cronin and Taylor, (1994). SERVPERF versus SERVQUAL: Reconciling Performance-Based and Perceptions-Minus-Expectations Measurement of Service Quality, The Journal of Marketing, Vol. 58, 1(Jan, 1994) pp 125-131

3 Deepak Bhandari & Amit Sharma, (2009), Marketing of Service, Vrinda Publications Pvt, Ltd. Delhi, ISBN-978-91-8281-287-9

4 Jham V. and Khan K. M. (2008) Customer Satisfaction in the Indian Banking: A study, IIBM Management Review, Vol 20, No. 1

5 Komal, Singh, S. (2009), Impact of ATM on Customer Satisfaction (A Comparative Study of SBI ICICI & HDFC bank) Business Intelligence Journal – August, 2(2), 276-87.

6 Mobarek, A. (2007). E-Banking Practices and Customer Satisfaction- A Case Study in Botswana, Electronic copy available at http://papers.ssrn.com/so13/papers. cfm? abstract-id 1011112

7 Oliver Richard L., 1980. A Cognitive Model of the Antecedents and Consequences of Satisfaction Decisions, Journal of Marketing Research, Vol. 17,No. 4(Nov., 1980) pp. 460-469

8 Parasuraman A. Zeithaml Valarie A. and Malhotra Arvind, 2005. E-S-QUAL: A Multiple-Item Scale for Assessing Electronic Service Quality, Journal of Service Research, Volume 7, No. X, Month 2005 1-21

9 Parasuraman, A. Valarie A. Zeithaml, Leonard L. Berry, 1985 A Conceptual Model of Service Quality and Its Implications for Future Research, The Journal of Marketing, Vol. 49, No. 4 (Autumn, 1985) pp.41-50.

10 Parasuraman, A., Zeithaml, V. A., & Berry, L. L., 1988 "SERVQUAL: A Multiple- Item Scale For Measuring Consumer Perceptions Of Service Quality", journal of Retailing, Spring, Volume 64 Number 1, pp. 12-40

11 T.M. Bhasin, (2003),"E-commerce in Indian Banking" Autherspress, New Delhi, ISBN-81-7273-108-6

12 Zeithaml, Barry and Parasraman, 1993,The Nature and Determinants of Customer Expectations of Service, Journal of the Acadcemy of Marketing Science, Volume 21 Number1, pages 1-12

13 Zeithml Valarie A., Parasurarman A. and Malhotra Arvind, 2002/ Service Quality Delivery Through Web Sites: A Critical Review of Extent Knowledge, Journal of the Academy of Marketing Science, Volume 30, No 4 pages 362-375.

14 Zeithaml, A. Parasuraman, and Arvind Malhotra, 2000, "A Conceptual Framework for Understanding e-Service Quality: Implications for Future research and Managerial Practice wonking paper, report No 00 – 115, Marketing Science Institute Cambridge, MA.

15 Basic Statistical Returns of Scheduled Commercial Banks In India, 2005 to 2009.

# स्वर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजनेचा लाभार्थींवरील आर्थिक परिणाम

**राजेंद्र य.शिंदे**

अर्थशास्त्र विभाग प्रमुख ,

पेमराज सारडा महाविद्यालय,अहमदनगर

भ्रमणभाष.९४२२३७९१०४१

Email - dr.r.y.shinde@gmail.com

संशोधकाने प्रा.डॉ.व्ही.डी.बर्वे यांच्या मार्गदर्शनाखाली Study of Swarnjayanti Gram Swarojgar Yojana : An Economic Impact on Beneficiaies since 1999- 2000 to 2003-2004 with special reference to Ahmednagar District" या विषयावर पुणे विद्यापीठाची पीएच.डी.पदवी संपादन केली आहे. सदर प्रबंधनावर आधारीत हा लेख आहे.

## 1) प्रस्तावना

अल्पविकसित देशांनी आर्थिक नियोजनाचा अवलंब करून विकासाकडे वाटचाल सुरु केली आहे.अशा देशांमध्ये अल्प उत्पन्न ,दारिद्रय ,बेकारी ,अल्प उत्पादकता ,पायाभूत सेवांचा अभाव ,अपुरे भांडवल इत्यादी समस्यांचे अस्तित्व जाणवते, याला भारतदेशही अपवाद नाही.भारताच्या आर्थिक विकासातील मुख्य अडथळा म्हणजे दारिद्रय होय.दारिद्रय निर्मूलनासाठी जागतिक पातळीवर अनेक प्रयत्न करण्यात आले आहेत. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारत सरकारनेही दारिद्रय निर्मूलनाचे विविध कार्यक्रम हाती घेतले.यापैकीच एक महत्त्वाचा कार्यक्रम म्हणजे स्वर्ण जयंती ग्रामस्वरोजगार योजना होय.या योजनेला सन 2009 मध्ये दहा वर्ष पूर्ण झाले आहेत. सन 2009 साली या योजनेची पुनरचना करून 'राष्ट्रीय ग्रामीण जीवन मिशन '(National Rural Livelihood Mission) असे नामकरण करण्यात आले.

अहमदनगर जिल्हा महाराष्ट्रात क्षेत्रफळाने सर्वात मोठा जिल्हा आहे.या जिल्ह्यातील स्वर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजनेअंतर्गत लाभार्थींच्या आर्थिक जीवनावर योजनेचा परिणाम पडताळण्याचा प्रयत्न संशोधकाने केला

आहे.संशोधकाने आपला प्रबंध दोन विभागात विभागला आहे.पहिल्या विभागात प्रस्तावनेदाखल आर्थिक विकासाशी निगडीत बाबी, योजनेवर दृष्टीक्षेप व योजनेची जिल्हयातील कार्यपद्धती उल्लेखलेली आहे. तर दुसऱ्या विभागात संशोधन पध्दती ,प्राथमिक स्रोतांचे विश्लेषण ,निष्कर्ष आणि शिफारशी यांचा सामावेश आहे.

## 2)स्वर्ण जयंती ग्रामस्वरोजगार योजना - एक दृष्टिक्षेप :

1 एप्रिल 1999 पासून भारतात केंद्र सरकारने दारिद्रय निर्मूलनाच्या मुख्य उद्देशाने स्वर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजना सुरू केली. एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम (IRDP), स्वरोजगार ग्रामिण युवक प्रशिक्षण कार्यक्रम (TRYSEM), ग्रामीण क्षेत्र महिला व बाल विकास कार्यक्रम (DWCRA), गंगा कल्याण योजना (GKY)यांचे विलिनीकरण करून ही योजना तयार करण्यात आली.ग्रामीण भागातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबाचे दोन वर्षात दरमहा उत्पन्न रूपये 2000 पेक्षा अधिक मिळवून देणे; व त्यांना दारिद्रयातून बाहेर काढण्याच्या हेतूने, ही योजना सुरू करण्यात आली.जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा ( DRDA) कडून ह्या योजनेची अंमलबजावणी केली जाते. केंद्र सरकार 75%; तर राज्य सरकार 25% रक्कम योजनेवर खर्च करते.स्वयं सहाय्यता समूह व वैयक्तिक अशा दोन्ही पातळीवर योजना राबविली जाते.बँका,पंचायतराज संस्था, स्वयंसेवी संस्था आणि लाईन डिपार्टमेंट हे देखील या योजनेच्या अंमलबजावणीत महत्त्वाची भूमिका बजावतात.

## 3) संशोधनाची उद्दिष्टये :

1) स्वातंत्र्यप्राप्ती नंतरच्या दारिद्रय निर्मूलनाच्या योजना अभ्यासणे.

2) स्वर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजनेच्या अंमलबजावणी नंतर स्वरोजगारीच्या आर्थिक स्थितीतील बदल अभ्यासणे.

3) स्वर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजनेचे परिणाम तपासणे.

4) स्वर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजनेच्या अंमलबजावणीत स्वयंसेवी संस्थांची भूमिका पडताळणे.

5) स्वरोजगाऱ्यांच्या प्रशिक्षण कार्यक्रमांचे महत्त्व अभ्यासणे.

6) स्वर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मार्ग सुचविणे.

7) स्वर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजनेच्या अंमलबजावणीतील समस्या अभ्यासणे.

## 4) गृहितकृत्ये :-(Hypothesis)

1)ग्रामीण लोकांच्या राहणीमान दर्जा उंचावण्यात स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना उपयुक्त आहे.

2)ग्रामीण भागातील दारिद्रय निर्मूलनासाठी स्वर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजनाची उपयुक्त आहे.

3)स्वर्णजयंती ग्रामस्वरोजगार योजना ग्रामीण लोकांच्या बचत प्रवृत्तीस प्रोत्साहन देते.

4) स्वरोजगारांकरीता प्रशिक्षण कार्यक्रम उपयुक्त आहे.

5) योजनेच्या विकासासाठी स्वयंसेवी संस्थाचा सहभाग महत्त्वाचा आहे.

6) योजनेच्या अंमलबजावणीत बँकांची भूमिका

महत्त्वाची आहे.

**5) संशोधन पद्धती** (Research methodology):

संशोधकाने प्रस्तुत संशोधनाकरीता सर्वेक्षण पध्दतीचा अवलंब केला आहे. प्राथमिक व दुय्यम स्रोतांचा अवलंब केला आहे.सर्वाधिक दारिद्रय असलेले चार तालुके अभ्यासाकरिता निवडले आहेत.

**6) तथ्यसंकलन**(Data collection):

प्राथमिक आणि दुय्यम स्रोतांच्या साह्याने तथ्यांचे संकलन करण्यात आले.प्राथमिक तथ्य संकलन करतांना नगर जिल्ह्यांतील सर्वाधिक दारिद्रय असलेले चार तालुके निवडण्यात आले.तालुक्यातील गावांची निवड ही लॉटरी पद्धतीने केली.निवडलेल्या गावातील सर्व लाभार्थी अभ्यासाकरिता निवडण्यात आले.सर्वेक्षणास 32 स्वयंसहायता समूह, 327 समूहातील सदस्य तर 60 वैयक्तिक स्वरोजगारांनी प्रतिसाद दिला.

जिल्हा परिषद ,पंचायत समित्या, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा (DRDA) यांचे वार्षिक अहवाल विविध वेबसाईट, मासिके इ. दुय्यम स्रोतांच्या आधारे माहिती संकलित करण्यात आली.

**7) संशोधनाची मर्यादा :**

1) संशोधनाकरीता 1999 -2000 ते 2003 ते 2004 या कालावधीत स्थापन झालेल्या स्वयं सहाय्यता समूह व वैयक्तिक लाभार्थींचा अभ्यास केला आहे.

2) बँका ,स्वयंसेवी संस्था ,जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांचे मत अजमावून घेतले नाहीं.

**8) निष्कर्ष :**

**8.1 समूहांचा दर्जा (gradation)**

**कोष्टक क्र.1**
**समूहाचा दर्जा**

| अ.न. | तहसील | समूहाचा दर्जा | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रथम | द्वितीय | नाही | माहिती नाही | |
| 1 | शेवगांव | 00 (00) | 05 (00) | 00 (00) | (00) (00) | 05 (100) |
| 2 | श्रीरामपुर | 01 (8.33) | 10 (83.33) | 01 (8.33) | 00 (00) | 12 (100) |
| 3 | नेवासा | 00 (00) | 06 (86) | 00 (00) | 01 (14) | 07 (100) |
| 4 | पाथर्डी | 00 (00) | 08 (100) | 00 (00) | 00 (00) | 08 (100) |
| 5 | एकूण | 01 (39) | 29 (91) | 01 (03) | 01 (03) | 32 (100) |

स्रोत - संकलित माहिती (कंसातील अंक टक्केवारी दर्शवितात)

कोष्टक क्र.1 वरून असे निदर्शनास येते की,शेवगांव व पाथर्डी तालुक्यातील 100% स्वयं सहाय्यता समूहांनी द्वितीय श्रेणी प्राप्त करून घेतली आहे. श्रीरामपूर व नेवासा तालुक्यात हे प्रमाण अनुक्रमे 83%व 86 % आढळते. सर्व साधारणपणे असे निदर्शनास येते, की 91% समूहांनी आपली द्वितीय श्रेणी प्राप्त करून आपली गुणवत्ता कायम ठेवली आहे.

## 8.2 समूह सदस्यांचा सामूहिक उत्पन्नातील सहभाग :

**कोष्टक क्र.2**

**सामूहिक उपक्रमातील सहभाग**

| अ.न. | तहसील | समूहीक उपक्रमातील सदस्यांचा सहभाग % | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | 50% | 75% | 100% | एकूण |
| 1 | शेवगांव | 00 (00) | 01 (20) | 04 (80) | 05 (100) |
| 2 | श्रीरामपुर | 05 (42) | 04 (33) | 03 (25) | 12 (100) |
| 3 | नेवासा | 00 (00) | 03 (43) | 04 (57) | 07 (100) |
| 4 | पाथर्डी | 03 (37.5) | 03 (37.5) | 02 (25) | 08 (100) |
| 5 | एकूण | 08 (25) | 11 (34) | 13 (41) | 32 (100) |

**स्रोत – संकलित माहिती** (कंसातील अंक टक्केवारी दर्शवितात)

कोष्टक क्र.2 वरून स्वयंसहाय्यता समूहातील सदस्यांचा सामूहिक उपक्रमातील सहभाग पडताळून पाहतांना असे निर्दशनास आले की, शेवगांवमधील 80 % समूहातील सदस्य 100% सहभागी होतात.श्रीरामपूर मधील 42 % समूहातील सदस्य फक्त 50 % सहभाग नोंदवतात. नेवासा 57 % समूहातील सदस्य 100% सहभागी होतात तर पाथर्डी तालुक्यातील फक्त 25 % समूहातील सदस्य सहभाग नोंदवतात. सर्वसाधारणपणे असे स्पष्ट होते, की 41% समूहातील सदस्य 100%, 34% समुहातील सदस्य 75 % तर 25% समूहातील 50% सदस्य आपला सहभाग नोंदवतात.

8.3 **समूहाअंतर्गत कर्ज प्राधान्य -**

**कोष्टक क्र.3**

**समूहाअंतर्गत कर्ज**

| अ.नं. | तहसील | उपभोग | उत्पन्न प्राप्ती | दोन्ही | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| 1 | शेवगांव | 01 (20) | 04 80 | 00 (00) | 05 (100) |
| 2 | श्रीरामपूर | 00 (00) | 12 (100) | 00 (00) | 12 (100) |
| 3 | नेवासा | 00 (00) | 07 (100) | 00 (00) | 7 (100) |
| 4 | पारनेर | 01 (12) | 04 (50) | 03 (38) | 08 (100) |
| 5 | एकूण | 02 (07) | 27 (84) | 03 (09) | 32 (100) |

**स्रोत - संकलित माहिती** (कंसातील अंक टक्केवारी दर्शवितात)

स्वंय सहायता समूहाअंतर्गत कर्जाचे वाटप करतांना उत्पन्न प्राप्ती किंवा उपभोग यापैकी कोणत्या घटकास समूह प्राधान्य देतो, याबाबत समूहांचे मत अजमावून घेतल्यावर असे निदर्शनास आले की, श्रीरामपूर व नेवासा तालुक्यातील सर्व समूहांनी उत्पन्न प्राप्ती हाच निकष कर्ज वाटपासाठी निर्धारीत केला. तर पाथर्डी मधील 50%, शेवगांवमधील 80% समूहांनी हाच निकष ठरविला आहे. सर्वसाधारणपणे 84% समूहांनी उत्पन्न प्राप्ती; तर फक्त 07% समूहांनी उपभोगाकरिता अंतर्गत कर्जाचे वाटप केले आहे.

**8.4 प्रशिक्षणाची उपयुक्तता:**

स्वर्ण जयंती ग्राम स्वरोजगार अंतर्गत लाभार्थींना प्रशिक्षण देण्याची तरतूद करण्यात आली आहे. प्रशिक्षणाचा प्रत्यक्ष व्यवहारातील उपयोग पुढील कोष्टकाने स्पष्ट होतो.

**कोष्टक क्र.4**

प्रशिक्षणाची उपयुक्तता

| अ.नं | तहसील | प्रशिक्षणाची उपयुक्तता | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 100% उपयुक्त | 75% उपयुक्त | 50% उपयुक्त | 25% उपयुक्त | 25%पेक्षा कमी उपयुक्त | |
| 1 | शेवगाव | 01 (20) | 00 (00) | 01 (20) | 03 (60) | 00 (00) | 05 (100) |
| 2 | श्रीरामपूर | 01 (09) | 07 (64) | 03 (27) | 00 (00) | 00 (00) | 11 (100) |
| 3 | नेवासा | 04 (57) | 03 (43) | 00 (00) | 00 (00) | 00 (00) | 07 (100) |
| 4 | पाथर्डी | 00 (00) | 00 (00) | 02 (09) | 01 (14) | 04 (57) | 07 (100) |
| 5 | एकूण | 06 (20) | 10 (34) | 06 (20) | 04 (13) | 04 (13) | 30 (100) |

**स्रोत - संकलित माहिती** (कंसातील अंक टक्केवारी दर्शवितात)

वरील कोष्टकानुसार नेवासा तालुक्यातील 57% समूहांच्या मते, सदस्यांना दिलेले प्रशिक्षण 100% उपयुक्त आहे. श्रीरामपूर मधील 64% समूहांच्या मते, प्रशिक्षण 75% उपयुक्त आहे. शेवगाव तालुक्यातील 60% समूहांच्या मते प्रशिक्षणाची उपयुक्तता फक्त 25% आहे. तर पाथर्डीतील 57% समूहांच्या मते, प्रशिक्षण 25% पेक्षा कमी उपयुक्त आहे. एकंदर 74% समूहांच्या मते, प्रशिक्षण कार्यक्रम 50% पेक्षा जास्त उपयुक्त ठरतो.

**8.5 स्वयंसेवी संस्थाची भूमिका** **कोष्टक क्र.5**

**स्वयंसेवी संस्थेची भूमिका**

| अ.नं | तहसील | प्रशिक्षणास प्रोत्साहन | आर्थिक उपक्रमास प्रोत्साहन | क्षमता विकास प्रोत्साहन | बाजारपेठ उपलब्धता | असमाधानी | पैकी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | शेवगाव | 04 (80) | 03 (60) | 00 (00) | 00 (00) | 00 (00) | 05 (100) |
| 2 | श्रीरामपूर | 10 (83) | 08 (67) | 05 (42) | 04 (33) | 00 (00) | 12 (100) |
| 3 | नेवासा | 5 (71) | 04 (57) | 2 (29) | 00 (00) | 02 (29) | 07 (100) |
| 4 | पाथर्डी | 05 (63) | 06 (75) | 01 (12) | 01 (12) | 02 (25) | 8 (100) |

**स्रोत - संकलित माहिती** (कंसातील अंक टक्केवारी दर्शवितात)

कोष्टक क्र.5 वरून असे स्पष्ट होते की, शेवगांव मधील 80 % समूहाच्या मते स्वयं सेवी संस्था त्यांना प्रशिक्षण घेण्यास प्रोत्साहित करतात. तर 60 % समूहांचा मते, स्वयंसेवी संस्था आर्थिक उपक्रम सुरू करण्यास प्रोत्साहित करतात. श्रीरामपूर मध्ये 83% समूहामध्ये प्रशिक्षण प्रोत्साहन व 67 % समूहाने आर्थिक उपक्रमास प्रोत्साहन मिळते. नेवासा व पाथर्डी तालुक्यात ही स्वयंसेवी संस्था प्रशिक्षण आर्थिक उपक्रमास प्रोत्साहन देतात. म्हणजेच स्वयंसेवी संस्था समूहाला प्रशिक्षण, आर्थिक उपक्रम क्षमता विकास यावर विशेष भर देतात.

**8.6 बँकांचे सहकार्य -**

**कोष्टक क्रमांक 6**
**बँकांचे सहकार्य**

| अ.नं. | तहसील | पूर्ण सहकार्य | अंशत: | असहकार्य | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| 1 | शेवगांव | 01 (20) | 04 80 | 00 (00) | 05 (100) |
| 2 | श्रीरामपूर | 10 (84) | 01 (08) | 01 (08) | 12 (100) |
| 3 | नेवासा | 06 (86) | 01 (14) | 00 (00) | 08 (100) |
| 4 | पाथर्डी | 01 (12.5) | 07 (87.5) | 00 (00) | 08 (100) |
| 5 | एकूण | 18 (56) | 13 (41) | 01 (03) | 32 (100) |

**स्रोत - संकलित माहिती** (कंसातील अंक टक्केवारी दर्शवितात)

कोष्टक क्र.6 नुसार श्रीरामपूर व नेवासा तालुक्यात अनुक्रमे 84 % व 86% समूहाच्या मते बँका पूर्णपणे सहकार्य करतात, तर पाथर्डी व शेवगाव येथील अनुक्रमे 87.5 % व 80% समूहांना बँका अंशत: सहकार्य करतात. सर्वसाधारपणे असे दिसते की, 56% समूहांच्या मते बँका पूर्णपणे सहकार्य करतात.

## 8.7 योजनेतील सहभागापूर्वीचे उत्पन्न :

**कोष्टक क्रमांक.7**

**वार्षिक उत्पन्न**

| वार्षिक उत्पन्न रू. | तहसील | | | |
|---|---|---|---|---|
| | शेवगांव | श्रीरामपूर | नेवासा | पाथर्डी |
| 2000 पर्यंत | 00 | 00 | 00 | 04 |
| 2001 ते 5000 | 06 | 21 | 02 | 07 |
| 5001 ते 10000 | 19 | 01 | 10 | 10 |
| 1001 ते 15000 | 11 | 85 | 38 | 14 |
| 15001 ते 20000 | 07 | 08 | 15 | 32 |
| 20001 ते 25000 | 00 | 20 | 07 | 07 |
| 25001 ते 30000 | 00 | 00 | 00 | 00 |
| 30000 पेक्षा जास्त | 00 | 00 | 00 | 00 |

**स्रोत - संकलित माहिती**

कोष्टक क्र. 7 नुसार शेवगावमधील सर्वच लाभार्थांचे योजनेत सहभागी होण्यापूर्वीचे वार्षिक उत्पन्न रू.15000 पेक्षा कमी आहे.श्रीरामपूर, नेवासा, पाथर्डीतील वार्षिक उत्पन्न 20,000 पेक्षा कमी आहे.म्हणजेच दरमहा रू 2000 पेक्षा कमी उत्पन्न लाभार्थींना योजनेतील सहभागापूर्वी मिळत होते.

8.8 योजनेतील सहभागानंतरचे सरासरी दरमहा उत्पन्नातील वाढ :

कोष्टक क्रमांक.8

दरमहा उत्पन्नातील वाढ (रू)

| वर्ष | तहसील | | | |
|---|---|---|---|---|
| | शेवगांव | श्रीरामपूर | नेवासा | पाथर्डी |
| 2000 | 00 | 00 | 1176 | 1200 |
| 2001 | 00 | 1130 | 1265 | 1322 |
| 2002 | 00 | 1979 | 1457 | 1563 |
| 2003 | 90 | 1398 | 1806 | 1632 |
| 2004 | 1207 | 1805 | 2002 | 1936 |
| 2005 | 1652 | 2166 | 2249 | 2148 |
| 2006 | 1974 | 1685 | 2474 | 2254 |
| 2007 | 2200 | 1768 | 2031 | 2023 |

स्रोत – संकलित माहिती

कोष्टक क्र.8 नुसार स्वरोजगारीचा योजनेत सहभाग नोंदवल्यानंतर पहिल्या पाच वर्षापर्यंत त्यांच्या दरमहा उत्पन्नात रू 2000 पर्यंत वाढ होऊ शकली नाही . सहाव्या वर्षानंतर मात्र उप्पन्न दरमहा 2000 पेक्षा जास्त वाढले आहे. म्हणजेच योजनेचे उद्दिष्ट्य साध्य करण्यास तीन ते चार वर्ष विलंब लागतो.

### 8.9 वैयक्तिक स्वरोजगाराचे योजनेतील सहभागापूर्वीचे वार्षिक उत्पन्न :

**कोष्टक क्रमांक.9**

वैयक्तिक स्वरोजगाराचे योजनेतील सहभागापूर्वीचे वार्षिक उत्पन्न

| वार्षिक उत्पन्न रूपये | तहसील | | | |
|---|---|---|---|---|
| | शेवगांव | श्रीरामपूर | नेवासा | पाथर्डी |
| शून्य | 00 | 00 | 00 | 00 |
| 2000 पर्यंत | 01 | 04 | 00 | 00 |
| 2001 ते 5000 | 00 | 03 | 03 | 01 |
| 5001 ते 10000 | 00 | 10 | 08 | 01 |
| 10001 ते 15000 | 03 | 02 | 08 | 06 |
| 15001 ते 20000 | 03 | 01 | 02 | 02 |
| 20001 ते 25000 | 00 | 00 | 01 | 00 |
| 25000 पेक्षा जास्त | 00 | 01 | 00 | 00 |

**स्रोत - संकलित माहिती**

कोष्टक क्र.9 नुसार वैयक्तिक स्व-रोजगारीचे योजनेत सहभागी होण्यापूर्वीचे वार्षिक उत्पन्न दर्शविले आहे.त्यानुसार 97 % स्व-रोजगाराचे दरमहा उत्पन्न 2000 पेक्षा कमी आहे.

### 8.10) उत्पन्नातील वाढ

**कोष्टक क्र.10**

**वैयक्तिक स्वरोजगारीचे योजनेमुळे वाढलेले दरमहा उत्पन्न (रूपये)**

| वर्ष | तहसील | | | |
|---|---|---|---|---|
| | शेवगांव | श्रीरामपूर | नेवासा | पाथर्डी |
| 1999 | 00 | 00 | 833 | 00 |
| 2000 | 00 | 1500 | 1201 | 1500 |
| 2001 | 00 | 1357 | 1709 | 1729 |
| 2002 | 1000 | 1857 | 2116 | 1911 |
| 2003 | 1667 | 1786 | 3347 | 2370 |
| 2004 | 1750 | 2208 | 2817 | 2730 |
| 2005 | 2083 | 2421 | 3160 | 2833 |
| 2006 | 2300 | 2658 | 3217 | 3000 |
| 2007 | 2433 | 3312 | 000 | 00 |

**स्रोत - संकलित माहिती**

कोष्टक क्र.10 नुसार असे लक्षात येते की योजनेत सहभागी झालेल्या पहिल्या 4 वर्षात स्वरोजगारीचे दरमहा उत्पन्न रू 2000 पेक्षा कमी आहे. पुढील वर्षात मात्र ते 2000 पेक्षा अधिक आहे.

**9) गृहितकृत्ये पडताळणी :**

संशोधनाकरीता जी गृहिते स्वीकारण्यात आली होती त्यांची पडताळणी केल्याने पुढील बाबी स्पष्ट झाल्या आहेत.

**1) ग्रामीण लोकांचा राहणीमानाचा दर्जा उंचावण्यात स्वर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजना उपयुक्त आहे.**

स्वरोजगारीच्या उत्पन्नात, बचतीत झालेली वाढ ,विविध जीवनाश्यक वस्तूंची खरेदी यावरून असे निदर्शनास येते की, ग्रामीण लोकांच्या राहणीमानाचा दर्जा उंचावण्यात ही योजना उपयुक्त ठरली आहे.

**2) ग्रामीण भागातील दारिद्रय निर्मूलनासाठी स्वर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजना उपुयक्त आहे.**

योजनेत सहभागी झाल्यानंतर तीन वर्षांनी लाभार्थांचा दरमहा उत्पन्नात रूपये 2000 पेक्षा अधिक वाढ झाल्याने त्यांना दारिद्रयातून बाहेर येणे शक्य झाले असल्याने हे गृहित सिद्ध झाले आहे.

**3)स्वर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजना ग्रामीण लोकांना बचत प्रवृत्तीस प्रोत्साहन देते.**

स्वयं सहाय्यता समूहातील सदस्यां - बरोबरच वैयक्तिक स्वरोजगाराच्या बचतीत वाढ झाल्याने निश्चितच ग्रामीण लोकांचा बचत प्रवृत्तीत प्रोत्साहन मिळाल्याचे सिद्ध होते.

**4) स्वरोजगारीकरिता प्रशिक्षण कार्यक्रम उपयुक्त आहे.**

वैयक्तिक व समूहातील स्वरोजगारींना दिलेल्या प्रशिक्षणाबाबत मत अजमावले असता, प्रशिक्षणाची उपयुक्तता व महत्त्व स्पष्ट होते, म्हणजेच वरील गृहित सिद्ध होते.

**5) योजनेचा यशस्वितेसाठी स्वयंसेवी संस्थाची भूमिका महत्त्वाची आहे.**

स्वयं सहायता समूहांना स्वयंसेवी संस्थेकडून प्रशिक्षण पूर्ण करणे, क्षमता विकास, बाजारपेठांची उपलब्धता इ.बाबत प्रोत्साहन व सहकार्य मिळत असल्याने वरील गृहितकृत्य सिद्ध होते.

**6) योजनेच्या अंमलबजावणीत बँकांची भूमिका महत्त्वांची आहे.**

विविध निष्कर्षांवरून असे निदर्शनास येते की, बँकांचे पूर्णपणे सहकार्य स्वरोजगारींना मिळत आहे.त्यामुळे आर्थिक उपक्रम सुरू करणे स्वरोजगारींना सुलभ झाल्याने बँकांची भूमिका महत्त्वाची ठरली आहे.

**10) शिफारशी**

संशोधकाने अनेक शिफारशी केलेल्या आहेत.त्यातील काही शिफारशी पुढीलप्रमाणे:

**1) प्रशिक्षण :**

स्वरोजगाऱ्याला प्रशिक्षण देताना ते बाजाराशी निगडीत असे असावे प्रशिक्षण संस्थांची गुणवत्ता तपासूनच त्यांना सदर प्रशिक्षणाची परवानगी द्यावी. प्रशिक्षण हे उत्पादन खर्चात घट बाजार उपलब्धता यावर भर देणारे असावे .

**2) कर्ज पुरवठा :**

स्वयंसहाय्यता समूहाला कर्ज पुरवठा कमी व्याज दराने करावा. समूहातील सदस्यांच्या अंतर्गत बचतीचा निकष समोर ठेवून कर्ज पुरवठा करावा.

वैयक्तिक स्वरोजगाऱ्यास कर्ज पुरवठा करताना आर्थिक उपक्रमांचे स्वरूप व सत्यता पडताळून पहावी.

**3) आर्थिक उपक्रम :**

प्रत्येक स्वयंसहाय्यता समूहाने लवकरात लवकर आर्थिक उपक्रम सुरू करावे, याकरीता आर्थिक उपक्रमाबाबत शिथिलता असावी तसेच त्यात वैविध्य असावे.

**4)** बाजारपेठांच्या उपलब्धतेकरीता स्वयंसेवी संस्था,डी.आर.डी.ए. आणि बँका यांनी संयुक्त कार्यक्रम आखावा.

**5)** स्वयंसेवी संस्थांनी स्वरोजगारींना योजने - बाबतच्या कार्यालयीन कामाबाबत जागृत करावे.

**6)** योग्य ठिकाणी व अत्याधुनिक अशा पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात.

**7)** दारिद्रय सर्वेक्षण करतेवेळी इतर कार्यालयीन माहितीचा वापर करून दारिद्रय रेषेखालील कुटुंबांची यादी तयार करावी.

**8)** सुशिक्षित बेरोजगारांकरिता स्वतंत्र कार्यक्रम तयार करावा.

**9)** स्वरोजगारांचे स्वास्थ टिकवून ठेवण्यासाठी ही योजना निर्मलग्राम स्वच्छता योजनेशी संलग्नीत करावी.

**11 भविष्यातील संशोधन :**

भविष्यात सदर संशोधन समस्येची निगडीत पुढील संशोधन क्षेत्र सुचविता येतात.

1) स्वर्ण जयंती शहरी रोजगार योजनेचा अभ्यास,

2) स्वर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजनेच्या अंमलबजावणीत स्वयंसेवी संस्थांची भूमिका,

3) महिला बचत गट आणि ग्रामीण महिलांची आर्थिक स्थिती.

**संदर्भ सूची–**


1) Asian Development Bank (1994), Rural Poverty in Developing Asia Volume - I Bangaladesh, India, Shrilanka.

2) C.R. Kothari - Research Methodology & Techniques.

3) Devendra Thakur (1986) Rural Development & Planing in India.

4) K Sattesh Reddy ( 1998); Alleviation of Poverty and Unemployment Programe, Problems & Prospective.

5) R. Radhakrishna, Shovan Ray, Oxford Hand Book of Poverty in India Prospective, Policies & Programme.

6) S.K. Mishra & V.K. Puri (2006) Indian Economy Reports : -

1) Annual Report DRDA, Ahmednagar.

2) Guidline SGSY -Rual Ministry of India. Website : -

1) wwwigidr.or.in

2) www.rural.nic.in

3)www.planningcommision.nic.in

4)www.nabard.com.

5)www.graamcen.com

# सुवर्ण महोत्सवी महाराष्ट्रात 'आदिवासी'

**मारोती तेगमपुरे**
अंबड, जि.जालना
भ्रमणभाष : 9420072992

संयुक्त महाराष्ट्राचे सुवर्ण महोत्सवी वर्ष सुरू झाले असून मुंबईसह संयुक्त महाराष्ट्रासाठी अविस्मरणीय चळवळीत बलिदान दिलेल्या 105 शहिदांचे स्मरण करून आजच्या महाराष्ट्राचे मूल्यांकन करणे आवश्यक आहे आणि त्यानंतर महाराष्ट्रातील आदिवासींचे जनजीवन महाराष्ट्राच्या 50 वर्षांत कुठे पोहचले, त्याचाही आढावा घेणे महत्त्वपूर्ण ठरेल.

आज भारतातील सिंचनाचे प्रमाण 42 टक्के असताना गेल्या पन्नास वर्षांत राज्यातील लागवडीलायक जमिनीपैकी अवघी 17 टक्के जमीन ओलिताखाली येऊ शकली. यामध्ये सुद्धा मोठ्या प्रमाणात विभागवार असमतोल असल्याचे पहावयास मिळतो. या काळात महाराष्ट्रातील नोंदणीकृत बेरोजगारांची संख्या 40 लाखांवर; तर एकूण बेरोजगारांची संख्या 1 कोटीवर जाऊन पोहचली. वीज ग्राहकांचे हित आणि 24 तास वीज या कायद्यातील तरतूदी फक्त कागदावरच राहिल्या. राज्यकर्त्यांच्या निष्क्रिय आणि नियोजनशून्य कारभारामुळे वीज निर्मितीत पुरेशी वाढ झाली नाही. जनतेवर लादलेली जबरदस्त वीज दर वाढ आणि विजेच्या असह्य भारनियमनामुळे राज्यभर पसरलेले अंधाराचे साम्राज्य हे चुकीच्या धोरणांचेच परिणाम असल्याचे स्पष्ट झाले. महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील वाढते दारिद्रय व बेकारी यामुळे शहरी भागाकडे होणाऱ्या स्थलांतरामध्ये वाढ झाली. शासनाच्या अक्षम्य उदासीनतेमुळे शहरामध्ये झोपडपट्ट्यांचा प्रश्न अतिशय उग्र रूप धारण करीत आहे. शिक्षण क्षेत्रातील विना अनुदान तत्त्वामुळे आणि शिक्षणाच्या खाजगीकरणामुळे लुटारू शिक्षण सम्राटांचा वेगळा वजनदार थर निर्माण झाला आणि परिणामी शिक्षणाचा दर्जा ढासळला.

महाराष्ट्राच्या गेल्या पाच दशकांच्या काळात भांडवलदारी विकासाच्या मार्गामुळे असमतोल विकास होत गेला. कोकण, विदर्भ व मराठवाडा या सारख्या मागास विभागाचा रस्ते, उद्योग, सिंचन,शिक्षण अशा सर्वच क्षेत्रातील

अनुशेष वाढतच गेला व आजही वाढत जात आहे. वास्तविक पाहता मुंबई,ठाणे,रायगड,पुणे व नाशिक या जिल्ह्याचा शहरी औद्योगिक पट्टा सोडला तर उर्वरित महाराष्ट्राच्या विकासाची पातळी देशाच्या सरासरीपेक्षा कितीतरी कमी आहे. आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांच्या संख्येत राज्य अग्रेसर राहिले आहे. या काळात सिलींग कायद्याला सुरूंग लावून सरकारने शेतीच्या कंपनीकरणाला आणि कंत्राटी शेतीला चालना दिली.हजारो एकर शेत जमिनी देशी-विदेशी कंपन्यांना कवडीमोल दामाने देण्यात आल्या. या काळात उद्योगाच्या क्षेत्रात हजारो गिरण्या-कारखाने व औद्योगिक वसाहती बंद पडून लाखो कामगारांना वाऱ्यावर सोडून देण्यात आले.

सदरहू काळात निव्वळच विकास झाला नाही, असे म्हणता येणार नाही.विकास झाला हे खरे असले तरी विकासाची गंगा सामान्यजनांपर्यंत पोहचली नाही. या संदर्भात नोबेल पुरस्कार प्राप्त अर्थतज्ज्ञ डॉ.अमर्त्य सेन यांच्या मते,''देशाच्या आर्थिक विकासाकरिता राष्ट्रीय उत्पन्नातील वाढ आवश्यक असली तरी ती पुरेशी; मात्र निश्चित नाही. राष्ट्रीय उत्पन्नाचा संबंध जोपर्यंत उत्पन्नाच्या न्याय्य वितरणाशी जोडला जात नाही, तो पर्यंत सर्व विकास हा निरर्थक ठरतो. उत्पन्नाच्या वाढत्या प्रमाणाबरोबरच समाजातील दुर्बल घटकांचे जीवनमान जोपर्यंत उंचावणार नाही तोपर्यंत वाढत्या उत्पन्नाच्या प्रमाणास अर्थ प्राप्त होणार नाही. आर्थिक विकासासोबतच सामान्य माणसांचे राहणीमान, आरोग्य,शैक्षणिक विकास यासह सामाजिक व आर्थिक सेवा सुविधा उपलब्ध होणे,सामूहिक निर्णय प्रक्रियेत त्यांचा सहभाग असणे हे झाले तरच खऱ्या अर्थाने विकास झाला असे म्हणता येईल.''[1] या अर्थाने महाराष्ट्र अतिशय पिछाडीवर राहिला आहे असे विधान केल्यास चुकीचे ठरणार नाही.

या सर्व बाबतीत पिछाडीवर असतानाच महाराष्ट्रावर कर्ज करून ठेवण्याच्या बाबतीत मात्र शासनकर्त्यांनी आघाडी घेतली आहे.1995 साली राज्यावरील कर्ज 28,000 कोटी रूपयाचे होते.1999 साली राज्यावरील कर्जात वाढ होऊन ते 48,000 कोटी रूपये झाले.अगदी अलीकडील कर्जाचे आकडे पाहिल्यास या बाबतीत महाराष्ट्र 1 लाख 85 हजार कोटी रूपयापर्यंत जाऊन पोहचला आहे.महाराष्ट्राच्या ह्या सर्वांगीण आर्थिक अरिष्टामुळे विकासाची कामे ठप्प झाली, कल्याणकारी योजना रखडल्या आणि सर्व सामान्य जनतेला प्रत्येक क्षेत्रात न्याय नाकारला गेला. याच काळात धनाढ्यावरील सवलतींचा वर्षाव मात्र कायम राहिला. राज्यातील जनतेचे प्रश्न अनेक अंगाने वाढत आहेत. यातही सर्वात वंचित आणि दुर्लक्षित असलेल्या आदिवासी समूहाची स्थिति आणखी वेगळी आहे.

(ब)

**आदिवासी म्हणजे कोण ?**

आदिवासी लोकांना पूर्वी 'निषाद' असे संबोधले जात होते. निषाद या शब्दाचा अर्थ जंगलात राहणारे लोक असा होतो. उत्तरेकडील भागात आदिवासी लोकांना 'किरात' असे संबोधले जात होते.आदिवासी या शब्दाचा शब्दश: अर्थ असा होतो की, एका विशिष्ट भू-प्रदेशात आदिकाळापासून वास्तव्य करीत असलेली जमात होय.[2]

डॉ. रिव्हर्स यांच्या मते,''ज्या समूहातील लोक एक समान भाषा बोलतात, युद्ध वगैरे सारख्या उद्दीष्टपूर्तीकरिता एक होऊन झटतात अशा सरळ व साध्या सामाजिक समूहाला 'आदिवासी समाज' असे म्हणतात.[3]

1962 मध्ये शिलाँग येथे झालेल्या

आदिवासी समितीच्या परिषदेने आदिवासींची अशी व्याख्या केली आहे की, "एका समान भाषेचा वापर करणाऱ्या, एकाच पूर्वजापासून उत्पत्ती सांगणाऱ्या, एका विशिष्ट भू-प्रदेशात वास्तव्य करणाऱ्या, तंत्रशास्त्रीय ज्ञानाच्या दृष्टीने मागासलेला, अक्षर ओळख नसलेला व रक्त संबंधावर आधारित सामाजिक व राजकीय रीतिरिवाजांचे प्रामाणिकपणे पालन करणाऱ्या एकजिनसी गटाला आदिवासी समाज असे म्हणतात,"[4] उपरोक्त लोक समूहास आदिवासी समजण्यास हरकत नाही.

**(क)**

देशात आदिवासी लोकसंख्येत कशा पध्दतीने वाढ झाली हे आपणास पुढील तक्त्यांच्या सहाय्याने समजून घेता येईल.

### 1. भारतातील आदिवासी लोकसंख्या

तक्ता क्रमांक 1 मध्ये भारतातील एकूण आदिवासी लोकसंख्या दर्शविली आहे.

**तक्ता क्र.1**

भारतातील आदिवासी लोकसंख्या (आकडे कोटीत)

| वर्ष | एकूण लोकसंख्या | आदिवासी लोकसंख्या | एकूण लोकसंख्येशी आदिवासी लोकसंख्येचे प्रमाण |
|---|---|---|---|
| 1951 | 36.6 | 1.91 | 5.36 |
| 1961 | 43.92 | 3.01 | 6.85 |
| 1971 | 54.82 | 3.80 | 6.93 |
| 1981 | 68.52 | 5.16 | 7.53 |
| 1991 | 84.63 | 6.78 | 8.01 |
| 2001 | 102.6 | 8.43 | 8.19 |

Source - Govt. of India, Annual Report 2004-2005, Ministry of Tribal Affairs, New Delhi, P-31

तक्ता क्र.1 मध्ये दिलेल्या भारतातील आदिवासी लोकसंख्येच्या आकडेवारीवरून दृष्टिक्षेप टाकल्यास असे दिसते की, देशातील आदिवासी लोकसंख्या 1951 ते 2001 या काळात सातत्याने वाढली आहे. 1951 मध्ये एकूण लोकसंख्येच्या 5.36 टक्के असलेली आदिवासी लोकसंख्या 2001 मध्ये 8.19 टक्के इतकी झाली. म्हणजे याच काळात आदिवासी लोकसंख्येमध्ये वाढ झाल्याचे दिसते. स्वातंत्र्या नंतर घेण्यात आलेल्या सहाही जनगणने मध्ये एकूण लोकसंख्येसोबत आदिवासी लोकसंख्याही वाढत असल्याचे पहावयास मिळते.

### 2.आदिवासींचे दारिद्रय :

तक्ता क्र. 2 मध्ये देशातील आदिवासींचे दारिद्रय रेषेखालील प्रमाण दर्शविलेले आहे.

## तक्ता क्रमांक 2
## देशातील आदिवासींचे दारिद्रय रेषेखालील प्रमाण

| | 1993-94 | | 1999-2000 | | बदल* | |
|---|---|---|---|---|---|---|
| | ग्रामीण | शहरी | ग्रामीण | शहरी | ग्रामीण | शहरी |
| 1. दारिद्रय रेषेखालील एकूण लोकसंख्या | 37.37 | 32.18 | 27.09 | 23.62 | (-)10.18 | (-)10.64 |
| 2. दारिद्रय रेषेखालील आदिवासी लोकसंख्या | 51.94 | 41.14 | 45.86 | 34.75 | (-)6.08 | (-)6.39 |
| 1 व 2 मधील फरक | 14.67 | 7.48 | 18.77 | 11.13 | 4.10 | 3.65 |

Source - Govt. of India, Tenth Five Year Plan (2002-07, Volume II Sectoral Policies and Programmes' Planning Commission, New Delhi, P-455

टिप:* 1993-94 ते 99-00 ह्या काळातील बदल

तक्त्यात दर्शविलेली आकडेवारी असे स्पष्ट करते की, 1993-94 मध्ये देशातील 51.14 टक्के आदिवासी ग्रामीण भागामध्ये, तर 41.14 टक्के आदिवासी शहरी भागात दारिद्रय रेषेखाली जीवन जगत असल्याचे पहावयास मिळते. 1999-2000 मध्ये ग्रामीण भागातील आदिवासींच्या दारिद्रय रेषेखालील प्रमाणात अल्पशी घट होऊन 54.86 टक्के झाल्याचे दिसते. या काळात शहरी भागातील आदिवासींच्या दारिद्रय रेषेखालील प्रमाणात 34.86 टक्के एवढी घट झाल्याचे दिसते.

एकूण लोकसंख्येच्या दारिद्रय रेषेखालील प्रमाणाशी आदिवासींच्या दारिद्रय रेषेखालील प्रमाणाची तुलना केल्यास (1993-94) असे दिसून येते की, ग्रामीण भागात 14.67 टक्के, तर शहरी भागात 7.48 टक्के आदिवासी एकूण लोकसंख्येपेक्षा जास्त दारिद्रय रेषेखालील होते.

1993-94 ते 1999-2000 या कालावधीमध्ये आदिवासी लोकसंख्येचे दारिद्र रेषेखालील प्रमाण ग्रामीण भागामध्ये 6.08 टक्के, तर शहरी भागामध्ये 6.39 टक्के इतके कमी झाल्याचे दिसून येत असले तरीही एकूण लोकसंख्येच्या तुलनेत आदिवासी लोकसंख्येतील दारिद्रय रेषेखालील लोकसंख्येचे प्रमाण ग्रामीण आणि शहरी भागात अधिक असल्याचे दिसून येते.

**3.आदिवासी समुदायाच्या साक्षरतेचे प्रमाण:**

भारतातील आदिवासींच्या साक्षरतेचे प्रमाण तक्ता क्रमांक 3 मध्ये दिले आहे.

## तक्ता क्र.3
## आदिवासी समुदायाच्या साक्षरतेचे प्रमाण

(टक्केवारी)

| वर्ष | एकूण लोकसंख्येतील साक्षरतेचे प्रमाण | आदिवासी लोकसंख्येतील साक्षरतेचे प्रमाण | फरक |
|---|---|---|---|
| 1971 | 29.45 | 11.30 | 18.15 |
| 1981 | 36.23 | 16.35 | 19.88 |
| 1991 | 52.21 | 29.60 | 22.61 |
| 2001* | 65.38 | 47.1 | 18.28 |

Source: 1. Govt of India, Tenth Five Year Plan(2002-07) Volume II, Sectoral Policies and Programmes, Planning Commission New Delhi, P- 455.
2. Govt. of India, Annual Report 2004-05, Ministry of Tribal Affairs, New Delhi, P-32.

टिप: * हा साक्षरतेचा दर आदिवासीसह आहे.

तक्ता क्रमांक 3 मधील भारतातील आदिवासी समुदायाच्या साक्षरतेच्या आकडेवारीवरून दृष्टिक्षेप टाकल्यास असे दिसते की, 1971 मध्ये केवळ 11.30 टक्के साक्षर असलेला आदिवासी समाज 2001 मध्ये 47.1 टक्के इतका साक्षर झाल्याचे दिसते. असे असले तरी एकूण लोकसंख्येतील साक्षरतेच्या प्रमाणापेक्षा (65.38) आदिवासींच्या साक्षरतेचे प्रमाण आजही निश्चितच कमी आहे.2001 मध्ये या दोहोतील फरक 18.38 टक्के एवढा मोठा होता.

### (ड)
### महाराष्ट्रातील आदिवासी :

महाराष्ट्रातील आदिवासींची वैशिष्ट्ये किंवा त्यांच्या सामाजिक, आर्थिक स्थितीचे विश्लेषण काही ठळक आकडेवारींच्या सहाय्याने करता येईल.

**1. लोकसंख्या :**

महाराष्ट्रातील आदिवासी लोकसंख्या

**तक्ता क्र.4**

**महाराष्ट्रातील आदिवासी लोकसंख्या** (आकडे हजारात)

| वर्ष | महाराष्ट्रातील एकूण लोकसंख्या | महाराष्ट्रातील आदिवासी लोकसंख्या | आदिवासी लोकसंख्येची राज्यातील एकूण लोकसंख्येशी टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1951 | 359.56 | 14.94 | 4.15 |
| 1961 | 395.54 | 23.07 | 5.83 |
| 1971 | 504.12 | 38.41 | 7.62 |
| 1981 | 627.84 | 57.72 | 9.19 |
| 1991 | 789.37 | 73.18 | 7.27 |
| 2001 | 968.79 | 85.77 | 8.85 |

Source: 1. Govt of India, Tenth Five Year Plan(2002-07 Volume II, Sectoral Policies and Programmes, Planning Commission New Delhi, P- 455

आणि या लोकसंख्येची वृध्दी तक्ता क्रमांक 4 मध्ये दिली आहे.

तक्ता क्र.4 मधील आकडेवारी स्पष्ट करते की, महाराष्ट्रातील आदिवासी लोकसंख्या 1951 ते 2001 या कालावधीमध्ये वाढली आहे. 1951 मध्ये एकूण लोकसंख्येच्या 4.15 टक्के असलेली आदिवासी लोकसंख्या 2001 मध्ये 8.85 टक्के इतकी झाली आहे. 1991 मध्ये हे प्रमाण 7.27 टक्के होते. 1951-2001 या काळात राज्यातील आदिवासी लोकसंख्येमध्ये 4.70 टक्क्यांनी वाढ झाल्याचे दिसते.

2. आदिवासी लोकसंख्यचे स्त्री-पुरूषनिहाय वर्गीकरण :

महाराष्ट्रातील आदिवासी लोकसंख्येचे

**तक्ता क्र.5**

**आदिवासी लोकसंख्येचे स्त्री पुरूष वर्गीकरण** (आकडे हजारात)

| वर्ष | लोकसंख्या | पुरूष | स्त्री | एकूण |
|---|---|---|---|---|
| 1981 | एकूण | 32,415 (51.63) | 30369 (48.37) | 62,784 |
| | आदिवासी | 2,924 (50.63) | 2,848 (49.27) | 57,72 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1991 | एकूण | 40,825 (51.52) | 381,12 (48.28) | 789,37 |
| | आदिवासी | 37,18 (50.8) | 36,00 (49.2) | 73,18 |
| 2001 | एकूण | 50,401 (52.02) | 46,478 (47.98) | 96,879 |
| | आदिवासी | 43,48 (50.69) | 42,29 (49.31) | 8,5,77 |

Source - Govt. of Maharashtra, Annual Tribal Sub - Plan 2005-06, Tribal Development Department Mumbai, P-399

टिप:*कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शवितात.

स्त्री/पुरूषनिहाय वर्गीकरण तक्ता क्र.5 मध्ये स्पष्ट केले आहे.

तक्ता क्र.5 मध्ये दिलेल्या आकडेवारी नुसार 1981-2001 या कालावधीमध्ये महाराष्ट्राच्या आदिवासी लोकसंख्येत वाढ झाली आहे. यामध्ये 1981 ला आदिवासी पुरूषांची संख्या 2,924 हजार होती. ती वाढून 2001 मध्ये 4,348 हजार इतकी वाढली आहे. याच कालावधीमध्ये राज्यातील आदिवासी स्त्रियांच्या संख्येतही वाढ होऊन 2,848 हजारांवरून ४,२२९ हजार एवढी झाली आहे. तर एकूण आदिवासी लोकसंख्या 1981 मध्ये 5,772 हजार होती. यामध्ये वाढ होऊन 2001 मध्ये 8,5,77 हजार एवढी झाल्याचे दिसून येते.

**3.आदिवासी कुटुंबाच्या उत्पन्नाची साधने:**

महाराष्ट्रातील आदिवासी समाजाची

**तक्ता क्र.6**

**महाराष्ट्रातील आदिवासी कुटुंबांची व्यवसायानुसार वर्गवारी (1996-97)**

| अ.क्र. | साधन | एकूण उत्पन्नाची टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | कृषि क्षेत्र | 43.41 |
| 2 | शेत मजूर | 35.80 |
| 3 | वन मजूर | 2.75 |
| 4 | व्यापार | 0.75 |
| 5 | नोकरी | 13.50 |
| 6 | दुग्ध व्यवसाय | 1.23 |
| 7 | इतर साधने | 2.56 |
| 8 | एकूण | 100.00 |

स्रोत : तक्ता क्र.५ प्रमाणे

उत्पन्नाची साधने काय आहेत ते तक्ता क्र.6 मध्ये दिले आहे.

तक्ता क्रमांक 6 मध्ये दिलेल्या आकडेवारीनुसार शेतीमधून उत्पन्नाचे साधन प्राप्त करणारे 43.41 टक्के आदिवासी आहेत, तर निव्वळ शेतमजुरी करून उदरनिर्वाह करणारे 35.80 टक्के आदिवासी असल्याचे दिसते. यावरून असे दिसून येते की, कृषी क्षेत्रात काम करणाऱ्यांची संख्या 79.20 टक्के आहे. वन मजूरी करून उदरनिर्वाह करणारे 2.75 टक्के, नोकरी असणारे 13.50 असल्याचे दिसते तर व्यापार करणाऱ्या आदिवासींचे प्रमाण केवळ 0.75 टक्के इतके अल्प असल्याचे पहावयास मिळते.

### 4. साक्षरता :

**तक्ता क्रमांक 7**

**महाराष्ट्रातील आदिवासी साक्षरतेचे प्रमाण** (टक्केवारी)

| वर्ष | एकूण साक्षर लोकसंख्या | | | आदिवासी साक्षर लोकसंख्या | | | फरक* | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | पुरूष | स्त्रिया | एकूण | पुरूष | स्त्रिया | एकूण | एकूण | स्त्रिया |
| 1961 | 42.04 | 16.17 | 29.82 | 12.55 | 01.75 | 07.21 | 22.61 | 14.22 |
| 1971 | 51.04 | 26.43 | 39.13 | 19.06 | 04.21 | 11.24 | 27.89 | 22.22 |
| 1981 | 58.65 | 34.63 | 47.02 | 32.38 | 11.94 | 22.29 | 34.08 | 22.69 |
| 1991 | 76.56 | 52.30 | 64.87 | 49.08 | 24.08 | 36.77 | 28.10 | 28.22 |
| 2001 | 86.60 | 67.00 | 76.90 | 67.00 | 43.10 | 52.20 | 24.70 | 23.90 |

Source: 1961 ते 1991 पर्यंतची आकडेवारी Navinchandra Jain, Trbals in Maharashtra State, A Report Tribal Situation in India, Vidyut Joshi,(Ed)Rawat Publication, Jaipur P-99 इातपन तर 2001 ची आकडेवारी, Govt. of Maharashtra, Annual Tribal Sub-Plan, 2005-06, Tribal Development Department, Mumbai, P-437इधून घेतली आहे.

टीप:* एकूण लोकसंख्या व आदिवासी लोकसंख्येतील साक्षरतेचा फरक

महाराष्ट्रातील आदिवासी साक्षरतेची स्थिती तक्ता क्रमांक 7 वरून अधिक स्पष्ट होते.

तक्ता क्रमांक 7 वर दृष्टिक्षेप टाकल्यास असे स्पष्ट होते की, 1961 ते 2001 या कालावधीमध्ये कायमपणे एकूण लोकसंख्येच्या तुलनेत आदिवासामधील साक्षरतेचे प्रमाण कमी असल्याचे दिसते. एकूण आणि आदिवासी लोकसंख्येतील साक्षरतेचा फरक हा 1961 मध्ये 22.61 टक्के इतका होता,तर 2001 मध्ये यात पुन्हा वाढ होऊन 24.7 टक्क्यापर्यंत पोहचला आहे.1961 मध्ये केवळ 7.21 टक्के साक्षर असलेली आदिवासी लोकसंख्या 2001 मध्ये 52.2 टक्क्यापर्यंत पोहचली असून याच कालावधीमध्ये आदिवासी पुरूष साक्षरतेचे प्रमाण 12.55 टक्क्यावरून 67 टक्क्यापर्यंत पोहोचले आहे. तर स्त्री साक्षरतेच्या बाबतीत मात्र चिंताजनक अवस्था असल्याचे पाहावयास मिळते. 1961 मध्ये केवळ १.७५ टक्के साक्षर असलेल्या

आदिवासी स्त्रिया 2001 मध्ये 43.1 टक्क्यापर्यंत येऊन पोहचल्या असल्याचे समाधान असले तरी एकूण लोकसंख्येतली स्त्री साक्षरतेच्या प्रमाणाशी तुलना केल्यास 43.1 टक्के ही आकडेवारी अजूनही जवळपास 23.9 टक्क्यांनी मागे असल्याचे पहावयास मिळते.

## 9. महाराष्ट्रातील आदिवासी कुटुंबांचे उत्पन्न:

महाराष्ट्रातील आदिवासी कुटुंबाची उत्पन्न मर्यादा किती आहे ,याविषयीची आकडेवारी तक्ता क्रमांक 11 मध्ये दिलेली आहे. ही टक्केवारी महाराष्ट्रातील आदिवासी उप–योजना क्षेत्रातील आदिवासी जमातीच्या कुटुंबाची त्याच्या उत्पन्न मर्यादानुसार वर्गवारी केलेली आहे.

**तक्ता क्रमांक 8**

**आदिवासी कुटुंबाचे उत्पन्नानुसार वर्गवारी (1996-97)**

| अ.क्र. | उत्पन्न मर्यादा (रूपये) | आदिवासी कुटुंबांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | 2000 पर्यंत | 26944 | 4.25 |
| 2 | 2001 ते 3600 | 92510 | 14.80 |
| 3 | 3601 ते 5000 | 17816 | 28.07 |
| 4 | 5001 ते 7000 | 144192 | 22.92 |
| 5 | 7001 ते 11000 | 136374 | 21.49 |
| 6 | 11001 ते 20000 | 37893 | 5.93 |
| 7 | 20000 आणि त्यावरील | 18551 | 2.92 |
| | एकूण | 634580 | 100.00 |

स्त्रोत : तक्ता क्र.५ प्रमाणे

तक्ता क्रमांक 8 मधील आकडेवारीनुसार असे दिसून येते की, आदिवासी उप–योजना क्षेत्रात येणाऱ्या केवळ 2.92 टक्के आदिवासी कुटुंबांचे उत्पन्न हे 20 हजार आणि त्यापेक्षा अधिक आहे. जवळपास 93 टक्के आदिवासी कुटुंबांचे उत्पन्न हे 20 हजार रूपयापेक्षा कमी असल्याचे दिसते. यामध्ये रूपये 3601 ते 10,000 रूपये उत्पन्न असणाऱ्यांचे प्रमाण जवळपास 72.5 टक्के ऐवढे मोठे असल्याचे दिसते.आणखी म्हणजे 99 टक्के आदिवासी कुटुंबाचे उत्पन्न हे केवळ रू.2000 ते 3600 रूपये यामधील असल्याचे पाहावयास मिळते.

## 6. आदिवासी दारिद्र्य :

महाराष्ट्रातील आदिवासींच्या दारिद्र्याचे प्रमाण तक्ता क्रमांक 12 मध्ये दर्शविले असून ही आकडेवारी महाराष्ट्रातील आदिवासी उप–योजना क्षेत्रात येणाऱ्या आदिवासींची आहे.

**तक्ता क्रमांक 9**

**आदिवासींच्या दारिद्रयाचे प्रमाण (1996-97)**

| अ. क्र. | एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प | आदिवासी कुटुंबे | एकूण दारिद्रय रेषे खालील कुटुंबे | लोकसंख्येशी दारिद्रय रेषेखालील कुटुंबाची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| 1 | ठाणे (डहाणू) | 66447 | 59595 | 89.69 |
| 2 | ठाणे (जव्हार) | 45556 | 40939 | 87.93 |
| 3 | ठाणे (शहापूर) | 22260 | 19743 | 88.69 |
| 4 | रायगड (पेण) | 9929 | 9396 | 94.63 |
| 5 | नाशिक (वळवण) | 40446 | 36717 | 90.78 |
| 6 | नाशिक (त्र्यंबक) | 58019 | 52776 | 90.96 |
| 7 | धुळे (तळोदा) | 69622 | 66305 | 95.24 |
| 8 | नंदूरबार | 91588 | 83496 | 91.16 |
| 9 | जळगाव (यावल) | 5935 | 5479 | 92.32 |
| 10 | अहमदनगर (राजूर) | 13208 | 11846 | 86.96 |
| 11 | पुणे (घोंडेगाव) | 14340 | 12042 | 83.97 |
| 12 | नांदेड (किनवट) | 20288 | 17837 | 87.92 |
| 13 | अमरावती (धारणी) | 27326 | 23977 | 87.74 |
| 14 | अमरावती (अकोला) | 9378 | 8692 | 92.69 |
| 15 | नागपूर (रामटेक) | 51110 | 13718 | 90.79 |
| 16 | गोंदिया (देवरी) | 20090 | 18396 | 91.57 |
| 17 | यवतमाळ (पांढरकवडा) | 36561 | 33562 | 91.79 |
| 18 | चंद्रपूर (राजूर) | 28682 | 26287 | 91.65 |
| 19 | चंद्रपूर (चिमूर) | 11091 | 10165 | 91.65 |
| 20 | गडचिरोली (एटापल्ली) | 12445 | 11772 | 94.59 |
| 21 | गडचिरोली(धानोरा) | 5413 | 4921 | 90.91 |
| 22 | भामरागड | 11846 | 10835 | 91.47 |
| | एकूण | 634580 | 548136 | 86.52 |

टीप: तक्ता क्रमांक 5 प्रमाणे.

तक्ता क्रमांक 9 मध्ये दिलेल्या आकडेवारीवरुन असे स्पष्ट होते की, महाराष्ट्रातील आदिवासी उप-योजना क्षेत्रातील येणाऱ्या आदिवासींमध्ये मोठया प्रमाणात दारिद्रय असल्याचे पहावयास मिळते. या क्षेत्रात येणाऱ्या आदिवासीपैकी राज्यात 86.52 टक्के आदिवासी दारिद्रय रेषेखालील असल्याचे दिसून येते. सर्वाधिक दारिद्रयाचे प्रमाण धुळे जिल्हयातील तळोदा क्षेत्रात असल्याचे दिसून येते. या ठिकाणी 95.24 टक्के आदिवासी दारिद्रय रेषेच्या खाली

जीवन जगत आहेत. तर सर्वात कमी दारिद्रय रेषेखाली जीवन जगणाऱ्या आदिवासींचे क्षेत्र म्हणजे पुणे जिल्हयातील धोंडेगाव या ठिकाणी 83.97 टक्के आदिवासी दारिद्रय रेषेखाली जीवन जगतात.

(इ)

महाराष्ट्रातील आदिवासींच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने राबवण्यात येणाऱ्या आदिवासी उपयोजनेवरील खर्चात महाराष्ट्र सरकारने कायमच हात आखडता घेतला आहे. हे अधिक ठळकपणे तक्ता क्रमांक 10 मध्ये दर्शविलेल्या आदिवासी उप-योजनेच्या अनुशेषाच्या आकडेवारीवरुन

**तक्ता क्रमांक 10**
**आदिवासी उप-योजनेचा अनुशेष**

| वर्ष | वार्षिक योजना नियतव्यय | आदिवासी उप-योजना 9 टक्याप्रमाणे अपेक्षित तरतूद | आदिवासी उप-योजना तरतूद | प्रत्यक्ष खर्च | अनुशेष |
|---|---|---|---|---|---|
| 1993-94 | 3804.00 | 342.36 | 265.00 | 245.96 | 96.40 |
| 1994-95 | 4400.00 | 396.00 | 330.00 | 330.00 | 66.00 |
| 1995-96 | 6069.00 | 546.21 | 412.50 | 403.10 | 143.11 |
| 1996-97 | 8284.00 | 745.56 | 588.58 | 504.51 | 241.05 |
| 1997-98 | 8325.00 | 749.25 | 550.00 | 479.30 | 269.95 |
| 1998-99 | 11600.73 | 1044.06 | 561.00 | 521.07 | 522.99 |
| 1999-00 | 12161.66 | 1094.54 | 580.59 | 467.65 | 626.89 |
| 2000-01 | 12330.00 | 1109.70 | 525.00 | 444.08 | 665.62 |
| 2001-02 | 11720.56 | 1054.85 | 607.50 | 366.77 | 688.08 |
| 2002-03 | 11135.37 | 1002.18 | 440.40 | 244.10 | 758.08 |
| 2003-04 | 12650.00 | 1138.50 | 641.50 | 244.36 | 894.14 |
| 2004-05 | 19983.90 | 1798.55 | 787.80 | 380.30 | 1418.25 |
| 2005-06 | 11000.00 | 990.00 | 990.00 | 511.97 | 478.03 |
| 2006-07 | 14829.00 | 1334.61 | 1000.00 | – | – |
| 2007-08 | 20200.00 | 1818.00 | 1798.00 | – | – |
| | | | | **एकूण** | 6868.59 |

स्रोत: समर्थन, अर्थसंकल्प अध्ययन केंद्र, मुंबई 2007, पृष्ठ क्रमांक 2.

स्पष्ट होईल.

तक्ता क्रमांक 10 मध्ये दर्शविलेली आकडेवारी असे स्पष्ट करते की, आदिवासी उप-योजनेवर खर्चाची तरतूद करीत असताना व प्रत्यक्ष खर्च करीत असतानाही हात आखडता घेतल्याचे पाहावयास मिळते. 1993-94 पासून आदिवासी उप-योजना द. मा. सुकथनकर समितीच्या शिफारशीनुसार स्वतंत्रपणे सादर केली जाते. त्यानुसार एकूण आदिवासी लोकसंख्या राज्याच्या एकूण लोकसंख्येच्या जवळपास 9 टक्के (2001) एवढी असल्याने राज्याच्या अर्थसंकल्पात 9 टक्के एवढी तरतूद आदिवासी उपयोजनेसाठी राखणे व प्रत्यक्षात खर्च करणे अपेक्षित आहे. मात्र या योजनेसाठी केलेली तरतूद पाहता शासन ही योजना स्वतंत्रपणे नव्हे तर स्व-तंत्राने राबवित असल्याचे येते.

तक्यात दर्शविलेली आकडेवारी असे स्पष्ट करते की, 1993-94 ते 2005-06 या तेरा वर्षात आदिवासी उपयोजनावरील अपेक्षित खर्चापेक्षा प्रत्यक्ष खर्च सातत्याने कमी दिसून येतो. उप-योजनेसाठी प्रस्तावित केलेली तरतूद उपलब्ध करुन न दिल्याने खर्चातील ही तफावत दरवर्षी वाढत चालल्याचे दिसते .

1993-94 ते 2004-05 या बारा वर्षाच्या काळात 1994-95 चा अपवाद वगळता आदिवासी उप-योजनेवरील अनुशेषामध्ये कायमपणे वाढच झालेली असून 2005-06 या वर्षी काही प्रमाणात यामध्ये घट झाल्याचे पहावयास मिळते. या काळात राज्यातील आदिवासी उप-योजेनेवरील अनुशेष हा रुपये 6 हजार 868 कोटी 59 इतका झाल्याचे दिसून येते. म्हणजेच राज्यातील आदिवासींना त्यांच्या विकासासाठी उपलब्ध होणाऱ्या इतक्या मोठया रकमेपासून वंचित ठेवण्यात आलेले आहे असे म्हणणे चुकीचे ठरणार नाही.

**(ई)**

**निष्कर्ष :**

1. 2001 च्या जनगणनेनुसार देशातील एकूण लोकसंख्येत आदिवासी लोकसंख्या 8.2 टक्के आहे, तर महाराष्ट्रात आदिवासी लोकसंख्या 8.85 टक्के आहे. देशातील एकूण आदिवासी लोकसंख्येशी महाराष्ट्रातील आदिवासी लोकसंख्या प्रमाण 10.17 टक्के इतके आहे.
2. महाराष्ट्रातील आदिवासीमध्ये मोठया प्रमाणात दारिद्रय असल्याचे अभ्यासांती स्पष्ट होते. राज्यात 86.52 टक्के आदिवासी दारिद्रय रेषेखाली आहेत. राज्यात सर्वाधिक दारिद्रयाचे प्रमाण धुळे जिल्हयातील तळोदा (94.24 टक्के) येथे आहे.
3. राज्यातील आदिवासी आजही मोठया प्रमाणात निरक्षर असल्याचे दिसून येते. आदिवासी स्त्री साक्षरतेचे प्रमाण तर केवळ 23.9 टक्के इतके कमी असून हे प्रमाण पुरोगामी महाराष्ट्राला निश्चितच विचार करण्यास भाग पाडणारे आहे.
4. राज्यात कृषी क्षेत्रावर उपजिविका करणाऱ्या आदिवासांचे प्रमाण मोठे असून (79.20 टक्के) निव्वळ शेतमजुरी करुन उदरनिर्वाह करणाऱ्यांचे प्रमाण 35.80 टक्के इतके अधिक असल्याचे पहावयास मिळते.
5. राज्यातील ज्या आदिवासी कुटुंबांचे वार्शिक उत्पन्न 3601 ते 11 हजार रुपये आहे अशा आदिवासी कुटुंबांचे प्रमाण जवळपास 72.5 टक्के एवढे मोठे असल्याचे अंधकारमय चित्र

याच महाराष्ट्रात पहावयास मिळते.

6. आदिवासींच्या सर्वांगीण विकासाकरिता खर्च करीत असताना शासन उदासीन असल्याचे गेल्या पन्नास वर्षात पहावयास मिळाले असून आदिवासी उप-योजनेवरील खर्चाचा अनुशेष हा वाढतच चालला आहे. ही बाब धोरण कर्त्यांच्या डोळ्यात अंजन घालणारी आहे.
7. एकूणच महाराष्ट्रातील आदिवासींचा गेल्या पन्नास वर्षातील विकासाचा आढावा अभिमानास्पद राहिलेला नाही. गेल्या पन्नास वर्षात सामाजिक भेदांना मूठमाती देणारी सामाजिक मूल्ये प्रस्थापित झाली असली तरी आदिवासी अजूनही मागासलेला आहे. त्याची गणना अजूनही उपेक्षित व शोषित वर्गात करण्यात येते. आदिवासींच्या एकूणच विकास प्रश्नांचा विचार करताना आदिवासी समाजाकडे अजूनही अलिप्तपणे पाहिले जाते.त्या अनुषंगाने आदिवासींच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने नव्याने विचार करीत असताना समाजाचा व शासन व्यवस्थेचा दृष्टिकोन बदलणे गरजेचे आहे.तर आणि तरच विकासाची दिशा योग्य मार्गाने मार्गक्रमण करेल असे मला नमूद करावेसे वाटते, शासन आपला दृष्टिकोन बदलणार आहे काय?

## संदर्भ सूची


1. Sen A.K., Poverty, Inequality and Unemployment Economic and Political Weekly, Mumbai, August 1975, P-12
2. अवथरे जयेश, नागपूर विभागातील आदिवासींच्या शिक्षणाचे आर्थिक अध्ययन, नागपूर विद्यापीठ, नागपूर (अप्रकाशित शोध प्रबंध) 2000, पृष्ठ क्रमांक 17.
3. तेगमपुरे मारोती, आदिवासी विकास आणि वास्तव, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, 2009, पृष्ठ क्रमांक-15.
4. तत्रैव (अवथरे जयेश)
5. गारे गोविंद, आदिवासी प्रश्न आणि परिवर्तन, अमृत प्रकाशन, औरंगाबाद,1974, पृष्ठ क्रमांक -4.
6. समर्थन, अर्थसंकल्प अध्ययन केंद्र, मुंबई, 2007, पृष्ठ क्रमांक -2.

# दक्षिण आशियातील (सार्क )आर्थिक एकात्मिकरण

**उषा य. साळुंके.**
देवपूर, धुळे .

**(1) प्रास्ताविक –**

दुसऱ्या महायुद्धानंतर संरक्षित व्यापार धोरणामुळे होरपळून निघालेले देश पुन्हा पारंपरिक मुक्तव्यापार धोरणाचा विचार करु लागले. यद्ध काळात व्यापार निर्बंधामुळे दोन जागतिक महायुद्धे आणि त्या दरम्यानचा जागतिक महामंदीचा काळ संरक्षक व्यापार धोरणामुळे व्यापार आणि जागतिक उत्पादन या दोहोंचा संकोच करु लागला. दरम्यान जगात भांडवलशाही अमेरिका आणि समाजवादी सोविएत रशिया ही दोन आर्थिक दृष्ट्या प्रबळ राष्ट्रे होती. या प्रबळ सत्तांच्या स्पर्धेत टिकून राहण्यासाठी आर्थिक दृष्ट्या दुर्बल परंतु , भरपूर गर्भित उत्पादन क्षमता असलेले देश परस्पर सहकार्याचा विचार करु लागले. हा विचार करणारी राष्ट्रे आर्थिक रचनेच्या दृष्टिकोनातून सारख्याच परिस्थितीतील नव्हती. भारतासारखी खंडप्राय: अर्थव्यवस्था तर दुसरीकडे पाकिस्तान, बांगलादेश, नेपाळ, भूतान, श्रीलंका, मालदिव...इ. सारखी लहान राष्ट्रे परस्पर सहकार्यातून आर्थिक महासत्तांना सामोरे जाण्याची तयारी करु लागली. आशियाप्रमाणे युरोपमधील लहान मोठया राष्ट्रापुढेही असाच पेचप्रसंग होता. अनुभवातून ही राष्ट्रे एवढेच जाणून होती की, परस्पर सहकार्यातून आर्थिक सामर्थ्य वाढविण्याला पर्याय नाही. याच काळात परस्पर सहकार्यासाठी लहान मोठे राष्ट्र/ प्रादेशिक गट एकत्र आले.

सीमालगत असलेल्या निकटवर्ती राष्ट्रांशी आर्थिक एकात्मता साधल्यास त्या समुहातील सर्वच राष्ट्रांचा विकास शक्य होतो, हे युरोपियन आर्थिक समूदायाने (EEU) सिध्द केले. या प्रक्रियेकडे सर्व जगाचे डोळे लागून होते. या अनुभवाने प्रभावित होऊन दक्षिण आशियातील सात राष्ट्रांचे, 'प्रादेशिक सहकार्याचे दक्षिण आशियायी संघटन (SAARC)' उदयास आले. ही सुधारणा अगदी अलीकडची म्हणजे 1985 मधील होय. बांगलादेश, भूतान, भारत, मालदिव, नेपाळ, पाकिस्तान आणि श्रीलंका या सार्क

संघटनाच्या छत्राखाली आले. हे संघटन निर्माण होण्यापूर्वी भौगोलिक सानिध्य असूनही या देशांचा आपआपसांतील व्यापार नगण्य होता (तो 1980-1985 या दरम्यान 0.95% ते 0.69% होता). भारताच्या एकूण व्यापाराशी हे प्रमाण भारताच्या एकुण व्यापाराशी 10 ते 15% असायला हरकत नव्हती. पण सामंजस्य आणि परस्पर सहकार्या अभावी हा व्यापार उत्तरोत्तर घटत गेलेला दिसतो. सार्कच्या निर्मितीनंतर हा व्यापार वाढावा अशी स्वाभाविक अपेक्षा होती, पण तसे घडू शकले नाही. व्यापारात सुधारणा होते आहे, पण ती अतिशय कूर्मगतीने. आणि याची कारणमीमांसा शोधतांना संशोधकाने सदर लेखात आंतरराष्ट्रीय आर्थिक एकात्मीकरणाच्या साच्यात सार्कपासून आरंभ झालेल्या दक्षिण आशियातील एकात्मीकरणाच्या स्थितीचा आढावा घेण्याचा अल्पसा प्रयत्न केला आहे.

राष्ट्रा-राष्ट्रांच्या सीमांवरील प्रतिबंध नष्ट करणे म्हणजे सर्वसामान्यपणे आर्थिक एकात्मिकरण होय. विविध प्रकारच्या सीमांवरील सापत्न भावामुळे वस्तू व सेवांचा प्रवाह आणि उत्पादन घटकांची प्रादेशिक गतीक्षमता कमी होते. आर्थिक व्यवहारांना खीळ बसू शकते. व्हिमर, मेंडे, लिप्से आणि अन्य अर्थतज्ज्ञांच्या विचारांवर आधारीत आर्थिक एकात्मीकरणाच्या सिद्धांतातून दोन परस्पर विरोधी शक्यता व्यक्त होतात. अल्पकाळात व्यापार उदारीकरण लाभदायी सिद्ध होण्याच्या दृष्टीने व्यापार परावर्तन (Trade Diversion ) परिणामापेक्षा व्यापार निर्मिती (Trade Creation) परिणाम अधिक असायला हवा.[1] तथापि, उदारीकरणात अल्पकालीन लाभांशिवाय काही दीर्घकालीन लाभही आहेत ते म्हणजे स्पर्धेमुळे निर्माण होणारी अधिक तांत्रिक कार्यक्षमता, मोठी बाजारपेठ, उच्च उपभोक्ता संतोषाधिक्य, मोठया प्रमाणावरील विदेशी गुंतवणूक...इ.

श्रीयुत बालासा यांनी प्रादेशिक एकात्मीकरणाचे पाच टप्पे सांगितले आहेत ते म्हणजे (1) मुक्त व्यापार विभाग (FTA), (2) जकात संघ (CU), (3) सामायिक बाजारपेठ (CM), (4) आर्थिक संघटना (EU) आणि (5) संपूर्ण आर्थिक एकात्मिकरण (TEI). प्रादेशिक एकात्मिकरणाची सखोलता वाढविण्याच्या दृष्टीने उच्चस्तरीय राष्ट्रीय संस्था किंवा आंतरप्रादेशीक शासन संघ यांनी एकत्रितपणे घेतलेल्या निर्णयांचा परिपाक म्हणजे या पाच पायऱ्या / टप्पे होत.[2] यावरुन आर्थिक एकात्मिकरण तात्काळ आणि सहज साध्य होणारी बाब नाही, हे स्पष्ट होते.

जागतिक अर्थव्यवस्थेतील वाढत्या सहभागातून निर्माण होणाऱ्या अर्थपूर्ण एकात्मीकरणाचे मोठया प्रमाणावर लाभ होतात. त्यात प्रामुख्याने, तुलनात्मक लाभांच्या तत्त्वावर आधारीत, बदललेल्या उत्पादन पद्धतीत निर्माण होणा-या साधनसंपत्तीचे कार्यक्षम विभाजन, आंतरराष्ट्रीय गुणवत्ता साध्य करणारी देशांतर्गत स्पर्धा, उपभोक्ता निवडीस विस्तृत वाव, आंतरराष्ट्रीय भांडवल बाजारातील नव्या संधी, नवीन संकल्पना, नवतंत्रज्ञान तसेच नवी उत्पादने यांना वाव इ. चा समावेश होतो.[3] विकसनशील राष्ट्रांच्या उपलब्ध मर्यादित साधन संपत्तीच्या कमीत कमी विनियोग मूल्याने आर्थिक विकासाला गती देणे आणि भागीदार राष्ट्रांमधील सामाजिक कल्याणात वाढ आणि आर्थिक विकास साध्य करणे यापेक्षा वेगळे चांगले उद्दीष्ट आर्थिक एकात्मिकरणाचे असूच शकत नाही.[4]

उत्तर अमेरिका मुक्त व्यापार संघटना (NAFTA), युरोपियन संघ (EU), दक्षिण पूर्व आशियायी राष्ट्राचे (प्रादेशिक) सहकार्य संघटना (ASEAN), दक्षिण आशियायी देशांचे प्रादेशिक सहकार्य संघटन (SAARC) इ. प्रादेशिक किंवा उपप्रादेशिक एकात्मीकरणाच्या प्रकियेची उदाहरणे आहेत. अलीकडील नवीन आशियातील प्रादेशिकवाद' या संकल्पनेला ब्रुनेइ, कंबोडिया, इंडोनेशिया, लाओस, मलेशिया, म्यानमार, फिलीपाइन्स, सिंगापूर, थायलंड, व्हिएतनाम इ. आशियानच्या (ASEAN) सदस्यांनी गती दिली आहे. ते चीन, जपान आणि दक्षिण कोरियाशी अर्थपूर्ण भागीदारी प्रस्थापित करण्याच्या कामात गुंतले आहेत. हा गट ''आशियन + तीन'' या नावाने ओळखला जातो.[5] आर्थिक एकात्मीकरणाची अशीही व्याख्या केली जाते की, ''विविध राष्ट्र गटांतील आर्थिक एकात्मीकरण प्रकिया म्हणजे दूसरे तिसरे काही नसून विविध प्रकारच्या उपाययोजना, साधने आहेत की, ज्यांचा उद्देश विविध राष्ट्रांतील वेगवेगळया आर्थिक संस्था/ संघटना/ एकक यांच्यातील विषमता दूर करणे हा असतो.'' नाहीशी केलेली विषमता अणि एकात्मीक भागीदार राष्ट्र-गटातील सहकार्याचे प्रमाण यानुसार एकात्मिकतेचे पुढील प्रकार आढळतात.

**प्रादेशिक एकात्मीकरणाचे टप्पे**

| प्रादेशिक एकात्मिकरण | व्याख्या | उदाहरणे |
|---|---|---|
| मुक्त व्यापार प्रदेश (FTA) | असा संघ जो विशिष्ट सदस्य देशांकडील आयातींना जकात व कोटा मुक्त करतो परंतु जो तिसऱ्या देशांसाठी निश्चित जकाती व कोटा पध्दती अवलंबितो. | अ) सन 1992 मध्ये एशियन (ASEAN) राष्ट्रांनी मुक्त व्यापार प्रदेश (AFTA) अवलंबिला. 10 पैकी 6 सदस्यांनी सन जाने. 2002 मध्ये बहुसंख्य वस्तुंवरील जकाती 0 ते 5% नी कमी केल्या. अलीकडील येत्या काही वर्षात एशियन विभाग पूर्णपणे मुक्त व्यापार प्रदेश होईल.<br>ब) अमेरिका, कॅनडा आणि मेक्सिको ही राष्ट्रे उत्तर अमेरिका मुक्त व्यापार प्रदेश (NAFTA) पूर्णपणे मुक्त होण्याच्या मार्गावर आहे. येथे सन 1994 पर्यंत बहुतेक जकाती रद्द झाल्या. इतरांबरोबर 5 ते 15 वर्षात संपूर्ण जकात मुक्त होईल. |
| जकात संघ (CU) | असा मुक्त व्यापार प्रदेश जो सर्वमान्य एकच जकात व कोटयांची रचना स्वतंत्रपणे बिगर सदस्य राष्ट्रांसाठी निश्चित करते. | अ) युरोपियन आर्थिक समुदाय (EEC) सन 1968 पासून जकात संघ म्हणून मान्यता प्राप्त आहे.<br>ब) मरकोसुर (MERCOSUR) (दक्षिणेचा एकत्रित बाजार: अर्जेंटिना, ब्राझील, उरुग्वे, पाराग्वे) सन 2006 पर्यंत पूर्णपणे जकात संघात रुपांतरीत होण्याचा उद्देश समोर ठेऊन होते. |

| | | |
|---|---|---|
| सामायिक बाजारपेठ (CM) | वस्तू व सेवा व्यापारातील जकातेतर बंधने आणि उत्पादन घटक हालचाली वरील निर्बंध नष्ट करणारे एकक म्हणजे सामायिक बाजारपेठ होय. | युरोपियन समुदाय (EEC) सन 1993 पासून (एकच युरोपिय बाजाराची स्थापना) रोम कराराच्या माध्यमातून एकच एकत्रित बाजाराची स्थापना झाली आहे. |
| आर्थिक संघ / राष्ट्राचा आर्थिक संघ (EUN) | देशांतर्गत संबंधित कायदे आणि राष्ट्रीय आर्थिक धोरणे यातील समन्वय असलेली सामायिक बाजारपेठ. | अलिकडील युरोपियन संघाचे (EU) उदाहरण देता येईल. |
| संपूर्ण आर्थिक एकात्मिकरण (TEI) | अत्युच्च पातळीवर नियंत्रित केली जाणारी आर्थिक धोरणे आणि सहाय्यभूत राष्ट्रीय कायदे अशा अंगभूत तत्त्वांनी परिपूर्ण असा राष्ट्रांचा आर्थिक संघ. | युरो विभाग (युरोपियन संघटनेची 15 पैकी 12 राष्ट्रे) जो अलीकडे राष्ट्रांचा आर्थिक संघ (EUN) आणि संपूर्ण आर्थिक एकात्मिकरण (TEI) यांच्या दरम्यानच्या प्रकारात मोडतो. सन 1957 मध्ये रोम करारात समावेश असलेली अत्युच्च पातळी वरील अधिकार सत्ता नियम बनविण्यासाठी यंत्रणा येथे प्रस्थापित झाली आहे. |

**(2) प्राधान्य व्यापार करार (PTA)-**

प्राधान्य व्यापार करार म्हणजे असे दोन किंवा दोन पेक्षा जास्त राष्ट्रांमधील करार की ज्यांच्या अनुसार सदस्य राष्ट्रांमध्ये उत्पादित होणाऱ्या उत्पादनांवर, बाहेर उत्पादित होणाऱ्या वस्तूंपेक्षा कमी दराने जकाती आकारल्या जातात. प्राधान्य व्यापार करारात प्रादेशीक व्यापार करारांचा (RTAs) समावेश केला जातो. एकाच भौगोलिक विभागातील देश असतील तर प्रादेशिक व्यापार करार (RTAs) हेच प्राधान्य व्यापार करार (PTAs) असतात. व्यापाराची पातळी आणि आर्थिक एकात्मिकरण यानुसार प्राधान्य व्यापार कराराचे विविध प्रकार आढळतात प्राधान्य जकात करार हा विशेष आदर्श करार आहे आणि ज्यात संपूर्णपणे जकातीचे निर्मूलन करणे आवश्यक नाही. ही संकल्पना ''विशेष लाभदायक राष्ट्र'' (MFN) उदारीकरण करारात अभिप्रेत अर्थापेक्षा वेगळा अर्थ व्यक्त करते. याचा अर्थ असा की, इतर राष्ट्रांची व्यापार धोरणे काहीही असली तरी प्रत्येक देश त्यांची व्यापारावरील बंधने त्यांच्या व्यापार करारातील सर्व भागीदार राष्ट्रांना कमी करतात. मुक्त व्यापार कराराचा देखील प्राधान्य व्यापार कराराशी संबंध आहे. ज्यात, सदस्य राष्ट्रांमध्ये उत्पादित होणा-या वस्तुंवरील व्यापारातील जकाती संपूर्णपणे काढून टाकल्या जातात आणि सदस्येतर राष्ट्रांशी त्यांची जकात रचना स्वतंत्रपणे निश्चित केली जाते. जकातसंघ (Custom Union ) हा देखील एक प्राधान्य जकात करार आहे. यामध्ये सर्व सदस्य देश – सदस्येतर राष्ट्रासाठी एक, सारखी स्वतंत्र कर रचना अथवा व्यापार धोरण स्विकारते.

**प्राधान्य व्यापार करार / प्रादेशिक व्यापार करार (PTAs /RTAs ) संबधित जागतिक व्यापार संघटनेच्या (WTO) तरतूदी-**

जागतिक व्यापार संघटनेच्या सर्व

सदस्यांना, ते ज्या प्राधान्य व्यापार करार अथवा प्रादेशिक व्यापार करारांत सहभागी होत असतील त्यांनी त्या संबंधिच्या सूचना जागतिक व्यापार संघटनेस (WTO)देणे बंधनकारक आहे. किंबहुना त्या करारातील तरतूदींचा आढावा जागतिक व्यापार संघटना घेऊ शकते. जागतिक व्यापारसंघटनेचे जवळजवळ सर्व सदस्य एक किंवा जास्त प्रादेशिक व्यापार संघटनाचे/कराराचे सहभागी सदस्य आहेत. काही सदस्य वीस वा वीसपेक्षा जास्त करार अथवा संघटनांचे सहभागी सदस्य आहेत. सन 1948 ते 1994 या काळात गॅट ला 124 प्रादेशिक व्यापार कराराच्या / वस्तप व्यापार संबधित (वस्तू करार) सूचना प्राप्त झाल्या होत्या. जागतिक व्यापार संघटनेची सन 1995 मध्ये निर्मिती झाल्यानंतर, 130 नवीन वस्तू आणि सेवांचा व्यापार अंतर्भूत असणा-या करारांच्या सूचना प्राप्त झाल्या आहेत. प्रादेशिक व्यापार करार / संघटनांनी जागतिक व्यापार संघटनेच्या तत्वांमधे मुळापासुन बदल केले आहेत. हे करार त्यांच्या सदस्यांना प्रादेशीक व्यापार करारात प्रवेश करण्यासाठी मोठया प्रमाणावर लवचिकता उपलब्ध करुन देतात. गॅट कराराचे चोवीस नंबर चे कलम जकात संघ आणि मुक्त व्यापार क्षेत्रातील वस्तू व्यापारा संबंधी माहिती देते. आणि सेवा क्षेत्र व्यापारासंबधीचा सर्वसामान्य करार (GATs), कलम पाच, हे सेवा क्षेत्र व्यापारसंबंधी माहिती देते. तसेच ते विकसनशील देशांमधील वस्तू व्यापारासंबंधी उपयुक्त आहे. या दोन कलमांतील अटींची पूर्तता केल्यानंतरच जागतीक व्यापार संघटनेचे सदस्य राष्ट्रे अन्य प्रादेशीय व्यापार करारांना स्वत:ला जोडून घेऊ शकतात. ही बाब जागतिक व्यापार संघाने आपल्या सदस्यांना आवश्यक केली आहे.

**(3) दक्षिण आशियातील आर्थिक सहकार्य-**

विविध आर्थिक निर्देशकांमधुन नि:संदिग्धपणे व्यक्त होणारे अर्धविकसितपणातील भागीदारी' हे इतर वैशिष्ट्यांमधील महत्त्वाचे वैशिष्टच दक्षिण आशियाचे आहे. दक्षिण आशियाचा स्थूल देशांतर्गत उत्पादन दर (GDP) 2003 मध्ये 7 प्रतिशत तर 2004 मध्ये 7.1 प्रतिशत होता आणि तो 2005 मध्ये 6.5 प्रतिशत राहील असा अंदाज व्यक्त केला होता.[6] भारत, पाकिस्तान, श्रीलंका आणि बांगलादेश हया नव्याने पुढे येणाऱ्या दक्षिण आशियातील अर्थव्यवस्था आहेत. जवळ जवळ सर्वच दक्षिण आशियातील राष्ट्रांनी एक अयशस्वी धोरण म्हणून आयात पर्यायीकरणाचे धोरण सोडून दिले आहे. प्रामुख्याने खाजगी क्षेत्रावरील अवलंबित्व आणि उदारीकरण पूर्वाभिमुखता हया घटकांनी वर्तमानकाळात दक्षिण आशियातील (उपखंडातील) राष्ट्रांनी मूळ धरले आहे.[7] दक्षिण आशिया हा जगातील गरीबात गरीब प्रदेश, जेथे प्रचंड लोकसंख्या राहते. काही महत्त्वाच्या सामाजिक विकासाच्या निर्देशंकानुसार, हा प्रदेश अजूनही उपसहारा राष्ट्रांच्या मागे आहे. दक्षिण आशियातील सातपैकी चार सदस्य राष्ट्रे अल्पविकसित राष्ट्रांमध्ये समाविष्ट होतात. या प्रदेशांतर्गत व्यापार हा त्यांच्या (प्रदेशबाहय) बाहय व्यापाराच्या 5 प्रतिशतपेक्षा जास्त नाही. [8]

**(4) दक्षिण आशियायी राष्ट्रांची प्रादेशिक सहकार्य संघटना (SAARC)-**

बांगलादेशचे राष्ट्रपती झिया-उर-रहमान यांनी केलेली सूचना आणि प्रयत्नातून भारत, पाकिस्तान, बांगलादेश, नेपाळ, भूतान, मालदिव आणि श्रीलंका हया सात देशांची शिखर बैठक 7 आणि 8 डिसेंबर, 1985 ला आयोजीत करण्यात

आली. हया बैठकी त सात दक्षिण आशियायी देशांचा प्रादेशिक सहकार्य संघ (South Asian Association for Regional Co-operation- SAARC) स्थापन करण्यात आला. नंतर सन 2008 मध्ये अफगाणिस्तानला सदस्य करुन घेण्यात आले.

सार्क हा जगातील सर्वात जास्त लोकसंख्या, कमी भूभाग, आर्थिकदृष्टया गरीब, मागासलेला प्रदेश असलेला एक प्रादेशिक सहकार्य संघ आहे. परस्पर संबंधावर आधारित जगात, सदस्य राष्ट्रांतील परस्पर सामंजस्य, सुदृढ शेजारी संबंध, अर्थपूर्ण सहकार्य, ऐतिहासिक आणि सांस्कृतिक दृष्टीने जुळलेला वारसा यांच्या सहाय्याने शांतता, स्वातंत्र्य आणि सामाजिक न्याय आणि आर्थिक भरभराट हया उद्दिष्टांवर दक्षिण आशियातील राष्ट्र प्रादेशिक सहकार्य संघटनेचा (सार्क) ठाम विश्वास आहे.

जानेवारी 2004, इस्लामाबाद येथील सार्कच्या 24 व्या मंत्रीपरिषदेच्या बैठकीत प्रादेशिक एकात्मिक कार्यक्रम कृतीसत्र (Regional Integrated Programme of Action ) निश्चित करण्यात आले. कृषी व ग्रामीण विकास, आरोग्य आणि लोकसंख्या, स्त्रिया, तरुण आणि हवामानशास्त्र, मानव संसाधन विकास आणि वाहतूक...इ. साठी प्रत्येकी स्वतंत्र तांत्रिक समिती नियुक्त करण्यात आली. उच्च पातळीवरील क्रियाशील गट देखील स्थापन करण्यात आले. ज्यांनी माहिती आणि दळणवळण तंत्रज्ञान, जैव तंत्रज्ञान, बौध्दिक संपदा हक्क, पर्यटन आणि शक्तीस्त्रोत यासंदर्भातील सहकार्य सुदृढ करण्याचे प्रयत्न करावेत. सार्कच्या मसुद्यात सार्कची काही उद्दीष्टये समाविष्ट करण्यात आली.[9]

1. दक्षिण आशियातील लोकांच्या सामाजिक कल्याण आणि जीवनमानात वाढ करणे.
2. आर्थिक विकास, सामाजिक प्रगती आणि सांस्कृतिक विकासाला गती देऊन प्रत्येक व्यक्तीला स्व-प्रतिष्ठेने जगण्याची आणि त्यांच्या संपूर्ण शक्यता जाणून घेण्याची संधी प्राप्त करुन देणे.
3. दक्षिण आशियातील राष्ट्रांमध्ये सामूहिक स्वावलंबनाची वृध्दी आणि संवर्धन करणे.
4. एकमेकांवरील विश्वास, जाणिवा, एक दुसऱ्याचे प्रश्न समजावून घेण्यास हातभार लावणे.
5. आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि वैज्ञानिक क्षेत्रात परस्पर सहाय्य आणि कृतीशील सहकार्यात भर टाकणे.
6. आंतरराष्ट्रीय पातळीवर सामायिक हितसंबंधाबाबत परस्परातील सहकार्याची जोपासना करणे.
7. समान ध्येय आणि उद्दिष्टांसाठी प्रादेशिक आणि आंतरराष्ट्रीय संघटनांना सहकार्य करणे.

### (5) दक्षिण आशियायी प्राधान्य व्यापार (SAPTA):

दक्षिण आशियायी प्राधान्य व्यापार कायदा (SAPTA) प्रस्ताव सर्व प्रथम श्रीलंकेने सन 1991 मध्ये सार्कच्या सहाव्या शिखर परिषदेत सादर केला होता. प्रदेशांतर्गत व्यापार विस्ताराच्या उद्देशाने या प्राधान्य व्यापार कायद्याची सुरूवात सन 1997 पर्यंत व्हावी असा निर्णय घेण्यात आला. प्रत्यक्षात हा प्राधान्य व्यापार कायदा/करार सन 8 एप्रिल 1993 मध्ये मंजूर करण्यात आला आणि सन डिसेंबर 1995 मधे प्रत्यक्ष अंमलबजावणीत आला. या करारानुसार दक्षिण

आशियातील सार्क सदस्य राष्ट्र सवलतीच्या जकात दराने इष्ट वस्तूंबाबत एकमेकांना व्यापाराला विशेष प्राधान्यांची वागणूक देऊ शकतात.

**दक्षिण आशियायी प्राधान्य व्यापार कराराची प्रमुख उद्दीष्टे–**

1. प्रादेशिक सहकार्य वाढीस लावणे.
2. राष्ट्रीय आर्थिक वृध्दी, राष्ट्रीय रोजगार पातळी, दक्षिण आशियातील राष्ट्रांचा राहणीमान दर्जा वाढीस प्रोत्साहन देणे.

या कायद्याच्या कराराअंतर्गत व्यापार निश्चिती संबंधिच्या चार फेऱ्या पूर्ण झाल्या आहेत त्यात 5500 वस्तू व्यापारासाठी अंतर्भूत करण्यात आल्या. व्यापार मध्यस्थीच्या प्रत्येक फेरीतून अधिकाधिक उत्पादनांस आणि जकात सवलतीस अंतर्भूत करण्यात आले. चौथी व्यापार फेरी नोव्हेंबर 2002 मध्ये नेपाळची राजधानी काटमांडू येथे पार पडली.

**(6) दक्षिण आशियायी मुक्त व्यापार प्रदेश (SAFTA)–**

'साफटा' (SAFTA)ची संकल्पना प्रथम दिल्ली येथील सार्क च्या आठव्या संमेलनात चर्चेसाठी मांडण्यात आली. अपेक्षा अशी की, सन 2005 मध्ये ती प्रत्यक्षात येईल. ही तारीख सन 1997 मध्ये माली येथील सार्क च्या संमेलनात सुधारण्यात आली आणि जाहीर करण्यात आले की, साफटा (SAFTA) सन 2001 पासून प्रत्यक्षात यायला हवा.[10]

सार्कच्या जानेवारी 2004 च्या इस्लामाबाद येथील 12 व्या शिखर संमेलनात साफटा (SAFTA) चा स्वीकार करण्यात आला. अपेक्षा अशी की, 1.4 बिलियन लोकसंख्या असलेल्या दक्षिण आशियातील प्रादेशिक अर्थव्यवस्था खुल्या होतील आणि दारिद्रयाने पछाडणाऱ्या लोकसंख्येच्या जीवनमानात लक्षणीय बदल घडून येईल.(11)

सार्वभौमत्व, समता, स्वातंत्र्य आणि सर्व राज्यांची प्रादेशिक एकात्मकता आणि परस्पर मदतीचा विश्वास याचा संपूर्ण आदर करुन दक्षिण आशियातील लोकांच्या लाभासाठी व्यापार आणि विकासाच्या संपूर्ण प्रादेशिक शक्यतांची पडताळणी करुन, सार्क अंतर्गत सहकार्य जोपासले जाईल असे आश्वासन देऊन मुक्त व्यापार प्रदेश कराराला (SAFTA) गती देण्यात आली.[12]

या कराराचा प्रमुख उद्देश म्हणजे परस्पर करार करणाऱ्या देशांना, परस्पर व्यापार आणि आर्थिक सहकार्य वाढविण्यास प्रवृत्त करणे. दक्षिण आशियातील मुक्त व्यापार प्रदेश करारात त्याची उद्दिष्ट्ये अंतर्भूत होती.[13]

**दक्षिण आशिया मुक्त व्यापार प्रदेश करार उद्दिष्टये –**

1. करार केलेल्या राष्ट्रांच्या प्रादेशिक सीमांवरील वस्तूंच्या हालचालीस सुविधा निर्माण करणे आणि व्यापारातील बंधने दूर करणे.
2. मुक्त व्यापार प्रदेशात स्पर्धेस योग्य वातावरण निर्माण करणे आणि करार करणाऱ्या सर्व सदस्यांची आर्थिक विकासाची स्थिती लक्षात घेऊन सर्वांना सारखे लाभ प्राप्त होतील याची शाश्वती देणे.
3. संघर्ष वा कलह सोडविणे, कराराची अंमलबजावणीची प्रभावी यंत्रणा निर्माण करणे.
4. या कराराचे परस्पर लाभ वाढविण्यासाठी एक विशिष्ट संरचना निर्माण करणे.

सन 1 जानेवारी 2006 रोजी साफ्टा या करारावर सहया करण्यात आल्या आणि दक्षिण

आशिया प्रदेशातील व्यापारावरील बंधने कमी करण्याच्या दृष्टीने साफ्टा (SAFTA) सन 1 जानेवारी 2006 रोजी संमत करण्यात आला आणि दक्षिण आशिया विभाग अंशतः मुक्त व्यापार प्रदेशात परिवर्तित होईल आणि त्याचे परिणाम 2006 पर्यत स्पष्टपणे दिसतील. सार्क चे सदस्य राष्ट्र नंतरच्या संपूर्ण दशकात जकातीचे दर 25 ते 30 प्रतिशत वरुन 0 ते 5 प्रतिशत कमी करतील. या कराराद्वारे भारत, पाकिस्तान आणि श्रीलंका या सारख्या विकसनशील राष्ट्रांना त्यांच्या जकाती कमी करण्यास सन 2006 आणि अल्प विकसित नेपाळ, भूतान, बांगलादेश या राष्ट्रांना सन 2009 आणि मालदिव ला सन 2016 पर्यंत (करार संपूर्ण कार्यरत होईपर्यतची) अंतिम मुदत देण्यात आली.[14]

अर्थात अपेक्षा अशी आहे की, मुक्त व्यापार हा जकात संघ (CU) प्रस्थापित करण्यास मदत करेल आणि परिणामत: सन 2020 पर्यत संपूर्ण कार्यरत असलेला आर्थिक संघ (EU) प्रस्थापित होईल आणि दक्षिण आशियायी मुक्त व्यापार विभाग संघ (SAFTA) संपूर्णत: दक्षिण आशियायी आर्थिक संघ (SAEU) मध्ये रुपांतरीत होऊन दक्षिण आशिया या प्रदेशाला सन 2010 पर्यत जगातील सर्वात मोठी बाजारपेठ बनवेल.

दक्षिण आशियातील दारिद्रय निर्मूलनास आर्थिक विकासाला गती देणे गरजेचे मानून त्यासाठी एकात्मीक बाजारपेठेची निर्मितीचे उद्दिष्ट आर्थिक एकात्मिकरणातूनच साधणे शक्य आहे हे लक्षात घेऊनच सार्कच्या निर्मितीनंतर सार्क च्या अकराव्या काटमांडू (नेपाळ) येथील परिषदेत सार्कच्या आर्थिक संघटन (Economic Union) चा मनोदय व्यक्त करण्यात आला होता आणि सार्क अत्युच्च पातळीवरील तज्ज्ञांच्या गटाने (Group of Eminent Persons - GEP) दिलेल्या परिषदेच्या अहवालात या उद्दिष्टपूर्तीसाठी एक विशिष्ट काळासाठीचा पथदर्शक नकाशाच दिला आहे, जेणेकरुन टप्प्याटप्प्याने उच्च पातळीवरील आर्थिक एकात्मिकरण साध्य करता येईल. त्यानुसारच प्रथम दक्षिण आशिया प्राधान्य व्यापार करार (SAPTA), त्यानंतर दक्षिण आशिया मुक्त व्यापार प्रदेश सार्कने निर्माण केले आहेत. हे करित असतांना 2015 मध्ये दक्षिण आशिया जकात संघ (SACU) आणि शेवटी 2020 मधे दक्षिण आशिया आर्थिक संघ (SAEU) ची निर्मिती जेणे करुन दक्षिण आशिया संपूर्णपणे एकात्मिक होऊन, संघटीतपणे जगाला खुले होऊन स्वत:चीच जगातील एक मोठी बाजारपेठ निर्माण करेल.

आर्थिक एकात्मीकरणात उच्च पातळीवरील श्रम आणि भांडवलाच्या गतीशीलतेबरोबरच स्थानिक देशांतर्गत पातळीवरील साकलिक आर्थिक धोरणे आणि बाहय धोरणे यांच्यातील समन्वय साधणे आवश्यक आहे. दक्षिण आशिया आर्थिक संघाचे (SAEU) महत्त्वाकांक्षी तसेच धाडसी पाऊल उचलतांना युरोपमधील एकात्मिकरणात युरोपियन आर्थिक संघ प्रस्थापित होण्यास स्थापनेनंतर अर्ध दशक गेले, हे लक्षात घेणे गरजेचे आहे.

प्रादेशिक एकात्मिकरणाच्या प्रक्रियेत चलन सहकार्य म्हणजेच सदस्य राष्ट्रांतील मौद्रिक अणि विनिमय दर विषयक धोरण यांच्यातील समन्वयाने एक स्थिर वित्तीय वातावरण प्रस्थापित करणे., व त्या अन्वये आर्थिक एकात्मिकरणाला प्रेरणा देणे शक्य आहे. कारण देशांतर्गत मौद्रिक धोरणाचा विदेशी राष्ट्रांबरोबरच, स्वत:चा देशांतर्गत आणि बाहय व्यापार दोन्हीवर परिणाम होतो.

पर्यायाने विनिमय दरावर परिणाम होतो. आणि व्यक्तिगत पातळीवर मौद्रिक धोरणाचे राष्ट्रांनी नियमन केले तर राष्ट्रराष्ट्रांमध्ये अस्थिरता निर्माण होऊन प्रत्येक देशाच्या चलन मूल्यात पर्यायाने प्रादेशिक व्यापार, गुंतवणुक...इ. अस्थिरता निर्माण होते.

युरोपमध्ये सदस्य राष्ट्रांनी उच्च पातळीवरील मौद्रिक सहकार्याच्या प्रादेशिक सहाय्याने प्रादेशिक चलन दर स्थैर्य आणि आर्थिक एकात्मिकरण प्रस्थापित केले आहे. प्रादेशिक चलनांच्या मागणीचे भविष्य (Currency Future Market ) लक्षात घेऊन व्यापारी वर्गास अनपेक्षित विनिमयदरातील चढउतार झेलण्याचे सामर्थ्य प्राप्त होते व आर्थिक व्यवहारांना व व्यापाराला व पर्यायाने आर्थिक विकासाला गती प्राप्त होते. हे दक्षिण आशियात तेव्हाच शक्य आहे जेव्हा प्रादेशिक चलनाला मागणीबाबत भविष्य अस्तित्वात येईल व आर्थिक एकात्मिकरण प्रक्रियेस वेग येईल. थोडक्यात उच्च पातळीवरील मौद्रिक सहकार्यामुळे स्थिर वित्तीय पर्यावरण निर्मिती होऊन आर्थिक एकात्मिक करणप्रक्रियेस गती प्राप्त होते.

सार्क च्या उच्च पातळी तज्ज्ञाच्या गट अहवालात (GEP1997-1998) देखील याची नोंद घेतलेली आहे. दक्षिण आशिया आर्थिक संघ (SAEU) बरोबरच त्यांनी एक मुद्रा/ चलन व्यवस्था (Single Monetory System) अथवा सामायिक मुद्रा (Common Currency) या उद्दिष्टांचा अंतर्भाव केलेला आहे आणि ही प्रक्रिया साध्य करण्यासाठी नंतर अहवालात 'मुद्रा आणि विनिमय धोरणातील उच्चपातळीवरील समन्वय' अशा अर्थाची टिपण्णी केली आहे.(SAARC GEP 1997 / 98 P.33)

आणि सार्क ने या दिशेने 'सार्क वित्त' (SAARC Finance ) ची स्थापना करुन पुढचे पाऊल टाकले आहे. सार्क वित्त हे एक सर्व सदस्य राष्ट्रांच्या केंद्रियबँकाचे गव्हर्नर्स आणि वित्त सचिव यांच्यात समन्वय प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने निर्माण केलेले, सार्क च्या काटमांडू येथील परिषदेत स्थापन केलेले एक मंडळ आहे.

दक्षिण आशियातील आर्थिक एकात्मिकरण प्रक्रियांचा विचार करतांना दक्षिण आशिया सामायिक मुद्रा विभाग होऊ शकतो का? हा प्रश्न निर्माण होतो. यावर विचार करतांना दक्षिण आशियातील राष्ट्रांवर आंतरराष्ट्रीय घडामोडींचा होणारा परिणाम, त्यातील सारखेपणा आणि वेगवेगळेपणा या दृष्टीने विचार केला जातो. हया परिणामांबाबत दक्षिण आशियात एकसारखेपणा नाही. दुसरा निकष म्हणजे दक्षिण आशियाचे अंतर्गत व्यापाराचे प्रमाण. सार्क च्या स्थापनेनंतर दोन दशकानंतरही सार्क अंतर्गत व्यापाराचे प्रमाण 4 प्रतिशत पेक्षा जास्त झाले नाही. 1995 मध्ये युरोप मध्ये हे प्रमाण 50 प्रतिशत पेक्षा जास्त, तर नाफ्ता (NAFTA), एशियन (ASEAN) आणि मरकोसुर (MERCOSUR) इ. प्रदेशांत देखील 20 प्रतिशत पेक्षा जास्त होते. थोडक्यात, सार्क अंतर्गत व्यापार आणि आर्थिक एकात्मिकरण असे सुचविते की, वर्तमान स्थितीत सार्क मध्ये केवळ प्राथमिक स्वरुपात मौद्रिक सहकार्य घडूनयेते आहे.

तरी देखील भविष्यातील स्थितीबद्दल काहीही अंदाज व्यक्त होत नाही. सामायिक मुद्रेचे निकष नैसर्गिक जोडणीतूनही निर्माण होतात. दक्षिण आशियासाठीच्या सामायिक चलनासंबंधीच्या पथदर्शक नकाशानुसार मौद्रिक सहकार्य आणि वास्तव एकात्मिकता यांच्यात एकवाक्यता ठेवून

सार्क मध्ये पाऊले उचलणे गरजेचे आहे यादृष्टीने सार्क वित्त (SAARC Finance ) ने वेगवेगळी पाऊले उचलण्यास सुरुवात केली आहे.

## तळटिपा आणि संदर्भसुची / Foot Notes and List of Reference-


1. Tongzon, Jose L; The Challenges of Regional Economic Integration: The Vietnamense Perspective, in 'Developing Economics', Institute of Developing Economics, Vol. XXXVII-2, June 1999, Tokyo, P. 142.
2. Dorrucci, Etture (et.al.), European Integration: What Lesson for Other Regions: A Case of Latin America, European Central Bank Working Paper Series, October 2002, P.7.
3. Miria Pigato, T.G. Srinivasan (ed.), South Asia's Integration into the World Economy, The World Bank, 1997, P.7.
4. Panchamukhi, Op.cit., P.18.
5. Http://www.wfmagazine.com/Features/Markets_update/economicintegragion_asia.html, 2004.
6. IMF, The World Economic Outlook-2005, International Monetary Fund, Washington, D.C., April 2005, Table 1.7, P. 33.
7. ADB, Asian Development Outlook-2004, Asian Development Bank, Manila, April 28, 2004, P. 32.
8. Zimba, Lyonpo Yeshey, A South Asian Panorama for the Twenty-First Century, in 'South Asian Survey', Sage Publication, New Delhi, Vol. 9, No.1, January-June 2002.
9. SAARC Secretariat, SAARC- A Profile, SAARC Secretariat, Kathmandu, July 2003, PP. 2-3.
10. Kalegame, Saman, SAFTA: A Critique, in 'South Asian Journal' (Quarterly), Free Media Foundation, Lahore, April-June 2004, P.11.
11. Yadav, Rameshwar, SAFTA: Realities, in 'Business Age' (Monthly), Vol. 6, No. 1, January 2004, PP. 37-38.
12. SAARC Secretariat, Agreement on South Asian Free Trade Area (SAFTA), SAARC Secretariat, Kathmandu, 2004, P.1.
13. Yadav, Op. cit, P.37.
14. Nephil Matangi Maskay, 'Common Currency Area: Prospects for South Asia' pub. in Economic Integration in South Asia, Nepal Rashtra Bank, April 2005, PP. 69-77.

# सांगली जिल्हयातील लघु उद्योगांच्या अपयशाच्या कारणांचा अभ्यास

**उल्हास महादेव माळकर**
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
पलूस, जि. सांगली
भ्रमणभाष : 9960859134.

**1) प्रास्ताविक :-**

भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये लघू व मध्यम उद्योगांचे आर्थिक महत्त्व फार मोठे आहे. राष्ट्रीय उत्पन्नातील हिस्सा, निर्यातीमधील हिस्सा, स्थानिक साधन सामग्रीचा वापर, औद्योगिक विकेंद्रीकरण, सरकारी महसूल व रोजगार निर्मिती या निकषांवर लघु व मध्यम उद्योगधंदे अत्यंत महत्त्वाची भूमिका पार पाडतात.

प्रस्तुत लेखकाने सांगली जिल्हयातील लघु उद्योगांच्या बाबतीत अपयशाची कारण मीमांसा करण्यासाठी प्राथमिक तथ्यांच्या आधारे केलेल्या सखोल अभ्यासाचे महत्त्वाचे निष्कर्ष या लेखात दिलेले आहेत.

**2) अभ्यास पद्धती :-**

या अभ्यासासाठी सांगली जिल्हयातील अयशस्वी लघु उद्योगांची माहिती हेतूपुर्वक पद्धतीने एका प्रश्नावलीच्या आधारे नमुना पाहणी पद्धतीने संकलित केली. त्यात प्रकर्षाने सांगली जिल्हयातील विविध भागातील लहान मोठया औद्योगिक वसाहती, तसेच महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या केंद्रामध्ये प्रत्यक्ष भेट घेवून अयशस्वी उद्योग संस्थांची यादी तयार करून त्यापैकी शक्य तितक्या जास्त लोकांना (उद्योजकांना) प्रत्यक्ष भेटून त्यांचा लघु उद्योग बंद का पडला याबाबत प्रश्नावलीच्या आधारे सविस्तर चर्चा करून निष्कर्ष मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

**3)सैद्धांतिक पार्श्वभूमी :-**

लघु उद्योगांच्या कामकाजाचा पूर्वी झालेला जो अभ्यास आहे तो लक्षात घेता सामान्यतः लघु उद्योग अपयशी का होतात याची सैद्धांतिक मांडणी पुढीलप्रमाणे करता येते.

**3.1)नियोजनात्मक दोष :-**

यात मुख्यतः पुढील घटकांचा समावेश होतो.

1.1 सदोष प्रकल्प लेखन किंवा प्रकल्प लेखनाचा अभाव.

1.2 बाजारपेठबद्दलचे चुकीचे सर्वेक्षण व विश्लेषण किंवा बाजारपेठेच्या सर्वेक्षणाचा अभाव.

1.3 उत्पादनासाठी चुकीच्या वस्तूची निवड.

**3.2) उत्पादन प्रक्रियेतील दोष :-**

यामध्ये पुढील घटक समाविष्ट होतात.

2.1 चुकीच्या ठिकाणी लघु उद्योग संस्थेची स्थापना करणे.

2.2 कालबाहय यंत्रसामग्रीचा वापर करणे.

2.3 माल साठवणूकीचे चुकीचे व्यवस्थापन.

2.4 अनावश्यक खर्च करण्याची प्रवृत्ती.

2.5 अकार्यक्षम व्यवस्थापन.

**3.3 वित्तीय स्वरूपाची कारणे :-**

या गटात पुढील घटकांचा समावेश होतो.

3.1 गुंतवणूकीसाठी वापरलेल्या निधीमध्ये कर्जाऊ भांडवलाचे अतिरिक्त प्रमाण.

3.2 खेळत्या भांडवलासाठी संस्थात्मक माध्यमातून पुरेसे वित्तीय निधी योग्य वेळी उपलब्ध न होणे.

**3.4 आदानात्मक घटक :-**

यामध्ये पुढील गोष्टींचा समावेश होतो.

4.1 उत्पादन प्रक्रियेसाठी योग्य, कुशल, प्रशिक्षित कामगारांचा अपुरा पुरवठा.

4.2 कच्या मालाचा अनियमित, अपुरा व अनिश्चित पुरवठा.

4.3 उत्पादनासाठी विजेची अनिश्चित, अपूरी व अनियमित व्यवस्था.

**3.5 इतर घटक :-**

यात पुढील गोष्टींचा समावेश होतो.

5.1 सरकारी धोरणातील अनिश्चितपणा, धरसोडपणा, कागदपत्रांच्या बाबतीत क्लिष्टता व सरकारी अधिकाऱ्यांची त्रयस्थ वृत्ती.

5.2 एकूण आर्थिक मंदी.

**3.6** सर्वेक्षण केलेल्या सर्व प्रकारच्या साहित्यातून लघु उद्योग संस्थांच्या अपयशाला कारणीभूत होणारा सर्वात महत्त्वाचा घटक जो निर्माण होतो, तो प्रामुख्याने वित्त व्यवस्थेशी संबंधित आहे. त्यातही उत्पादन प्रक्रियेसाठी सातत्याने लागणारे खेळते भांडवल अल्प मुदतीच्या कर्जाच्या स्वरूपात वाजवी व्याज दराला वेळच्यावेळी उपलब्ध न होणे हे लघु उद्योग संस्थांच्या आजारपणाचे / अपयशाचे सर्वाधिक महत्त्वाचे कारण ठरते.

**4) प्रत्यक्ष अभ्यास :-**

संशोधकाने आजारी / अपयशी लघु उद्योग संस्थांची 10 सूचींनी युक्त अशा प्रश्नावलीने जे सर्वेक्षण केले, त्यातून निर्माण झालेल्या प्राथमिक व दुय्यम तथ्यांच्या विश्लेषणाच्या आधाराने हे निष्कर्ष मांडले आहेत. सर्वेक्षणामध्ये मिरज तालुक्यातील लघु उद्योग संस्थांची संख्या सर्वाधिक आहे. कारण मिरज तालुक्यातच सांगली आणि मिरज ही दोन मोठी शहरे समाविष्ट होतात. या दोन शहरांच्या दरम्यान सांगली, मिरज (मिरज ब्लॉक) आणि सांगली, मिरज (कुपवाड ब्लॉक) अशा दोन ठिकाणी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची दोन केंद्रे आहेत. म्हणजेच सांगली जिल्हयातील 8 महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या केंद्रापैकी 2 मिरज तालुक्यात आहेत. तसेच सांगली जिल्हयातील 5 औद्योगिक वसाहतीपैकी 2 मिरज तालुक्यात आहेत. सर्वेक्षण

विषय असणाऱ्या 57 लघु उद्योग संस्थांच्यापैकी ४९ संस्था सन 1992 ते 1996 या काळात स्थापन झालेल्या आहेत.

सांगली जिल्हयातील 34 लघु उद्योग संस्थांच्या उभारणीसाठी 1 वर्ष किंवा कमी काळ लागलेला आहे. 52 लघु उद्योग संस्थांची स्थापना औद्योगिक विकास आणि नियंत्रण कायदा शेडयुल (3)1951 प्रमाणे झाली आहे. 57 पैकी 42 लघु उद्योग संस्था व्यक्तिगत मालकीच्या आहेत, तर 51 लघु उद्योग संस्था स्वतंत्र स्वरूपाचे उत्पादन करतात.

उत्पादन वस्तूमध्ये अभियांत्रिकी माल, कापड, रसायने, इमारत बांधकाम, शेतीपूरक साहित्य या गोष्टी महत्त्वाच्या दिसतात.

तांत्रिक वर्गीकरणाचा विचार करता 57 पैकी 38 लघु उद्योग संस्था अति लहान उद्योग या वर्गात समाविष्ट होतात. 57 पैकी 52 लघु उद्योजक 40 वर्षाच्या आतील वयोगटाचे आहेत.32 लघु उद्योजक 12 वी पेक्षा कमी शिक्षणाचे आहेत. तर 25 लघु उद्योजक पदवी, पदविका, पदव्युत्तर किंवा व्यावसायिक शिक्षण घेतलेले आहेत. 57 पैकी 27 उद्योजकांना उत्पादन व विपणन या विषयी बऱ्यापैकी पुर्वानुभव आहे.

बहुसंख्य उद्योजकांनी जादा उत्पन्न मिळविण्यासाठी लघु उद्योग संस्थेची स्थापना केली आहे, तर सामाजिक प्रतिष्ठा व घराण्याचे नाव करण्याची इच्छा हे लघु उद्योग संस्था स्थापन करण्याचे महत्त्वाचे कारण दिसून येते.

बाजारातील प्रोत्साहक परिस्थिती व उत्पादनाचा सोयिस्कर प्रकार हे घटक लघुउद्योग संस्था निवडीची महत्त्वाची कारणे दिसतात. उत्पादनासाठी वस्तू निवडताना देखील संबंधित वस्तूला मोठी व सतत मागणी असणे महत्त्वाचे ठरलेले दिसते. विशेष म्हणजे 57 पैकी 55 लघु उद्योग संस्थांनी प्रकल्प अहवाल तयार केला होता व तो प्रामुख्याने खाजगी सल्लागारांकडून मार्गदर्शन घेवून तयार केला होता.

57 पैकी 49 लघु उद्योजकांनी प्रचलित उत्पादनाचे अनुकरण केलेले दिसून येते. ते करत असताना त्यापैकी 28 उद्योजकांनी उत्पादनात थोडीशी सुधारणा केल्याचे आढळून येते. कच्चा माल उपलब्ध करण्यासाठी या उद्योजकांना शासनाची मदत झालेली नाही. त्यांना कच्चा माल खुल्या बाजारातून घ्यावा लागतो. विशेष म्हणजे सर्वच लघु उद्योजकांनी उत्पादनासाठी यांत्रिक, भांडवल प्रधान, देशी उत्पादन तंत्राचा वापर केलेला आहे. सर्वच उद्योजकांना संबंधित उत्पादन तंत्रात विजेचा वापर करावा लागतो.

लघु उद्योग संस्थेची जागा ठरविताना महत्त्वाचे ठरणारे घटक बाजारपेठेची उपलब्धता, कच्च्या मालाची उपलब्धता आणि कुशल कामगारांची उपलब्धता हे घटक महत्त्वाचे ठरतात.

53 लघु उद्योग संस्थांच्या बाबतीत वाहतूकीचा खर्च एकूण उत्पादन खर्चामध्ये 10% पेक्षा कमी दिसतो. उत्पादन खर्च किमान ठेवण्यासाठी मुख्यतः कच्च्या मालाचा वापर काटकसरीने करणे या गोष्टीला महत्त्व दिलेले दिसते. संबंधित लघु उद्योजकाने सांगली भागातच लघुउद्योग संस्था स्थापन करण्यासाठी वीज पुरवठा, पाणी पुरवठा, रेल्वे व्यवस्था, उत्तम संपर्क व्यवस्था आणि शहरी बाजारपेठेची उपलब्धता हे घटक महत्त्वाचे ठरले, असे स्पष्टीकरण केले आहे. अभ्यास विषय असलेल्या लघु उद्योग संस्था विविध गटांच्यामध्ये विभागल्या जातात. तथापि, या

बहुतेक लघु उद्योग संस्थांच्या बाबतीत स्थापित उत्पादन क्षमतेचा अपुरा वापर, गुंतवणूकीमध्ये कर्जाऊ भांडवलाचे अतिरिक्त प्रमाण ही दोन महत्त्वाची वैशिष्ट्ये दिसली.

या सर्वच लघु उद्योग संस्थांच्या बाबतीत आजारपणाच्या प्रारंभी अपुऱ्या उत्पादन क्षमतेचा अपुरा वापर होण्याची जी महत्त्वाची कारणे सर्वेक्षणात स्पष्ट झाली, त्यात पहिल्या क्रमांकाचे कारण खेळत्या भांडवलाची अडचण हे होय. दुसरे महत्त्वाचे कारण म्हणजे मागणीची घटती प्रवृत्ती व तिसरे महत्त्वाचे कारण, कच्च्या मालाचा अपूरा पुरवठा होय. या सर्व लघु उद्योग संस्थांच्या बाबतीत खर्च = उत्पन्न उत्पादन पातळी संबंधी चौकशी केली असता असे दिसून आले की, लघु उद्योग संस्थांच्या वाढत्या आजारपणाच्या काळात खर्च = उत्पन्न बिंदूपेक्षा कमी उत्पादन करणाऱ्या लघु उद्योग संस्थांची संख्या वाढत गेलेली दिसते.

आजारपण सुरू झाल्यानंतर पुढच्या कालखंडात उत्पादन क्षमतेचा वापर कमी होण्याबरोबर एकूण मनुष्य बळाचा वापर घटत गेलेला दिसतो. मनुष्यबळात होणारी घट प्रामुख्याने अकुशल कामगारांच्या बाबतीत होते. कुशल कामगार टिकवून ठेवण्याची प्रवृत्ती व्यक्त होते. आजारपण सुरू झाल्यापासून संस्था बंद पडण्यापर्यंतच्या कालखंडात वास्तव स्वरूपात उत्पादनाची वार्षिक उलाढाल सतत कमी होत गेलेली दिसते.त्याचबरोबर या उलाढालीचे बाजार मूल्य देखील घटलेले दिसते.

आजारी किंवा अपयशी लघु उद्योग संस्थांची वित्तीय परिस्थिती लक्षात घेता सर्वसाधारणपणे असे दिसते की, एकूण भांडवल गुंतवणूकीपैकी 54.87% खर्च यंत्रसामुग्री, फर्निचर आणि पूरक गोष्टीवर झालेला आहे, तर 38.86% खर्च जमीन, इमारत व अनुषंगिक बाबींवर झालेला आहे. लघु उत्पादन संस्था बंद करत असताना देणे असलेल्या लघु उद्योग संस्थांची संख्या 44 होती व त्यांचे सरासरी देणे रू. 21,85,000/- इतके होते. बहुसंख्य लघु उद्योग संस्थांच्या बाबतीत हे देणे व्यापारी बँकेशी संबंधित होते.

अभ्यास विषय असलेल्या लघु उद्योग संस्थांचा प्रकल्प खर्च लक्षात घेता एकूण 57 लघुउद्योग संस्थांपैकी 33 लघु उद्योग संस्थांच्या बाबतीत गुंतवणूकीचे आजचे सरासरी मूल्य रू. 6 लाखाच्या आत आहे. बहुसंख्य लघु उद्योजकांना गुंतवणूकीसाठी 18% पेक्षा अधिक व्याजदराने कर्ज घ्यावे लागलेले आहे. ज्या लोकांनी खाजगी सावकाराकडून कर्जे घेतली आहेत, त्यांना पठाणी व्याज दयावे लागले आहे. या लघु उद्योजकांनी घेतलेल्या कर्जाबद्दल केलेल्या परतफेडीबद्दल व त्यांच्या देय असलेल्या कर्जाबद्दल माहिती लक्षात घेता पुढील निष्कर्ष मांडता येतात.

1) कर्ज घेतलेल्या 54 लघु उद्योग संस्थांपैकी 10 लघु उद्योग संस्थांची थकित कर्जे नव्हती.

2) 3 लघुउद्योग संस्थांनी कर्ज घेतलेलेच नव्हते.

3) ज्या 54 लघु उद्योग संस्थांनी कर्जाऊ भांडवल घेतले होते त्यांचे सरासरी प्रमाण रू. 16,11,074/- असे आहे.

4) सर्वेक्षणाच्या टप्प्यात 54 लघुउद्योग संस्थांनी घेतलेल्या कर्जापैकी एकूण रक्कम रू. 2,15,97,000/- एवढी कर्ज परतफेड केलेली होती. म्हणजेच प्रत्येक लघु उद्योग संस्थेमार्फत रू. 3,99,944/- सरासरी कर्जफेड झालेली होती. तथापि, 54 लघु उद्योग संस्थांचे एकूण थकित कर्ज रू. 6,54,01,000/- इतके म्हणजेच सरासरी थकित

कर्ज रू.12,11,129/- असे होते.

5) विशेष म्हणजे या 54 लघु उद्योग संस्थांनी परतफेड केलेल्या कर्जाऊ मुद्दलापेक्षा जास्त व्याज भरलेले दिसते. 54 लघु उद्योग संस्थांनी भरलेले व्याज रू.3,49,89,130/- होते. म्हणजेच सरासरी दिलेल्या व्याजाची रक्कम रू.6,48,052/- अशी होते.

6) त्याचबरोबर या 54 लघु उद्योग संस्थांचे थकित व्याज रू. 4,77,69,000/- होते. म्हणजेच सरासरी थकित व्याज रू. 8,84,611/- होते.

7) ज्या 44 लघु उद्योग संस्थांच्या बाबतीत थकित कर्जे होती, त्या थकित कर्जाचा सरासरी कालावधी 7 वर्षे 6 महिने होता.

8) 54 लघु उद्योग संस्थांनी कर्जाऊ भांडवलाच्या संदर्भात दिलेल्या व देय असलेल्या व्याजाचा विचार करता सरासरी व्याजदर 17.48% पडतो.

या लघु उद्योग संस्थांच्या उत्पादनाच्या दृष्टीने त्यांचा बाजारातील हिस्सा किती आहे हे लक्षात घेता 40 लघु उद्योग संस्थांच्या बाबतीत (70% पेक्षा अधिक) बाजारातील मागणीचा हिस्सा 20% पेक्षा कमी होता. या लघु उद्योग संस्थांच्या विपणनाच्या बाबतीत फार विचारपूर्वक शिस्तबध्द व्यवस्था नाही हे स्पष्ट होते.

या 57 आजारी किंवा अपयशी लघु उद्योग संस्थांच्या बाबतीत औद्योगिक आजारपणाची कारणे कोणती याबद्दल जी माहिती घेतली ती लक्षात घेता अयोग्य नियोजन, उत्पादनाच्या मागणी बद्दल अवास्तव अनुमान, स्थिर मालमत्तेमध्ये अनावश्यक व अयोग्य गुंतवणूक, प्रकल्प खर्चात झालेली वाढ ही कारणे प्राथमिक पातळीला स्पष्ट होतात.

प्रकल्पाची अयोग्य कार्यवाही, वीज कनेक्शन मिळण्यास विलंब हे घटक सुद्धा प्रकर्षाने लक्षात येतात. तथापि, 73.68% लघु उद्योग संस्थांनी उत्पादन क्षमतेचा वाढता अपुरा वापर हे आजारपणाचे प्राथमिक कारण तसेच लघु उद्योग संस्था बंद पडण्याचे महत्त्वाचे कारण सांगितले आहे. वित्तीय निधींची कमतरता हे औद्योगिक आजारपणाचे व अपयशाचे सर्वात महत्त्वाचे कारण ठरते असे 75.43% उद्योजकांना वाटते. वित्तीय नियोजन व्यवस्थित करता येत नाही व उपलब्ध वित्तीय साधनसामुग्री कार्यक्षमतेने वापरता येत नाही हे देखील एक महत्त्वाचे कारण स्पष्टपणाने दिसून येते.

उद्योजकांनी अकार्यक्षम व्यवस्थापन या गोष्टीचा उल्लेख केलेला आहे. परंतु त्या घटकाला त्यांनी फार मोठे महत्त्व दिलेले नाही. कच्च्या मालाचा अनियमित व अपुरा पुरवठा हे देखील लघु उद्योग संस्थेच्या आजारपणाचे / अपयशाचे एक महत्त्वाचे कारण ठरते. बहुतेक लघु उद्योजकांनी मंदीची परिस्थिती हे आजारपणाचे व अपयशाचे त्यांच्या नियंत्रणाबाहेर असणारे कारण आहे असे स्पष्ट केले आहे.

औद्योगिक आजारपण निर्माण झाल्यानंतर कमी अधिक काळाने लघु उद्योग संस्था बंद पडते असे मत 57 पैकी 45 लघुउद्योजकांनी व्यक्त केले. 1999 ते 2002 या काळात अभ्यास घटक असलेल्या लघु उद्योग संस्थांपैकी 33 लघु उद्योग संस्था बंद पडलेल्या दिसतात.

औद्योगिक आजारपण सुरू झाल्यानंतर उत्पादनात घट होणे, कामगार कपात करणे, बँकांची देणी थकणे अशी प्राथमिक चिन्हे दिसतात. त्यानंतर बँकांची कर्ज परतफेड पूर्णतः थांबणे अशी अवस्था निर्माण होते.

बहुसंख्य लघु उद्योग संस्थांच्या बाबतीत

स्थापित यंत्रसामग्री काढून ठेवणे, किंवा ती यंत्रसामग्री विकणे व शक्य झाल्यास लघु उद्योग संस्थेचीच विक्री करणे या क्रमाने घटना घडतात. अशा आजारी किंवा बंद पडलेल्या लघु उद्योग संस्था यांचे पुनर्वसन करण्याच्या संदर्भात जे प्रतिसाद उद्योजकाकडून घेतले ते लक्षात घेता या पुनर्वसनाच्या प्रयत्नामध्ये ज्यांच्याकडून सहकार्याची व प्रतिसादाची अपेक्षा असते, त्यापैकी भागीदार, वित्तीय संस्था, शासकीय संस्था यांचा प्रतिसाद पूर्णतः थंड होता. तथापि, उद्योजकांच्या कुटुंबातील सदस्यांकडून मात्र पुनर्वसनासाठी तुलनात्मक दृष्टीने अधिक चांगला प्रतिसाद मिळालेला दिसतो. विशेष म्हणजे अपेक्षेप्रमाणे उद्योग संस्थेच्या पुनर्वसनासाठी कामगाराकडून बऱ्यापैकी प्रतिसाद मिळालेला आहे. किंबहुना भागीदाराच्या प्रतिसादापेक्षा देखील अधिक चांगला आहे.

त्याचबरोबर असेही लक्षात आले की, पुनर्वसनाच्या प्रयत्नामध्ये संबंधित लघु उद्योग संस्थांना फारसे यश मिळालेले नाही. 31 संस्थांच्या बाबतीत पुनर्वसनाच्या प्रयत्नात 20% पर्यंत देखील यश आलेले नाही. 100% यशस्वी पुनर्वसन एकाही लघु उद्योग संस्थेच्या बाबतीत झालेले नाही.

**5)** उपरोक्त विश्लेषणाच्या आधारे महत्त्वाचे निष्कर्ष मांडून त्याच्या आधारे लघु उद्योग संस्थांच्या आजारपणाच्या किंवा अपयशाच्या प्रश्नाच्या बाबतीत कोणत्या उपाययोजना करता येतील याबद्दल स्पष्ट भूमिका पुढे विशद केलेली आहे.

### 6)धोरणाची दिशा :-

या अभ्यासाच्या संदर्भात करण्यात आलेले पूर्व साहित्याचे सर्वेक्षण, प्रारंभीच्या प्रकरणात मांडलेली गृहितके, सर्वेक्षणाच्या आधाराने संकलित झालेली तथ्ये, त्यांचे सारणीकरण आणि विश्लेषण या सर्वांचा आढावा घेता लघुउद्योग संस्थांच्या मधील आजारपण व त्यातून निर्माण होणारे अपयश या गोष्टी टाळण्यासाठी किंवा त्यांचे किमानीकरण करण्याच्या बाबतीत पुढील मुद्दे उपस्थित करता येईल.

### 6.1 उद्योजक प्रवर्तक यांच्याशी संबंधित भाग

उद्योजकाने किंवा प्रवर्तकाने लघु उद्योग संस्था स्थापन करण्यापूर्वी किमान चार गोष्टींच्या बाबतीत अत्यंत काळजीपूर्वक प्रकल्प अहवाल तयार करणे गरजेचे आहे.

6.1.1 ज्या वस्तूचे उत्पादन करायचे आहे त्याच्या गतकालीन मागणीसंबंधी, पुरवठयासंबंधी व भविष्यातील वाढीसंबंधी शास्त्रशुध्द बाजार संशोधन.

6.1.2 संबंधित वस्तूच्या कमाल कार्यक्षम उत्पादनासाठी अद्ययावत स्वरूपाची कोणती उत्पादन तंत्रे उपलब्ध आहेत व त्यासाठी किती प्रमाणात गुंतवणूक करावी लागेल याविषयी शास्त्रशुध्द पर्यायी अंदाज.

6.1.3 प्रकल्प स्थापन करण्याची कमाल किफायतशीर जागा कोणती याचा अभ्यास.

6.1.4 प्रकल्पातून निर्माण होणारा उत्पन्न प्रवाह, प्रकल्पाचा फलधारणा कालखंड, प्रकल्पाची मानव संसाधन रचना व प्रकल्पासाठी कमीत कमी खर्चावर सोयिस्कर पद्धतीने वित्तप्रबंध करण्याची योजना.

### 6.2 सरकार संबंधित भाग :-

या बाबतीत औद्योगिक वसाहती, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ व जिल्हा उद्योग केंद्र यांच्या माध्यमातून ज्या परिरचनात्मक सोयी उपलब्ध केल्या जातात त्या योग्य आहेत. पण त्यांची प्रत्यक्ष उपलब्धता कार्यक्षम व गतिमान करण्याची गरज आहे. लघु उद्योजकांना प्रकल्प

अहवाल लिहिण्याच्या कामकाजात सातत्यपूर्ण मार्गदर्शन करणारी तज्ज्ञ सेवा जिल्हा उद्योग केंद्रात वाजवी खर्चाला उपलब्ध करून देण्यात यावी. तसेच कच्चा माल, पाणी पुरवठा, वीज पुरवठा, बाजारपेठ,मागणी, पुरवठा, उत्पादन तंत्र या बाबतीतील अद्ययावत माहिती ऑन लाईन देण्याची जबाबदारी जिल्हा उद्योग केंद्रावर सोपवावी.

**7) वित्तीय आयाम :-**

याबाबतीत पुढील गोष्टी लक्षात घेणे आवश्यक आहे. लघु उद्योग संस्थांना गुंतवणूकीसाठी दिले जाणारे कर्जाऊ भांडवल एकूण प्रकल्प गुंतवणूकीच्या 70% पेक्षा जास्त असू नये. म्हणजेच प्रवर्तकाने स्वतःच्या बचतीमधून किमान 30% गुंतवणूक भांडवल उभे केले पाहिजे. अशा लघु उद्योजकांना हे कर्जाऊ भांडवल मोठया उद्योजकांच्या तुलनेत किमान 2% कमी व्याजाने उपलब्ध करून देण्यात यावे. सर्वात महत्त्वाचा भाग असा की, लघु उद्योग संस्थांना उत्पादनाची प्रक्रिया सुरू करण्यापूर्वी 3 महिने व प्रकल्प उभारणी झाल्यापासून 6 महिन्याच्या आत खेळत्या भांडवलापोटी उत्पादन क्षमतेचा विचार करून त्याच्या किमान 70% अल्प मुदतीचा कर्ज पुरवठा करण्याची व्यवस्था करावी. लघु उद्योजकांच्या वित्तीय व्यवस्थापनावर निधीचा पर्याप्त वापर होण्याच्या दृष्टीने वित्तीय संस्थांच्यामार्फत ठराविक कालांतराने मार्गदर्शक वित्तीय पर्यवेक्षण उपलब्ध करून दयावे.

उपरोक्त मुद्यांखेरीज काही गोष्टी किरकोळ वाटल्या तरी निर्णायक महत्त्वाच्या ठरतात. त्यामध्ये वीज पुरवठा, पाणी पुरवठा तसेच वाहतुक व्यवस्था यांचे उद्योग व्यवस्थेच्या विकासासाठी सुसंवादी-करण करणे गरजेचे आहे. त्याचबरोबर आजारी पडू लागलेल्या लघु उद्योग संस्थांना दुरूस्त करण्यासाठी व बंद पडलेल्या लघु उद्योग संस्थांच्या पुनर्वसनासाठी भारतीय लघुउद्योग विकास बँक यांच्या पुरस्काराने राष्ट्रीय पातळीवर ' लघुउद्योग पुनर्वसन महामंडळ' निर्माण करण्यात यावे.

या महामंडळासाठी 'भारतीय रिझर्व्ह बँक, भारतीय औद्योगिक विकास बँक', 'आय.सी. आय.सी.आय., स्मॉल इंडस्ट्रीज डेव्हलपमेंट बँक ऑफ इंडिया' तसेच 'बोर्ड ऑफ इंडस्ट्रीयल फायनान्स ॲण्ड रीकन्स्ट्रक्शन' व राज्य वित्तीय महामंडळ यांच्या सहभागाने आवश्यक ते भांडवल उभारण्यात यावे. त्यासाठी प्राथमिक रू.500 कोटींचे भांडवल भारत सरकारने अर्थसंकल्पातून उपलब्ध करून दयावे.

लघुउद्योग संस्थांच्या आजारपणाबद्दल तसेच त्यांच्या अपयशाबद्दल सातत्याने तथ्य संकलन, त्यांचे सारणीकरण व विश्लेषण आणि संशोधन करणारी एक व्यवस्था लघुउद्योग पुनर्वसन महामंडळामार्फत कायम चालविण्यात यावी व त्यांच्या अभ्यासाची फलिते वर्षातून दोनदा खास अहवालाच्या माध्यमातून औद्योगिक क्षेत्राला उपलब्ध करू देण्यात यावीत.

# "सातारा व सांगली जिल्ह्यातील मेंढपाळांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचा अभ्यास "

टी.डी.महानवर
सावित्रीबाई फुले महिला
महाविद्यालय,
सातारा

जे.एस.चौधरी
माजी प्राचार्य, किसनवीर महाविद्यालय,
वाई

भारताचा मेंढी पालनात जगात तिसरा क्रमांक लागतो. भारतातील मांस उत्पादनांपैकी 3.5 % मेंढीपासून व 15.3 % मांस शेळी पालनाद्वारे प्राप्त होते. शेळ्या-मेंढ्यांचे मांस, कातडी, लोकर याची विदेशात निर्यात होवून परकीय चलन मिळवून देण्यास हा व्यवसाय मदत करतो.

महाराष्ट्रातील एकूण मांस उत्पादनापैकी 11 % मेंढी पालनाद्वारे व 23 % शेळी पालनाद्वारे प्राप्त होते. बदलती जीवनशैली व चंगळवाद यामुळे मांसाहाराचे प्रमाण वाढत असून विशेषत: बोकड व कोकराच्या मांस उत्पादनास प्रथम पसंती दिली जाते. लोकसंख्या वाढीचा दर व मांस उत्पादन याचे प्रमाण व्यस्त असल्याने मांसाचे दर वाढत आहेत. भारतात संतुलित आहारात प्रती माणसी प्रती दिन 24 ग्रॅम मांसाहाराची गरज असताना उपभोग फक्त 5 ग्रॅम असल्याचे दिसून येते. आर्थिक विकासाचा दर, वाढती लोकसंख्या व बदलत्या जीवनशैलीमुळे मांस उत्पादन व्यवसायास चांगले भवितव्य आहे.

मेंढी पालन प्रामुख्याने मांस उत्पादनासाठी केले जाते. मेंढपाळास 75 % उत्पन्न कोकरे विक्रीतून, 20 % खतापासून व 5 % लोकरीपासून मिळते. कळपाच्या किंमतीच्या 40 ते 45 % उत्पन्न दरवर्षी मेंढपाळास मिळते. या व्यवसायावर शेळ्या-मेंढ्याचे व्यापारी, खाटीक, लोकर प्रक्रीया, कातडी कमावणे इ. व्यवसाय अवलंबून आहेत. शेतात खत, घरात एक मत व गावात पत असणारा शेतकरी समाधानी असतो. शेतकऱ्याच्या शेताला लेंडी खत पुरविण्याबरोबर मेंढपाळ शेतकऱ्याची पत टिकविण्यास मेंढीपालन व्यवसाय मदत करतो. त्यामुळे मेंढपाळास आर्थिक अडचणीच्या वेळी सावकार व बँकेकडे सहजासहजी जावे लागत नाही. महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात

कर्जबाजारीपणामुळे आत्महत्या होत असताना एकाही मेंढपाळाने आत्महत्या केल्याचे दिसून आले नाही.

महाराष्ट्रात 92,500 कुटुंबे मेंढपाळ व्यवसाय करतात. सातारा जिल्ह्यात 4,556 व सांगली जिल्ह्यात 3,088 कुटुंबाकडून हा व्यवसाय केला जातो. मांस, कातडी, लोकर व खत उत्पादनात महत्वाच्या भूमिका पार पाडणारा व भटकंती करून मेंढपाळ व्यवसाय करणारा मेंढपाळ समाज सामाजिकदृष्ट्या मागासलेला असून आधुनिक विकासाच्या प्रवाहापासून दुरावत चाललेला दिसून येतो.

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये सातारा व सांगली जिल्ह्यातील एकूण 7,644 मेंढपाळ कुटुंबापैकी 790 कुटुंबांचा अभ्यास केलेला आहे.

1.2 उद्देश :

सातारा व सांगली जिल्ह्यातील मेंढपाळ कुटुंबाच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचा अभ्यास करून, त्यांच्या सामाजिक व आर्थिक प्रश्नांचा शोध घेणे व उपाययोजना सुचविणे.

1.3 **संशोधन पद्धती :**

वरील उद्देश विचारात घेवून भटकंती करणाऱ्या व न करणाऱ्या माण, फलटण, खंडाळा, खटाव, जत, कवठेमहंकाळ,आटपाडी, वाळवा, मिरज, कडेगाव, कराड, सातारा, वाई व कोरेगाव तालुक्यातील मेंढपाळांच्या संख्येच्या 10.33 % नमुना पद्धतीने (Random sampling) प्रश्नावलीच्या आधारे मेंढपाळांच्या मुलाखती घेवून एकत्रित माहितीचे विश्लेषण केले व इतर दुय्यम माहितीचा आधार घेतला आहे.

**1.4 मेंढीपालन व्यवसायाची पार्श्वभूमी :**

मेंढीची उत्पत्ती 2.5 दशलक्ष वर्षापूर्वी समजली जाते. इ.स.पूर्व 10 ते 6 हजार वर्षापूर्वीपासून मानवाने मेंढ्या जोपासण्यास सुरुवात केली. अश्मयुगात आदिमानवाने आपली दैनंदिन दूध, मांस व संरक्षणाची गरज पूर्ण करण्यासाठी अनुक्रमे शेळी, मेंढी व कुत्रा असे तीन प्राणी पाळण्यास सुरुवात केली. रानटी अवस्थेत मानव समुहाने रहाता होता. अन्नासाठी प्राण्यांची शिकार व वस्त्र म्हणून प्राण्याची कातडी वापरत होता. या काळात सर्वात गरीब प्राणी म्हणून मेंढ्या मानवाच्या सहवासात आल्या. शतकानुशतके विशिष्ट भौगोलिक प्रदेशात व हवामानात चारा व वैरणीवर पारंपरिक पद्धतीने जोपासल्याने स्थानिक वातावरणाशी मेंढ्या समरस झाल्या. स्थलांतर हे मेंढीपालनाचे अविभाज्य अंग बनले. मानवाने सशक्त, बलवान व अधिक उत्पादन देणाऱ्या मेंढ्यांची निवड करुन चांगल्या पद्धतीने प्रजनन व चारा व्यवस्थापनास सुरुवात केली. शरीररचना, उंची, वजन व अनुवंशिक गुणधर्माच्या आधारे जगात 200 पेक्षा जास्त मेंढ्यांच्या जाती आहेत. त्यापैकी भारतात 41 जाती आढळतात.

1.5 **समाजव्यवस्थेत मेंढीपालन व्यवसायाचे स्थान :**

वैदीक काळापासून पशुधनाचा संबंध समाजव्यवस्थेशी होता व व्यक्तीची समाजातील प्रतिष्ठा त्याच्याजवळ असलेल्या पशुधनावर अवलंबून होती, म्हणून मेंढपाळास महाराष्ट्रभर धनगर (धनाचे अगार), कर्नाटकात कुबेर (श्रीमंत), आंध्रपदेशात करुमा व गोल्ला (धनवान) असे

संबोधले जाते. गरीब मेंढपाळ शेतकऱ्याला नैसर्गिक आपत्ती व अडचणीच्या वेळी मेंढीच तारणहार ठरते व त्याला आर्थिक स्थैर्य देण्यास मदत करते. मेंढीला 'फिरती बँक' असे म्हणतात. शेतकरी कुटुंबातील स्त्रियासुद्धा आपली समाजातील पत व प्रतिष्ठा टिकविण्यासाठी स्वतःच्या मालकीच्या शेळ्या व मेंढ्यांचा सांभाळ करतात. त्यामुळेच मुलीला विवाहानंतर शेळी/गाय आंदण म्हणून देण्याची प्रथा समाजात दिसून येते.

### 1.6 **सातारा व सांगली जिल्ह्यातील मेंढीपालन व्यवसायाचे स्वरुप :**

सातारा व सांगली जिल्ह्यातील मेंढीपालन व्यवसाय प्रामुख्याने दुष्काळी भागात केंद्रीत झालेला आहे. शेतकरी शेती उत्पन्नातील अनिश्चिततेमुळे पूरक व्यवसाय म्हणून शेळी-मेंढी पालनावर अवलंबून आहे. मेंढपाळ पावसाळ्यात 4 महिने शेती करतात व ऑक्टोबर ते जून या काळात चारा-पाण्याच्या शोधात आपला कुटुंब कबिला व मेंढ्याचे कळप घेवून बागायती क्षेत्राकडे स्थलांतर करतात. त्यांच्यासोबत घोडे, कोंबड्या व कुत्री असतात. अधिकांश मेंढपाळांचा स्थलांतर मार्ग निश्चित असतो. उघड्यावरचा संसार असल्याने ऊन, वादळ, पाऊस व कडाक्याच्या थंडीत शेतात राहून मेंढ्याचे संगोपन करावे लागते. सातारा जिल्ह्यातील मेंढपाळ जिल्ह्याच्या पश्चिम भागात, बारामती, इंदापूर, पंढरपूर, बार्शी व लातूर या ठिकाणी स्थलांतर करतात. जत कवठेमहंकाळ व आटपाडी तालुक्यातील मेंढपाळ सातारा व सांगली जिल्ह्यातील पश्चिम भाग पंढरपूर, बार्शी व लातूर परिसरात स्थलांतर करतात. दुष्काळ व चारा टंचाईमुळे भटके जीवन, दररोज नवे गाव, नवे शिवार त्यामुळे रस्ते, नाले, पडीक जमिनी, कॅनॉल, ओढे व नदीची किनार, गायरान जमिनी ही मेंढ्या चारण्याची हक्काची ठिकाणे आहेत. दुसऱ्याच्या शेतात मेंढ्या चारल्यास मेंढ्यांना हाकणाऱ्या मेंढपाळांना शेतकरी हाकलून लावतात. प्रसंगी शेतकऱ्याकडून हिन वागणूक मिळते.

भटकंतीमुळे मुलांच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष, आरोग्य व वैद्यकीय सुविधांचा अभाव, एकाकी जीवन, मेंढ्यांचे लसीकरण यासारख्या प्रश्नांना सामोरे जावे लागते. वाढते शहरीकरण, औद्योगिकीकरण, वनीकरण विभागाची बंधने यामुळे हा व्यवसाय अनेक आव्हानांना सामोरा जात आहे. अशा प्रतिकुल परिस्थितीशी सामना करणाऱ्या मेंढपाळ समाजाच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचे अवलोकन केले येथे आहे.

1.7 सातारा व सांगली जिल्ह्यातील मेंढ्यांची व मेंढपाळांची संख्या सारणी क्र. 1 व 2 मध्ये दिलेली आहे.

## सारणी क्र. 1
## सातारा जिल्ह्यातील तालुकानिहाय मेंढ्यांची व मेंढपाळांची संख्या

| अ.न. | तालुका | मेंढ्या (पशुगणना 2003) | मेंढ्या (पशुगणना 2007) | मेंढपाळ | तालुकानिहाय मेंढ्याचे प्रमाण |
|---|---|---|---|---|---|
| 1 | सातारा | 8398 | 1552 | 52 | 0.49 |
| 2 | कराड | 19321 | 13101 | 205 | 4.17 |
| 3 | कोरेगाव | 21705 | 19246 | 163 | 6012 |
| 4 | वाई | 10293 | 8133 | 206 | 2.58 |
| 5 | जावली | 1972 | 1752 | 36 | 0.55 |
| 6 | महाबळेश्वर | 13 | 1501 | 28 | 0.47 |
| 7 | पाटण | 2977 | 1261 | 26 | 0.40 |
| 8 | खंडाळा | 40585 | 46902 | 715 | 14.93 |
| 9 | फलटण | 110399 | 91970 | 1565 | 29.27 |
| 10 | माण | 107983 | 99333 | 1064 | 31.62 |
| 11 | खटाव | 30048 | 29393 | 506 | 9.35 |
| | एकूण | 353496 | 314143 | 4556 | 100 |

संदर्भ : 1) पशुगणना 2003 व 2007

2) तालुका पशुधन विकास अधिकारी यांचे अहवाल

वरील सारणी क्र. 1 नुसार असे दिसून येते की, 2003 मधील मेंढ्यांच्या संख्येपेक्षा 2007 मध्ये मेंढ्यांची संख्या 39253 ने (11.14%) कमी झालेली आहे. 2004-05 मधील दुष्काळी परिस्थितीत चारा टंचाईमुळे मेंढपाळांनी कळप लहान ठेवले तर काही मेंढपाळांनी विकून टाकले असे दिसून येते. जिल्ह्याच्या पूर्व भागातील दुष्काळी तालुक्यात 85.17 % मेंढ्यांची संख्या आहे. तर पश्चिम बागाईत क्षेत्रात फक्त 14.73 % मेंढ्यांची संख्या दिसून येते.

## सारणी क्र. 2
## सांगली जिल्ह्यातील तालुकानिहाय मेंढ्यांची व मेंढपाळांची संख्या

| अ.न. | तालुका | मेंढ्या (पशुगणना 2003) | मेंढ्या (पशुगणना 2007) | मेंढपाळ | तालुकानिहाय मेंढ्याचे प्रमाण |
|---|---|---|---|---|---|
| 1 | मिरज | 9459 | 13304 | 230 | 6.19 |
| 2 | वाळवा | 22649 | 14635 | 256 | 7.69 |
| 3 | शिराळा | 342 | 2070 | 36 | 1.08 |
| 4 | पलूस | 942 | 751 | 20 | 0.39 |
| 5 | कडेगांव | 5350 | 5739 | 85 | 3.01 |
| 6 | तासगाव | 3127 | 5698 | 96 | 2.99 |
| 7 | जत | 77812 | 77227 | 1230 | 40.77 |
| 8 | कवठेमहांकाळ | 19991 | 17389 | 316 | 9.14 |
| 9 | आटपाडी | 64774 | 47839 | 735 | 25.16 |
| 10 | खानापूर | 3123 | 5160 | 84 | 2.71 |
| | एकूण | 207569 | 190112 | 3088 | 100 |

संदर्भ : 1) पशुगणना 2003 व 2007 2) तालुका पशुधन विकास अधिकारी यांचे अहवाल

सारणी क्र. 2 नुसार सांगली जिल्ह्यातील मेंढ्यांची संख्या 2003 च्या तुलनेत 2007 मध्ये 17457 ने (8.41%) कमी झालेली आहे. अवर्षणग्रस्त तालुक्यात 77.78 % मेंढ्यांची संख्या असून जिल्ह्याच्या पश्चिम भागात 22.22 % मेंढ्यांची संख्या आहे. यावरून मेंढीपालन व्यवसाय दुष्काळी तालुक्यात केंद्रित झाल्याचे दिसून येते.

### 1.8 **अभ्यासातील निष्कर्ष :**

मेंढपाळांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचे अभ्यासाअंती पुढील बाबी निदर्शनास येतात.

1. अभ्यास कार्यक्षेत्रातील मेंढपाळांपैकी 5.56 % मेंढपाळ २० वर्षापेक्षा कमी वयाचे आहेत. तर 7.34 % मेंढपाळांचे वय 60 वर्षापेक्षा अधिक आहे. 87.1 % 30.12 % मेंढपाळ कार्यप्रवण गटात असून (20 ते 60वयोगट) तरुण व मध्यमवयीन व्यक्तीची गरज मेंढीपालन व्यवसायासाठी अधिक आहे, हे दिसून येते.

2. मेंढपाळांच्या साक्षरतेचा विचार केल्यास 58.90 % मेंढपाळ निरक्षर व अडाणी आहेत. 30.12% मेंढपाळांना केवळ लिहिता वाचता येते. 7.6% मेंढपाळांचे शिक्षण १० वी पर्यंत झालेले आहे. तर केवळ 2.6 % उच्च माध्यमिक व 0.75% मेंढपाळांनी केवळ पदवीपर्यंत शिक्षण घेतलेले आहे. यावरुन

मेंढीपालन व्यवसायासाठी शिक्षणाची गरज नाही असा गैरसमज असल्याचे दिसून येत आहे.

3. मेंढीपालन व्यवसायात केवळ हिंदू धर्मातील मागासलेल्या व सर्वसाधारण प्रवर्गातील लोक दिसून येतात. त्यामध्ये 3.79 % एस.सी., 15.18 % एन.टी.-बी (रामोशी) एन.टी.-सी 73.29%(धनगर), ओ.बी.सी. 3.54% (माळी) व 4.17 % कुटुंबे सर्वसाधारण प्रवर्गातील असल्याचे दिसून येते. मेंढपाळ व्यवसायावर धनगर व रामोशी समाजाचा प्रभाव असल्याचे निदर्शनास येते.

4. अभ्यास क्षेत्रातील एकूण मेंढपाळ कुटुंबांच्या लोकसंख्येत पुरुष-स्त्री ( Male Femal Ratio) चे प्रमाण 100.91 असल्याचे निदर्शनास येते स्त्रियांकडे बघण्याचा दृष्टिकोन अनुकूल नसल्याचे दर्शविते. जनगणना 2001 नुसार सातारा व सांगली जिल्ह्यातील पुरुष-स्त्री प्रमाण अनुक्रमे 100:96 व 100 : 95.7 असून त्या तुलनेत मेंढपाळ समाजातील पुरुष-स्त्री प्रमाण कमी आहे.

5. सातारा व सांगली जिल्ह्यातील मेंढपाळ कुटुंबाची साक्षरता 55.68 % आहे. 34.74 % लोकांनी प्राथमिक शिक्षण घेतले आहे. 13.88 % लोकांचे माध्यमिक, 4.58 % लोकांचे उच्च माध्यमिक तर केवळ 2.45 % लोकांनी पदवीपर्यंत शिक्षण घेतले आहे. 2001 जनगणनेनुसार सातारा व सांगली जिल्ह्याची साक्षरता अनुक्रमे 78.52 % व 76.62 % असताना मेंढपाळ कुटुंबाची साक्षरता जिल्ह्याच्या साक्षरतेपेक्षा खूपच कमी असल्याचे दिसून येते. अडाणी पालक व भटकंती यामुळे मुलांच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष झालेले आहे. बहुतांश मेंढपाळांना आश्रमशाळा ही संकल्पनाच माहीत नाही. नातेवाईकांकडे मुले थांबत नाहीत त्यामुळे शाळा सोडून देण्याशिवाय पर्याय नाही, ही वस्तुस्थिती लक्षात येते.

6. बहुतांश मेंढपाळांचे मूळगावी पत्रा व मंगलौरी कौले असलेली घरे आहेत. केवळ 23.13% मेंढपाळांची घरे साध्या छपराची आहेत. चांगला निवारा हे समाधानकारक आर्थिक स्थितीचे लक्षण असले तरी केवळ 38.7% कुटुंबांनी स्वच्छतागृहे बांधली आहेत. अधिकांश मेंढपाळांनी संत गाडगे महाराज ग्रामस्वच्छता अभियानास प्रतिसाद दिलेला नाही, हे दिसून येते.

7. मेंढपाळ हे मूलत: शेतकरी आहेत. शेतीला जोडधंदा व हमखास उत्पन्नाचे साधन म्हणून मेंढपाळ व्यवसाय करतात. 52.27 % कुटुंबांकडे बागायत व जिराईत जमीन आहे. 37.8 % मेंढपाळांकडे जिराईत जमीन आहे तर 10.83 % मेंढपाळ कुटुंबे भुमिहीन आहेत. मेंढपाळाकडील धारणक्षेत्राचा विचार केल्यास 31.67 % कुटुंबाकडे 1 हेक्टरपर्यंत जमिन आहे. 25.44 % कुटुंबाचे 1 ते 2 हेक्टर धारण क्षेत्र, 19.47 % कुटुंबाचे 2 ते 5 हेक्टर धारण क्षेत्र तर 11.26 % कुटुंबाकडे 5 हेक्टरपेक्षा अधिक शेतजमीन आहे. धारण क्षेत्र कमी असल्याने बहुतांश मेंढपाळ दुसऱ्या शेतकऱ्याच्या जमिनी चाऱ्यासाठी खंडाने घेतात, हे दिसून आले. भूमिहीन कुटुंबेसुद्धा मेंढपाळ व्यवसाय करू शकतात, हे सिद्ध होते.

8. विवाहासाठी मुलाचे वय 21 वर्षे व मुलीचे वय 18 वर्षे कायद्याने निश्चित करुनही 69.23 % मेंढपाळांचे विवाह 21 वर्ष वयापूर्वी झालेले आहेत.

बालविवाह पध्दती मेंढपाळ समाजामध्ये अद्यापही दिसून येते. कमी वयातील विवाह, मुलगाच हवा हा हट्ट, महिलांना स्वयंनिर्णयाच्या अधिकाराचा अभाव यामुळे 37.70 % कुटुंबात 3 अपत्यानंतर कुटुंबनियोजन केलेले आहे, तर 45.16 % मेंढपाळांना तीन पेक्षा अधिक अपत्ये असल्याचे दिसून येते.

9. विवाहाचे वेळी हुंडा पद्धतीस 38.86 % कुटुंबांनी अनुकूलता दर्शविली आहे. तर 61.14% मेंढपाळांनी प्रतिकुल मत नोंदवले आहे. मेंढपाळांच्या विवाहाच्या वेळी मुली द्यायला पालक तयार नाहीत. ही समस्या मेंढपाळांना जाणवू लागली आहे. परिणामी मेंढ्यांचा कळप विकून अन्य व्यवसाय करावा की काय? या विचाराने काही मेंढपाळांना ग्रासले आहे.

10. नवसाला देव पावतो या समजुतीने 85.56% मेंढपाळ दरवर्षी किमान २-३ बकऱ्यांचा बळी देतात. यामध्ये धनगर व रामोशी समाज अग्रेसर आहे. बिरोबा, सतोबा, विठोबा, खंडोबा, यडोबा, मरीआई, यल्लमा इ. मेंढपाळांची श्रद्धास्थाने असल्याने 30% मेंढपाळ कुटुंबातील एक ते दोन सदस्यांच्या अंगात (देवाचे वारे) येते. खंडोबाचे जागरण बकऱ्याचा बळी देवून करतात.

11. गजीनृत्य व ओवी गायन ही मेंढपाळांची (धनगरांची) सांस्कृतिक परंपरा समजली जाते. 61.67 % मेंढपाळांनी ही परंपरा टिकवून ठेवली आहे. यात्रा, उत्सव व सण यामध्ये बहुतांश मेंढपाळ गजीनृत्य व ओवीगायनात सहभागी होतात, हे दिसून येते.

12. मेंढपाळ भूमिहीन, अल्पभूधारक व कोरडवाहू शेतीचे मालक असल्याने त्यांचे उत्पन्न अल्प आहे. त्यामुळे 26.84 % मेंढपाळ कुटुंबे दारिद्रय रेषेखालील आहेत. त्यांचे उत्पन्न अल्प आहे. त्यांचेकडे अन्य उत्पन्नाची साधने नाहीत, हे दिसून येते.

13. मेंढपाळांचे जीवन एकाकी, समाजापासून अलिप्त असल्याने प्रभावी संज्ञापन(विचारांची देवाणघेवाण) होत नाही. कारण बहुतांश मेंढपाळ कुटुंबाकडे (62.29%) रेडिओ, टी.व्ही. यासारखी साधने नाहीत, त्यामुळे त्यांना बाह्य जगाचे पुरेसे ज्ञान मिळत नाही, हे दिसून येते. मात्र 29.88 % मेंढपाळ मोबाईलचा वापर करतात, हे दिसून आले.

14. रात्रंदिवस मेंढ्यांच्या संगोपनात गुंतलेल्या मेंढपाळांना एकाकी जीवन जगावे लागत असल्याने बहुतांश (70%) मेंढपाळांना तंबाखूचे व्यसन असल्याचे निदर्शनास येते.

15. मेंढपाळांमध्ये बचत करण्याची वृत्ती कमी असून फक्त 36.70 % मेंढपाळांकडे बँकेचे पासबुक आहे. केवळ 47.59 % मेंढपाळ गावातील विविध कार्यकारी सेवा सोसायटीचे सभासद आहेत. यावरून त्यांचा सार्वजनिक जीवनातील सहभाग अत्यल्प असल्याचे दिसून येते.

16. शेतीला पूरक व्यवसाय म्हणून मेंढपाळ व्यवसाय करणाऱ्या कुटुंबांपैकी 62.29 % कुटुंबांना कोणतेही कर्ज नाही तथापि, बँकेच्या किचकट कार्यपद्धतीच्या भितीने 20 % मेंढपाळांवर सावकाराचे कर्ज आहे. सावकाराचे द.सा.द.शे. व्याजदर 36 ते 60 % असून संबंधित मेंढपाळ सावकारांच्या कर्जाच्या विळख्यात अडकलेले आहेत. 17.9% कुटुंबांनी सहकारी संस्था व बँकाकडून कर्ज घेतले आहे.

अशा प्रकारे डोंगरापलिकडचे जीवन जगणाऱ्या मेंढपाळ समाजाच्या अभ्यासातून हे विदारक सत्य उघड होते.

1.9 **उपाययोजना :**

आत्मविश्वास, जिद्द, महात्वाकांक्षा व स्वाभिमान हरवून बसलेल्या या समाजाचे आर्थिक व मानसिक पुर्नवसन होणे गरजेचे आहे. त्यासाठी खालील उपाययोजना सुचविल्या आहेत.

1. बहुतांश मेंढपाळ व्यवसायिक अशिक्षित व अल्पशिक्षित असल्याने त्यांच्यातील साक्षरतेचे प्रमाण वाढविण्याच्या दृष्टीने शासनाने वाड्यावरच्या शाळा, प्रौढशिक्षण वर्ग, मेंढपाळांचे मेळावे व उद्‌बोधन वर्ग आयोजित करावेत. दुष्काळी भागाचे सर्वेक्षण करून मेंढपाळांच्या मुलांसाठी आश्रमशाळा सुरु कराव्यात. भटकंतीच्या गावात मेंढपाळाच्या मुलांची हंगामी नावे शाळेत दाखल करून घ्यावीत, कारण बहुतांश मेंढपाळ विशिष्ट गावातच वर्षानुवर्षे स्थलांतर करतात, असे दिसून आले आहे.

2. मेंढ्यांचे 100 % लसीकरण व औषधोपरासाठी स्वतंत्र फिरते पशुवैद्यकीय दवाखाने सुरु करुन त्यांच्याकडे 60 ते 70 कळपाची जबाबदारी सोपवावी. पशुवैद्यकीय अधिकाऱ्याने त्या मेंढपाळांचे गट नेतृत्त्व (Monitoring) करून औषधोपचार, चारा व्यवस्थापन, कोकरांची निगा, विमा योजना, मेंढ्यांचा मृत्यू झाल्यास भरपाई मिळवून देण्यास मदत इ. स्वरुपाचे मार्गदर्शन करावे. कारण बहुतांश मेंढपाळ स्वत:च औषधोपचार व लसीकरण इंजेक्शन देतात, असे दिसून आले आहे.

3. तालुकानिहाय मेंढी उत्पादक संघ (Sheep Breeders Federation) स्थापन करून सभासद मेंढपाळाच्या मेंढ्याची व कोकरांची विक्री वजनावर संघामार्फत खाटिक व व्यापाऱ्यांना केल्यास मेंढपाळांची फसवणूक होणार नाही. संघामार्फत गरजू मेंढपाळांना कळपावर तारणावर कर्ज सुविधा झाल्यास सावकाराकडून होणारी पिळवणूक थांबविण्यास मदत होईल. संघाच्या माध्यमातून संघटन व मेंढपाळांशी संपर्क राहिल्याने त्यांचे प्रशिक्षण वर्ग, उद्‌बोधन वर्ग आयोजित करणे शक्य होईल. आपण एकाकी नसून संघटित आहोत या जाणिवेमुळे त्यांच्यात स्वाभिमान व आत्मविश्वास वाढण्यास मदत होईल.

4. अंधश्रद्धा निर्मुलन व व्यसनमुक्तीसाठी प्रयत्न करणाऱ्या सामाजिक व सेवाभावी संस्थांनी मेंढपाळांचे वाड्या व वस्त्यावर जाऊन मनोरंजनातून उद्‌बोधनात्मक कार्यक्रम राबविल्यास त्या समाजाचे परिवर्तन शक्य आहे.

5. आपल्या देशात गाई-म्हैशीची दूध देण्याची क्षमता वाढविण्यासाठी, वराह पालन, ससे पालन, मत्स्य व्यवसाय व शेळी पालनातील उत्पादकता वाढीसाठी नवीन प्रजाती व कृत्रिम रेतनपद्धती विकसित झाली आहे. पण मेंढीची उत्पादकता व लोकर संशोधन दुर्लक्षित राहिले आहेत. मेंढपाळांची उन्नती होण्यासाठी अधिक कोकरे देणाऱ्या मेंढ्यांच्या प्रजाती विकसीत करणे. लोकर संशोधन व प्रक्रीया उद्योग स्थापन करण्याची गरज आहे.

6. दरवर्षी भटकंती करणाऱ्या मेंढपाळांचे सर्वेक्षण करुन मेंढपाळ कुटुंबांचे ऊन, वादळ व पाऊस यापासून संरक्षण होण्यासाठी तीन वर्षातून एकदा सहज हलविता येणाऱ्या तंबू-ताडपत्रीचे शासनाने

मोफत वाटप करावे.

7. मेंढी व्यवसायास उद्योगाचा दर्जा देवून अर्थ खात्यामध्ये स्वतंत्रनिधीची तरतुद करावी, नुकसानग्रस्त मेंढपाळास भरपाई देण्याची व्यवस्था व्हावी.

**समारोप :**

नजीकच्या काळात दुर्लक्षित व्यवसायास योग्यप्रकारे दिशा, मार्गदर्शन व संरक्षण मिळाले नाही तर भविष्यात अनेक (30%) मेंढपाळ हा व्यवसाय बंद करण्याच्या मन:स्थितीत आहेत,हे या अभ्यासात दिसून आले आहे. हा मेंढपाळांचा चंगळवादी संस्कृतीस इशाराच मानावा लागेल.

**संदर्भ :**

1) डॉ. बा.तु.उपासे, मेंढीपालन कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयानगर कॉलनी, पुणे-30.

2) डॉ. नित्या घोटगे, दख्खन पठारावरील मेंढीपालन अंतरा, एन.डी.ए.रोड, बावधन, पुणे.

3) डॉ. शिवाजीराव ठोंबरे, डोंगरापल्याड, अनुबंध प्रकाशन, पुणे-43

4) शेळी मेंढी पालन पुस्तिका, पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ, पुणे

5) S.S.Kaushik, Sheep Production, Scientific Publishers, New Dehli.

6) Basic Animal HUsbandary Statitics-2006 , Govt. of India; Miniisrty Of Agriculture, Krishi Bhavan< New Dehli.

7) पशुसंवर्धन सांख्यिकीय पुस्तिका 2001 ते 2006 , पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे

8) पशुधन जणगणना 2003 व 2007 महाराष्ट्र पशुसंवर्धन विभाग, पुणे

9) सातारा व सांगली जिल्ह्यातील तालुका पशुधन विकास अधिकारी अहवाल

# पीएच.डी. प्रबंधाचा सारांश
# ब्रिटीश काळातील (1850-1947)पश्चिम भारतातील (महाराष्ट्र) उद्योजकतेचा विकास

मंजूषा मुसमाडे

**प्रस्तावना**

प्रस्तुत लेखात पुणे विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागात पीएच.डी. प्राप्त प्रबंधाचा (मूळ इंग्रजीत असलेल्या) मराठी सारांश दिला आहे.

प्रस्तुत प्रबंध आर्थिक इतिहास या अभ्यासशाखेशी निगडीत आहे. ही शाखा इतिहास व अर्थशास्त्र यांच्या सीमेवरील आहे. प्रबंधाचा मूळ हेतू ब्रिटीश काळात विकसित झालेल्या उद्योजकतेची पार्श्वभूमी व प्रक्रिया अभ्यासणे हा आहे.

**प्रकरणांची रूपरेषा :**

प्रस्तुत प्रबंधाची विभागणी पुढील प्रकारे आहे.

प्रकरण 1 : प्रस्तावना – यात अभ्यासपध्दती, उद्देश, गृहितके, अभ्यासाची व्याप्ती, अभ्यासविषयाचे समर्थन व महत्व, मर्यादा व प्रकरणांची रूपरेषा मांडलेली आहे.

प्रकरण 2 : पश्चिम महाराष्ट्राचा आर्थिक इतिहास (17,18,19 व विसाव्या शतकाचा पूर्वार्ध)

प्रकरण 3 : उद्योजकता सिद्धांत

प्रकरण 4 : ब्रिटीश काळातील (1850-1974) पश्चिम महाराष्ट्रातील निवडक उद्योगांची माहिती व विश्लेषण.

प्रकरण 5 : ब्रिटीश काळातील पश्चिम महाराष्ट्रातील उद्योजकता विकासावर प्रभाव टाकणारे घटक.

प्रकरण 6 : सारांश व निष्कर्ष

पुढील भागात संशोधन प्रबंधाचा प्रकरणानुक्रमे सारांश दिला आहे.

**प्रकरण 1 प्रस्तावना :**

**संशोधनपध्दती :**

प्रस्तुत प्रबंध उपलब्ध दुय्यम माहिती स्रोतांच्या आधारे मांडला आहे. यात आर्थिक इतिहासातील अनेक ग्रंथ, उद्योजकता सिद्धांतावरील देशी विदेशी पुस्तके, उद्योजकांची चरित्रे व आत्मचरित्रे, तसेच अनेक प्रतिष्ठित नियतकालिके व वर्तमानपत्रातील लेख, उद्योगसमूहांच्या स्मरणिका इत्यादी संदर्भांचा वापर केला आहे. अशा जवळ-जवळ 200 संदर्भांची यादी शेवटी दिलेली आहे.

**गृहितके :**

1)विशिष्ट प्रदेशातील आर्थिक विकास, विशेषत: औद्योगिक विकास या प्रदेशातील उद्योजकांच्या सकारात्मक योगदानावर अवलंबून असतो.

2) उद्योजकतेचा उगम व विकास हा सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक वातावरण, राजकीय व आर्थिक स्थैर्य अशा अनेक घटकांवर अवलंबून असतो.

**विषयाचे महत्व :**

प्रस्तुत अभ्यासाचे महत्व खालील प्रकारे सांगता येईल. आर्थिक समस्या व परिस्थितीचे ज्ञान अधिक चांगल्या प्रकारे होऊ शकते. अशा अभ्यासातून दुर्मिळ ऐतिहासिक माहिती व संदर्भ उपलब्ध होतात. तसेच पुढील अभ्यासासाठी वापर करता येतो. शिवाय असा अभ्यास आंतरविद्याशाखीय असल्यामुळे बहुआयामी ठरतो. त्यातून भावी उद्योजकांना प्रेरणा मिळू शकते.

**उद्दिष्टये :**

1)पश्चिम महाराष्ट्राच्या 1850-1947 काळातील आर्थिक इतिहासाचे प्रमुख टप्पे अभ्यासणे.

2) उद्योजकता सिद्धांताच्या विकासाचा मागोवा घेणे.

3) पश्चिम महाराष्ट्रातील उद्योजकता विकासातील तत्कालीन कारणीभूत घटकांचा अभ्यास करणे.

**मर्यादा :**

प्रबंधासाठी आवश्यक असलेली ऐतिहासिक माहिती व संदर्भ अपुऱ्या अविकसित स्वरूपात उपलब्ध असतात. शिवाय चरित्रे व्यक्तिनिष्ठ व आत्मगौरवपर असल्याने वस्तूनिष्ठ दृष्टीकोनातून त्यांचा अभ्यास करणे कठीण जाते.

**प्रकरण 2**

या प्रकरणात सुरूवातीला आर्थिक इतिहास या अभ्यास शाखेचे स्वरूप, व्याप्ती व महत्व चर्चिले आहे. त्यानंतर 17,18,19 व विसाव्या शतकाच्या पूर्वार्धातील पश्चिम महाराष्ट्राच्या आर्थिक इतिहासाचे महत्वपूर्ण पैलू सविस्तर अभ्यासले आहेत. अभ्यासाच्या सोयीसाठी प्रत्येक शतकातील महत्वपूर्ण घटनांची वर्गवारी राजकीय, सामाजिक व आर्थिक गटांत केली आहे. चर्चेच्या शेवटी सारांश तक्ता दिला आहे.

उदा. 17 वे शतक – राजकीय घटना – मराठी साम्राज्य, मुघल व मराठे यांत सतत युद्धे, सामाजीक बलुतेदारी, साथीचे रोग व युद्धामुळे अस्थिरता, अस्थिर भागातून स्थलांतरे, आर्थिक स्वयंपूर्ण खेडी, सार्वत्रिक दारिद्रय, अविकसित स्थानिक बाजारपेठा, मुंबई बंदराचा उगम इ.

प्रकरणाच्या शेवटी असा निष्कर्ष काढला आहे की, प्रस्तुत काळात औद्योगिक विकासासाठी पोषक ठरू शकेल अशी राजकीय, सामाजिक व आर्थिक परिस्थिती अभावानेच आढळली. त्यामुळे अपेक्षित औद्योगिक क्रांती घडून आली नाही.

**प्रकरण 3 :**

प्रस्तुत प्रकरणात उद्योजकता संकल्पना अनेक व्याख्या व प्रकार तसेच सिद्धांताचे विश्लेषण केले आहे. शिवाय उद्योजकता प्रशिक्षण, महाराष्ट्रीयन व भारतातील उद्योजकता, स्त्री उद्योजकता, उद्योजकतेतील अडचणी, भारतातील महत्वाच्या उद्योजक समाजाचा आढावा, भारतीय उद्योजकतेचे भविष्य इ. मुद्यांवर चर्चा केली आहे.

निष्कर्ष असा आहे की, प्रतिकूल परिस्थितीतील भारतीय उद्योजकता विकसित झाली आहे व विकसनशील देशांसमोर आपला आदर्श मांडला आहे.

**प्रकरण 4 :**

यात निवडलेल्या काळातील निवडलेल्या प्रदेशातील एकूण उपलब्ध 21 उद्योजकांपैकी शास्त्रशुद्ध पद्धतीने 10 उद्योजकांचा नमुना निवडून त्यांची सविस्तर माहिती व विश्लेषण केले आहे.

**निवडलेले उद्योजक पुढीलप्रमाणे :**

1) जमशेदजी टाटा, 2) अर्देशीर गोदरेज, 3) पैसा फंड कारखाना तळेगांव, 4) लक्ष्मणराव किर्लोस्कर, 5) वालचंद हिराचंद, 6) गणपतराव साठे, 7) सर धनाजीशा कूपर, 8) परशुराम त्र्यंबक बेडेकर (बेडेकर मसाले), 9) दिगंबर परशुराम दांडेकर (कॅम्लीन उद्योग), 10) मल्हार सदाशिव पारखे (पेप्को कागद)

वरील उद्योगांचा अभ्यास पुढील निकषांच्या आधारे केला आहे.

**1) उगम व पार्श्वभूमी :**

अ)कुटुंबवृक्ष, ब) वैयक्तिक माहिती, क) उद्योगाची प्रेरणा, ड) उद्योग स्थापनेचा काळ व ठिकाण, इ) आरंभातील प्रगती.

**2) उद्योगाचे वर्गीकरण :**

अ)कालानुक्रमे, ब) उत्पादनानुसार, क) आकारमानानुसार, ड) संरचना, इ)भांडवलाचे स्रोत, ई)यशाचा मार्ग, 5) अडचणी व अडथळे, 6) विशेष गुण, 7) सर्वसाधारण शेरा व क्रमवारी.

उद्योजकांची क्रमवारी प्रथम व द्वितीय श्रेणी गटात केली आहे. त्यासाठी उद्योगाची प्रेरणा, आरंभातील प्रगती, यशाचा मार्ग, अडचणी व अडथळे आणि विशेष गुण या निकषांच्या आधारे घेतला आहे.

त्यानुसार उद्योजक क्रमांक 1, 2, 3, 4, 5, 6 व 8 हे सात प्रथम श्रेणीत व 7, 9, व 10 हे तीन द्वितीय श्रेणीत असा निष्कर्ष काढला आहे.

**प्रकरण 5 :**

हे प्रकरण आधीच्या प्रकरणांशी समन्वय साधते. यात निवडलेल्या प्रदेशातील निवडलेल्या काळातील उद्योजकता विकासावर प्रभाव टाकणाऱ्या 21 घटकांचा सविस्तर अभ्यास केला आहे. त्यांची सामाजिक, आर्थिक, राजकीय व इतर अशी विभागणी केली आहे. सामाजिक 3, आर्थिक 10, राजकीय व इतर गटात प्रत्येकी 4 घटक मांडले आहेत. या घटकांचा उद्योजकता विकासावरील प्रभाव सकारात्मक व नकारात्मक अशा दोन प्रकारात व प्रत्येकी कमाल, किमान व मध्यम अशा श्रेणीत मांडला आहे.

निष्कर्ष असा आहे की, एकूण 21 घटकांपैकी 9 घटक कमाल सकारात्मक व 7 घटक कमाल नकारात्मक, प्रत्येकी 2 घटक मध्यम व किमान सकारात्मक तर एका घटकाचा समावेश मध्यम नकारात्मक गटात त्यांच्या उद्योजकतेवरील प्रभावानुसार दिसून येतो.

**प्रकरण 6 :**

यात संपूर्ण प्रबंधाच्या सारांशाबरोबरच गृहीतकाची सिद्धता, भविष्यातील संशोधनाची क्षेत्रे व निवडलेल्या उद्योजकांची सद्य:स्थिती असे मुद्दे चर्चिले आहेत.

**निष्कर्ष :**

स्वातंत्र्योत्तर भारताचा औद्योगिक विकास हा अनपेक्षित व अनियोजित रीतीने घडला नसून ब्रिटीश काळातील पश्चिम महाराष्ट्राती पहिल्या पिढीतील उद्योजकांच्या सकारात्मक योगदानातून विकसित झाला आहे. स्वातंत्र्यपूर्व काळातील उद्योजकता विकासाचे प्रस्तुत संशोधन हे एक वस्तुनिष्ठ व तार्किक विश्लेषण आहे.

# ग्रंथ परीक्षण
# अधिअपसामान्य अर्थशास्त्र

Super Freakonomics, Steven D. Levitt and Stepnen J. Dubner, Harper Collins Book,2009,10 East , 53rd Street, New York, 10022, ppxvii +270. Price: USA $ 18

**शि.ना.माने**

सातारा,(02162)231139.

प्रास्ताविक:

"The time has come"
The Walrus Said,
To talk of many things:
Of shoes and ships-
And sealing wax-
Of cabbages- and kings-
Why the sea is boiling hot?
And wheather pigs have wings"

**-Lewis Corroll.**

अॅडॅम स्मिथ यांच्या प्रसिद्ध उदाहरणातील डीअर व बिव्हर प्राण्यांच्या अर्थशास्त्राची जागा 'सागराचे तापमान का वाढत आहे?' (सतत वाढणारे जागतिक तापमान) आणि 'डुकरांना पंख तर फुटले नाहीत ना?, (त्यांचे पाय जमिनीवर नाहीत.) अशा लेविस कॅरोल यांच्या कवितेतील चमत्कारिक प्रश्नांनी घेतली आहे. विशेषत: लेविट व डबनर यांचे फ्रिकॉनॉमिक्स (2005), व सुपर फ्रीकॉनॉमिक्स (2009) ही पुस्तके वाचल्यानंतर असे प्रश्न मनात वारंवार गर्दी करतात.

अर्थशास्त्र एक प्रवाही शास्त्र आहे. आधुनिक अर्थशास्त्राचे स्वरुप सर्वस्त्रोत संग्रहात्मक (Eclectic) झाले आहे. म्हणजे ते धूसर व तारकापूंजासारखे (Nebulous) झाले आहे. आणि या संदर्भात गॅरी बेकर व स्टीव्हन लेविट या दोन अपसामान्य अर्थशास्त्रज्ञांचा (Freakonomists), न चुकता उल्लेख करावयाला हवा. अपसामान्य अर्थशास्त्र ठकविणे, गुन्हे, गर्भपात, भ्रष्टाचार, आदर्श पालक, नावात काय नाही? लोक प्रोत्साहनांना कसा प्रतिसाद देतात? वेश्या व्यवसाय, मद्यसेवन, आत्मघातकी दहशतवादी,

त्यांनी जीवन विमा उतरविणे बंधनकारक आहे? स्वहितैक्य-परायणता (Egoism) जनैक्य परायणता (Sociality), लोकहितवाद (Altruism) माकडे माणसेच आहेत, इत्यादी विषयांचा किंवा माहिती स्रोतांचा विचार करते.

पुढील परिच्छेदांत स्टीव्हन लेविट व स्टीफन डबनर यांच्या अधिअपसामान्य (Super Freakonomics,2009) या दुसऱ्या पुस्तकाचे परीक्षण केले आहे. अपसामान्य म्हणजे खटयाळ, मिस्किल, उपद्रवकारक, तिरकस, किंवा विक्षिप्त असूनही लेखकांच्या आर्थिक दृष्टिकोनाच्या (Economic approach) संबंधातील त्यांचे विश्लेषण व्यासंगपूर्ण असेच आहे. स्वतः लेखक 'सुपर फ्रीकॉनॉमिक्स' या सुपर शब्दाविषयी साशंक आहेत. परंतु जास्त समुचित व अर्थवत्तापूर्ण संज्ञेचा शोध लागेपर्यंत 'फ्रीकॉनॉमिक्स' या विषय शीर्षकाशी जुळवून घ्यावे, अशी आधिलेखकाची अपेक्षा आहे. जी गोष्ट 'सुपर फ्रीकॉनॉमिक्स' या इंग्रजी विषय शीर्षकाची तीच 'अपसामान्य अर्थशास्त्र' या मराठी पर्यायाची पर्याप्त दुसऱ्या शब्दात, मराठी पर्याय उपलब्ध होईपर्यंत वाचकांनी हा पर्याय चालवून घ्यावा,अशी विनंती आहे. असो.

**'इंट्रॉडक्शन'** : आणखी एक खुलासा. पुस्तकाच्या इंट्रॉडक्शनमध्ये स्पष्ट केले आहे की अर्थशास्त्र ही एक गोष्ट आहे. आणि 'आर्थिक दृष्टिकोन' (Economic approach) ही वेगळी गोष्ट आहे. फ्रीकॉनॉमिक्स या प्रथम चलनात आणण्याचे श्रेय गॅरी बेकर यांना दिले जाते. बेकर यांनी अर्थशास्त्र व आर्थिक दृष्टिकोन यांच्यातील फरक स्पष्ट केला आहे. लेविट व डबनर यांनी बेकर यांच्या अर्थिक दृष्टिकोनाला आपली पसंती दिली. काय आहे तो आर्थिक दृष्टिकोन? बेकर म्हणतात व लेविट व डबनर उधृत करतात '.........स्वार्थ किंवा लाभ यांमुळे व्यक्ती संपूर्णपणे कार्य प्रेरीत होते, हे गृहीत त्या आर्थिक दृष्टीकोनाला मान्य नाही. तो अर्थिक दृष्टीकोन ही एक विश्लेषण पध्दती आहे. विशिष्ट कार्यप्रेरणेविषयी ते गृहीत नव्हे.....''मनुष्याचे, वर्तन जास्त श्रीमान अशा मूल्यसंचाकडून (Much richer set of values) व अधिपसंत्यांकडून (Preferences) चलित होते.''(पृ.12) दुसऱ्या शब्दात मनुष्याचे वर्तन लाभ-नुकसान यांच्यामुळे प्रेरीत होत नाही. ते मनुष्याचे श्रध्दास्थान असलेल्या अत्युच्च पातळीवरील मूल्य विधानचलित असते. लेखकांचा असा दावा आहे की, त्यांच्या आर्थिक दृष्टिकोनाच्या प्रांतात भाकीत किंवा भविष्यकथनाला (Prediction) स्थान नाही. कोणी विश्वास ठेवो अथवा न ठेवो, प्रोत्साहनाला (Incentive) प्रतिसाद देणे, हा मनुष्याचा वर्तनाचा धर्म आहे. त्या वास्तवदर्शी वर्तनाचे आकलन हा पुस्तकाचा प्रधान हेतू आहे. लेखक पुढे म्हणतात की, त्यांचे निष्कर्ष उपयुक्त व निर्णायक असतीलच असे नाही. परंतु त्यांच्याविषयी अधिकार संवाद वाद-प्रतिसाद सुरु होण्यावर ते समाधानी आहेत. मग उपरिनिर्दिष्ट गोष्टींविषयीचा (लाच घेणे, ठकविणे, प्रदूषणात भर टाकणे, आत्महत्या) अपराध करणे, सामाजिक उन्माद निर्माण करणे इत्यादी , तो संवाद अभिमत अर्थशास्त्राशी संबंधित असो किंवा नसो. त्याविषयी लेखकांना काळजी करण्याचे कारण नाही (पृ.17)

प्रकरण 1: लेखक व शिकागोमधील 24 वर्षीय लाशीना (Lasheena) उर्फ अॅली (Allie) यांच्यातील संवादाच्या अनुषंगाने लेखकांनी त्याची निरीक्षणे नोंदविली. त्यानंतर लेखकांनी अमेरिकेतील वेश्या व्यवसायाच्या संदर्भातील काही अभ्यासांचा

व अहवालांचा मागोवा घेतला. या सर्वांचा एकत्रित परिणाम म्हणजे 'हॉउ इज अ स्ट्रीट प्रॉस्टियूट लाईक अ डिपार्टमेंटल सान्टा? या शीर्षकाचे ॲली या वेश्येचे लेखकांनी चित्रित केलेले रुपडे (Profile). खरे तर, या प्रकरणाला वेश्येच्या जीवनावरील एक व्यष्टी अभ्यास म्हणणे जास्त योग्य होईल.

21 वर्षीय ॲलीच्या व्यवसायाविषयी लेखकांनी नोंदलेल्या पुढील काही ठळक निरीक्षणांचा येथे एकत्रित उल्लेख करु.(1) ॲली 21 वर्षीय वेश्या आहे. (2) ती व्यवसायसुलभ भेदभावाने (Discrimination) त्रस्त आहे.(3) शिवाय, एक स्त्री म्हणून तिला बरीच किंमत मोजावी लागते.(4) वेश्या व्यवसाय सांभाळून ती दुसरी वेतनी कामे देखील करते. (5) पुरुष कर्मचाऱ्याच्या तुलनेत तिचे वेतन 30 ते 50 टक्के अल्प आहे. (6) या उत्पन्नात तिला हाता-तोंडाची गाठ घालणे कठीण होते. (7) म्हणून आठवडयाचे 25 डॉलर देणारे गिऱ्हाईक भेटले तर शरीरविक्रय करण्यास स्वखुषीने तयार होते. (8) अशा प्रकारे, श्रम बाजाराचा एक भाग गणलेल्या वेश्या व्यवसायाचा एक घटक म्हणून ती जीवन जगते. (9) या श्रम बाजाराला वेश्या व्यवसायाला लेखक 'श्वेत गुलामगिरी' (White Slavery) असे संबोधतात.(10) वेश्या व्यवसाय बाजाराला अर्थशास्त्राच्या मागणी-पुरवठयाच्या मूलभूत नियमात बसविताना लेखक म्हणतात त्याप्रमाणे पत्नीकडूनच्या तथाकथित 'मोफत' विषयसुखाने पूर्ण समाधान न पावलेल्या पुरुषांकडून वेश्येविषयी मागणी निर्माण होते. आणि आपणास माहीत आहे की बेन्हॅम यांच्या शैलीत स्पष्ट करतात त्याप्रमाणे 'मागणी नेहमी किंमतीत अभिव्यक्त होते.' म्हणजे जो ग्राहक जास्त किंमत देतो त्याला त्या वस्तुचा उपभोग घेण्याचा असतो. दुसऱ्या शब्दात, लेखक वेश्या व्यवसायाकडे अर्थशास्त्रातील मागणी-पुरवठयाच्या शुद्ध व सोवळया परिप्रेक्ष्यातून (Perspective) पाहातात. विविध वस्तू भांडार व वेश्या व्यवसाय यांच्यात बऱ्याच बाबतीत सारखेपणा असतो.

आज अमेरिकेत तो व्यवसाय कायद्याने दंडनीय अपराध आहे. परंतु प्रत्यक्षात तो नष्ट झाला नाही. त्याविषयी आपले मत नोंदताना लेखक म्हणतात त्याप्रमाणे विधिमंडळाच्या कायद्यापेक्षा मागणी-पुरवठयाचा कायदा (नियम) जास्त 'बलवत्तर' (Powerful) असतो (पृ.25) आणि लेखकांचे हे विधान एक तथ्य म्हणून स्वीकारावयाला हवे. येथे मानवरुप विकास अहवालातील (HDR, 1992) तथ्य सांगणाऱ्या पुढील विधानाचा उल्लेख करणाचा मोह अनावर होतो: ''सरकार केवळ कायदा करुन लोकाना चांगले आरोग्य देवू शकत नाही'' (Government can not legistate good health) सरकारच्या सत्तेवरील ही एक मर्यादा आहे. आणि या मर्यादेचे भान ठेवून कायदे करणे श्रेयस्कर असते. हा एक या प्रकरणापासून घेण्यायोग्य बोध आहे.

मागणी-पुरवठयाच्या बलवत्तर नियमाला पुरवणी जोडताना लेखक आणखी दोन पाऊले पुढे जातात. ते म्हणतात की, वेश्या व्यवसाय जर खरोखरच कायद्याने नष्ट झाला. तर त्या व्यवसायात 'काळा बाजार' (अवैध वेश्या व्यवसाय) निर्माण झाल्याशिवाय राहणार नाही. त्याचे स्पष्टीकरण देताना लेखक म्हणतात की वेश्या व्यवसाय जर कायद्याने नष्ट झाला' तर असंतुष्ट लोक वाढीव किंमत मोजण्यास तयार होतील, आणि वाढीव किंमतीचा फायदा घेण्यासाठी काही वेश्या व ठेकेदार गुप्तपणे व्यवहार करतीलच.

वेश्या व्यवसायाला चिरेबंद आर्थिक परिप्रेक्ष्य लागू करण्याचे लेखकांचे दुर्मिळ कौशल्य पुढेच आहे. गर्भविरोधक साधनांशिवाय लिंगविक्रय करण्यास वेश्या सहसा परवानगी देत नाहीत. परंतु एका समागमासाठी 10 लक्ष डॉलर देणारा ग्राहक भेटला, तर वेश्येला नकार देणे कठीण होते. तिच्यापुढे 'कैद्यांची शृंगापत्ती' (Prisoners dilemma) निर्माण होते. आणि तिने होकार दिलाच तर तिला 'प्रतिकूल निवडीचे' (Adverse selection) धोके सहन करावे लागतात. दुसऱ्या बाजूने सर्वसाधारणपणे लिंगविक्रयाची ती ज्यावेळी किंमत वाढविते त्यावेळी तिच्या शरीरसंबंधात घट होते. हा झाला मागणी -पुरवठ्याचा सर्वसाधारण नियम परंतु अपवादात्मक परिस्थितीत वाढीव किंमत देवूनही ग्राहक तयार होतात, त्यावेळी ॲलीपुढे अर्थशास्त्रातील किंमत असंवेदनशील "(Price insensitive)" ग्राहकांचा (अनम्य मागणीचा) मागणीचा प्रश्न निर्माण होतो (पृ.54).

अशा प्रकारे, यशस्वी उद्योगिनीप्रमाणे ''ॲलीने तिच्या प्रांतात पारंगतता प्राप्त केली होती. धूर्त उपक्रमी प्रमाणे तिने तिचा उपरिखर्च अल्प पातळीवर ठेवला, गुणवत्ता नियंत्रणाचे पालन केले, किंमत विभेदन कसे करावयाचे त्या विद्येचे शिक्षण घेतले आणि पुरवठा व मागणी या बाजार शक्तींचे चांगले ज्ञान मिळविले (पृ.55).

शिकागोच्या रस्त्याच्या कोपऱ्यात थाटलेला ॲली नावाच्या स्त्रीचा व्यवसाय व नाताळ सणानिमित्त विक्री करणाऱ्या सान्ताचे विविध वस्तू भांडार यांच्यात तुलना करण्याचे लेखकद्वयांचे कष्ट व कौशल्य अतुलनीय आहेत.

**प्रकरण२: व्हाय शुड सुइसाईड बांबर्स बाय लाईफ इन्शुरन्स?** या शीर्षकावरुन स्पष्ट होते की हे प्रकरण दहशतवादविषयी आहे. काही माता-पित्यांच्या पोटी गांधी जन्माला येतात. तर काहींच्या पोटी सद्दाम हुसेन.

प्रस्तुत प्रकरणात रमजान महिन्यातील जन्म, मिचिगनमधील मुस्लिम लोकसंख्या प्रमाण, ज्योतिर्विद्या, व्यक्ति जन्मतः दहशतवादी जन्मते किंवा ती दहशतवादी बनते? इत्यादी प्रश्नांचा विचार करण्यात आला आहे. आपण परीक्षणाच्या सोयीसाठी दहशतवादाची व्याख्या, दहशतवाद्यांचे हेतू, दहशतवादाचे स्वरुप आणि दहशतवाद्यांची ओळख पटविण्याचा सर्वोत्तम मार्ग या महत्त्वाच्या चर्चेवर लक्ष केंद्रित करणार आहोत.

चर्चेची सुरुवात लेखकांनी पुनःपुन्हा संदर्भ दिलेल्या ॲलन क्युगर (Krueger), यांच्या 129 मृत शहिदांच्या (दहशतवाद्यांच्या, चरित्र लेखना पासून करु. क्युगर यांच्या अभ्यासात अशी ग्वाही देण्यात आली आहे की, अधिकतर दहशतवादी सधन-मध्यमवर्गीय, विद्याविभूषित व उंची उत्पन्न कुटूंबांतून आले आहेत. क्रुगर यांनी दहशतवादाच्या 150 पेक्षा जास्त अभ्यासपूर्ण व्याख्यांचा उल्लेख केला आहे. म्हणजे एक-दोन व्याख्यात दहशतवादाची गुणवैशिष्ट्ये सांगता येत नाहीत. क्रुगर पुढे म्हणतात की सन 2002 मध्ये 50 इस्लामी देशांच्या परराष्ट्र मंत्र्यांची परिषद आयोजित करण्यात आली. परिषदेत सर्व परराष्ट्र मंत्र्यांनी एकमताने दहशतवादाची निर्भत्सना केली खरी. परंतु त्यांनी ज्याची निर्भत्सना केली त्याच्या व्याख्येविषयी त्यांचे क्वचितच एकमत झाले (पृ.63-64) काय आहे या दहशतवादाचे स्वरुप?काय आहे त्याचा हेतु?

गरिबी हे दहशतवादाचे मूळ आहे, हा सर्वसाधारण युक्तिवाद संपूर्णपणे मान्य करता येत नाही.दहशतवादी चारु मुजुमदारांच्या प्रमाणे

क्रांतीकारक नाहीत. क्रांतीकारकांप्रमाणे त्यांना सरकार बदलावयाचे नसते. देशात निरपराध्यांचे निर्दालन हा दहशतवादाचा प्रमुख हेतू नसतो., देशात समाजात घबराट निर्माण करणे व तेथील बहुसांस्कृतिक संस्थांचे खच्चीकरण हे दहशतवादाचे हेतू आहेत.

दहशतवाद त्याच्या नावानुसार समाजात दहशत निर्माण करतो. परिणामी तो सरकार व नागरिक यांच्यावर परिव्यय लादतो. परिव्ययाचे प्रमुख दोन प्रकार दिसतात. एक प्रत्यक्ष व दुसरा अप्रत्यक्ष. अमेरिकेने इराकमध्ये लाखो सैनिक तैनात केले (2003-10). अफगाणिस्तानमध्येही अमेरिकेच्या फौजा तळ ठोकून आहेत. सप्टेंबर 11 च्या हल्ल्यात किमान 3000 व्यक्ति मारल्या गेल्या तसेच जवळ-जवळ 300 बि. डॉलर इतके आर्थिक नुकसान झाले.अप्रत्यक्ष खर्चाचे ठळक उदाहरण म्हणून भविष्यातील अपघाती मृत्युच्या भीतीचा उल्लेख करण्यात आला आहे. भितीने विमानाऐवजी गाडीतून प्रवास करणाऱ्या नागरिकांची संख्या वाढली. रस्त्यावरील अपघातांचे प्रमाण वाढले. विमानतळावर प्रत्येक प्रवाशाची तपासणी करण्यासाठी त्याच्यावर त्याचे बूट काढण्याचे बंधन आले. त्यामुळे प्रामाणिक प्रवाशांना त्यांचा वेळ व त्यांचे स्वातंत्र्य यांच्या स्वरुपात किंमत मोजावी लागली. येथे ॲडॅम स्मिथ यांच्या 'दि वेल्थ...' मधील पुढील प्रसिद्ध विधानाची आठवण झाल्याशिवाय राहात नाही.''राष्ट्राच्या समृद्धिपेक्षा त्याची सुरक्षा जास्त महत्त्वाची असते.'' (Security of a nation is more important than its opulence)

जी गोष्ट अमेरिकेची तीच कमी-अधिक फरकाने भारताची. अमेरिकेच्या तुलनेत भारताने जास्त दहशतवादी हल्ले सहन केले आहेत. त्या हल्ल्यांना तोंड देण्यासाठी व त्यांचा बंदोबस्त करण्यासाठी भारतात प्रथमच सुरक्षा व्यवस्थेचे पुनर्संघटन व अद्यावतीकरणासाठी मोठया प्रमाणावर खर्च करणे अटळ आहे. 2010 च्या अर्थसंकल्पात संरक्षण खर्चात करण्यात आलेली वाढ हा त्याचा पुरावा आहे.

अशा दहशतवाद्यांची ओळख पटविण्यासाठी व त्यांचा बंदोबस्त करण्यासाठी सर्वोत्तम उपाय कोणता आहे? या क्षेत्रातील संबंधित अभ्यास व अहवाल यांचा संदर्भ देवून लेखकांनी या प्रश्नाची सखोल चर्चा केली आहे. येथे आपण प्रचलित व पारंपरिक पुढील तीन दहशतवादीविरोधी उपायांवर लक्ष केंद्रित करु. (अ) मानवरुप गुप्तवार्ता (ब)मुक्त ऋण विद्‌युदणुशास्त्र (Electronics) आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील दहशतवादाच्या वित्त पुरवठयाचे स्रोत (पृ.88).

(अ) मानवरुप गुप्तवार्ता संघटन उपयुक्त असले तरी त्यावर काही मर्यादा पडतात. फ्रॉइड म्हणाले त्याप्रमाणे मनुष्य पूर्वीप्रमाणे आजही चुका किंवा अपराध करतो (सहेतुकपणे अगर निर्हेतुकपणे) म्हणून गुप्तवार्ता संघटनाच्या संदर्भात लेखक 'अवघड' व 'धोक्याची' असे शब्द वापरतात.

(ब) मुक्त ऋणविद्‌युदाण्विक माध्यमाची निगराणी ही जोखीम झाली आहे. माहिती तंत्रविद्येच्या युगात प्रत्येक चार-सहा वर्षांत ज्ञानात दुपटीने भर पडत आहे. त्या काळात तेवढे ज्ञान संपादणे व ते कालबाहय होण्यापूर्वी त्याचा पूर्ण वापर करणे, हे आव्हान आहे. ज्ञानाचा प्रस्फोट तो हाच ज्ञानदेवांचा सागर व टिटवी दृष्टांत प्रसिद्ध आहे. लेखकांच्या शब्दात या माध्यमाद्वारे माहिती संपादन करणे, म्हणजे तलावातून लवचिक नळीने तोंडात

पाण्याचे घोट घेणे होय (पृ.88) येथे एका गोष्टीकडे वाचकांचे लक्ष वेधणे आवश्यक वाटते. सुरुवातीला उल्लेख केलेल्या लेखकांच्या 2005 मधील फ्रीकॉनॉमिक्स पुस्तकांत 'संगणित्रचलित प्रश्न अन्वेषण पद्धती' (Algorithm) चा वापर केला होता. संदर्भ होता. 'कर बुडविणे' 'भ्रष्टाचार' व 'दहशतवाद्यांना पकडणे' यांचा 2009 मधील त्यांचा 'सुपर फ्रीकॉनॉमिक्स' पुस्तकात देखील लेखकांनी त्या संज्ञेचा पुनरुच्चार केला आहे. परंतु , त्या संज्ञेच्या उपयोगाविषयी एक सूक्ष्म फरक जाणवतो. विशेषत: दहशतवाद्यांना पकडण्याविषयी लेखक त्यांच्या 2005 मधील पुस्तकात या संज्ञेविषयी बरेच आशावादी वाटले. परंतु त्यांच्या 2009 मधील पुस्तकात त्यांचा त्या संज्ञेविषयांचा आशावाद काहीसा ओसरल्यासारखा दिसतो ते कसे, त्याचे जास्त स्पष्टीकरण पुढील तिसऱ्या उपायाच्या उपयुक्ततेच्या चर्चेत करण्यात आले आहे.

(क) आंतरराष्ट्रीय पातळीवरील दहशतवाद्यांच्या वित्त पुरवठा शोधासाठी देखील वरील (ब) मधील पध्दतीचा उपयोग केला जातो. लेखकांच्या एका अंदाजानुसार जगातील बँकांत दिवसागणिक अब्जावधि डॉलरची उलाढाल होते. या संदर्भात बँकां कार्यभाग महत्त्वाचा असतो. अनेक बॅकांशी संबंधित दहशतवाद्यांचा माग सुराग शोधणे हे कठीण व नाजूक काम आहे. हॉर्स्ले (Horsley). नावाच्या एका बँक अधिकाऱ्याच्या संशोधनाचा हवाला देवून लेखकांनी काही मर्यादा स्पष्ट केल्या आहेत. त्यांचा गोषवारा पुढे दिला आहे. हॉर्स्ले यांच्या बँकेचे दहा लक्षाच्या आसपास ग्राहक आहेत. त्यांच्या तुलनेत त्या बॅकेशी संबंधित संभवनीय 10-20 दहशतवाद्यांची संख्या अगदीच नगण्य आहे. आणि ते तथाकथित दहशतवादी संशयित दहशतवादी आहेत. हॉर्स्ले यांची व लेखकांनी उल्लेख केलेली सांख्यिकी पुढे दिली आहेः

सांख्यिकी आधार (Database):10,00000

जास्तीतजास्त संशयित (Highly Suspicious) : 30

जवळजवळ निश्चितपणे दहशतवादी क्रियेत सहभागी : 5

**निष्कर्ष :–** 30 पैकी 5 ही संख्या संगणित्रचलित प्रश्न अन्वेषण पध्दतीची पूर्ण विश्वसनीय संख्या म्हणता येत नाही (पृ.15. म्हणजे 5 या संख्येत एकही निर्दोष व्यक्ती नाही, याची खात्री देता येत नाही.

या सांख्यिकी निष्कर्षाला शब्दरूप देताना लेखक म्हणतातः दहशतवाद्यांच्या बँकांच्यामार्फत होणाऱ्या वित्त पुरवठयाचा माग-मसाला शोधणे हे "विशिष्ट अशा वाळुच्या कणांसाठी सागराच्या संपूर्ण खाडीचा तपास करण्याचा प्रयत्न करण्यासारखे आहे." (पृ.88 हीच गोष्ट न्यायशाच्या पुढील तत्त्वात स्पष्ट केली जाते, शंभर अपराधी निर्दोष मुक्त झाले, तरी एका निर्दोष व्यक्तीला शिक्षा होता कामा नये. थोडक्यात, वरील तीन उपायांत काही गंभीर त्रुटी आहेत. त्यांचे संपूर्णपणे निवारण करणे कठीण आहे. तोपर्यंत प्रकरणाच्या शीर्षकात सूचित जीवन विमापत्राची आत्मघातकी दहशतवाद्यांनी खरेदी करण्यास काय हरकत आहे? हा प्रश्न निर्माण करुन लेखकांनी हे प्रकरण अर्धवट अवस्थेत तर सोडून दिले नाही ना? अर्धवट अवस्था शब्दप्रयोग करण्याचा एक हेतू आहे. तो असा की जीवन विमा संज्ञा येथे कशी समर्थनीय आहे, याचे अल्पसे स्पष्टीकरण लेखकांकडून अपेक्षित होते व आहे. अशा परिस्थितीत लेखकांकडून अपूर्ण प्रकरणाला

पुढील पुरवणी जोडण्याचे 'अव्यापारेषु व्यापार' काम करुन पुढील तिसऱ्या प्रकरणाकडे वळू.

**अपूर्ण माहिती:** आपण जाणतो की पूर्ण स्पर्धा वस्तूतः पूर्णपणे अपूर्ण असते. आपण जाणतो की अर्थशास्त्रातील 'असममिती परिकल्पना' (Assymetry hypothesis) हा तिचा पुरावा आहे. ग्राहकापेक्षा विक्रेत्याची माहिती जास्त असते. पूर्ण नव्हे. आजपासून बरोबर दहा वर्षानंतर मेळघाटमध्ये एक किलो नागलीची निश्चित किंमत किती असेल ते नोबेलप्राप्त अर्थशास्त्रज्ञालाही सांगता येत नाही. पूर्ण माहितीच्या अभावामुळे अर्थव्यस्थेत व व्यवसायात अनिश्चितता, अस्थिरता व जोखीम निर्माण होतात. विमा किंवा विमाशास्त्र उत्पाद संकल्प (Product design) उत्पाद विपणी, किंमतविषयक धोरण जोखीम व्यवस्थापन व माहिती तंत्रविद्या यांचा विचार करते. ते अर्थव्यवस्था व व्यवसाय यांचे जाखिमेपासून रक्षण करते. त्यांना स्थैर्य देण्याचा प्रयत्न करते. थोडक्यात, ते अपूर्ण स्पर्धेतील जोखीम कमी करते. आणि पर्यायाने अपूर्ण स्पर्धेतील साधनसंपत्तीच्या गैरविल्हेवारीचे (Misallocation of resources) निवारण करते. जीवन विम्यात जरुर काही त्रुटी असतील त्याबरोबरच तो गरीब व निराधार महिलेच्या पतीच्या अपघाती निधनामुळे तिच्या ढासळणाऱ्या संसाराचा आधारही आहे.

लेखकांनी पाठयपुस्तकातील हे फायदे गृहीत धरुन तर दहशतवाद्यांच्या बाबतीत जीवन विम्याचे समर्थन केले नसेल ना? या संदिग्धतेचे निराकरण करण्यासाठी लेखकांचे प्रोत्साहन प्रतिसाद प्रभावित मानवी वर्तनाविषयी भाष्य महत्त्वाचे ठरावे. विशेषत दहशतवाद्यांची पाठीमागे उल्लेख केलेली गुणवैशिष्ट्ये विचारात घेता, ते जीवन विम्याला कोणत्या प्रतिसाद देतील, या प्रश्नाचे नेमके उत्तर देता येत नाही. कदाचित पाखंडी (Sceptic) दहशतवाद्यांच्या बाबतीत जीवन विम्याचे प्रोत्साहन (Incentive) परावर्तक (Disncentive) होण्याची शक्यताच जास्त असणार ही चर्चा येथे थांबवून प्रकरण 3 'अनबिलिव्हेल स्टोरीज अबॉउट ॲपथी ॲंड अल्टुइझम' चा विचार करु.

प्रकरण 3: न्युयॉर्क शहर साल 1954 28 वर्षीय महिला. किटी जिनोवीस (kitty genovese) तिचे नाव. कामावरुन घरी परतताना. घराजवळ पोहोचते. गाडीतून बाहेर पडते. गाडी कुलूपबंद करते. इतक्यात एक माथेफिरु तिचा पाठलाग करतो. तिला मागून पाठीत भोसकतो. हल्लेखोराचे नाव विन्स्टन मॉसले (Winston Moseley). विव्हल झालेल्या किटीवर परत बलात्कारी हल्ला होतो. तो दुसरा वार करतो. अंधारात पळून जातो. किटीचा निर्घृण खून होतो. किटीच्या सदनिकेतील शेजारी हे सर्व तटस्थपणे पाहत होते. कोणी तिला वाचवू शकले नाही. संपूर्ण न्युयॉर्क शहरात मनुष्याच्या पाशवी वर्तनाचा संदेश घराघरात गेला. या घटनेविषयीचा पुस्तकाच्या लेखकांकडून पुढील प्रश्नार्थक आविष्कार आला: एरवी परार्थवादी (Altruist) दिसणारा मनुष्य इतका तटस्थ, उदासीन व स्वार्थैक्यपरायण (Egoistic) कसा? हा प्रश्न जरुर अर्थशास्त्राच्या परिघाबाहेरचा असेलही. तरलतेचा ऱ्हास, तेलाच्या किंमती व राजकोषीय तुटीचे संकट अशा प्रश्नांवर अर्थशास्त्रज्ञांनी जरुर विचार करावा- परंतु लोकहितवादाचे काय? त्याचे त्यांना काहीच घेणे-देणे नाही काय? (पृ.105).

प्रकरणाची सुरुवात किटीच्या खुनाने होते. त्यातून स्वहितवाद विरुद्ध परार्थवाद असा टोकांचा संघर्ष निर्माण होतो. या पार्श्वभूमीवर प्रायोगिक

अर्थशास्त्राचा उदय झाला. लोक निसर्गतः जन्मतः परार्थवादी असतात. प्रायोगिक अर्थशास्त्राचा हा प्रयोगसिद्ध निष्कर्ष ही स्वहितैक्यपरायण पुरुषाची (Homoeconomicus/egoistic) मृत्युघंटा मानली गेली. परंतु प्रयोग सिद्ध अर्थशास्त्र क्वचितच लोकसिद्ध असते. वास्तवात लोक चांगले नाहीत अथवा वाईट नाहीत. ते प्रोत्साहनांना प्रतिसाद देणारे लोक आहेत. या नवीन रूपालोकाचा (Paradigm)उदय झाला अशा प्रकारे तयार होणाऱ्या त्रिकोणात या प्रकरणातील चर्चा फिरत राहाते.

या रूपालोकाला योगदान देणाऱ्या अर्थशास्त्रज्ञात गॅरी बेकर व जॉन लिस्ट यांचा आवर्जून उल्लेख करावयाला हवा. 'कैद्यांची शृंगापत्ति' (Prisoners,dilemma)या संज्ञेचा अर्थशास्त्रज्ञांनी वारंवार आधार घेतला आहे. स्वहितवादावरील मर्यादा व सामूहिक किंवा सहकारी करारासाठी परार्थवादाचे समर्थन हा या संज्ञेचा निष्कर्ष आहे. येथे निष्कर्षाच्या प्राचिनतेकडे मला वाचकांचे लक्ष वेधावयाचे आहे. ॲडम स्मिथ यांच्या दि वेल्थ (1776) पासून स्वहित विरूध्द लोकहित हा वाद सुरु झाला असा एक समज रूढ झाला आहे. वस्तुतः तो चूक आहे. 1776 पूर्वी स्मिथ यांच्याच दि थिअरी ऑफ मॉरल सेंटिमेंट्स (1759) या पुस्तकातील प्रसिध्द परिच्छेदात तथाकथित स्वार्थी मनुष्याचे 'सुख' (Happiness) व दुसऱ्यांचे 'भाग्य' (Fortune) यांना परस्परात घट्टपणे गुंतवून ठेवणारी तत्त्वे या वादाचे प्रतिबिंब पडले. प्रतिबिंब हा शब्द हेतुतः वापरला आहे. कारण या वादाचे मूळ 1759 पूर्वी हजारो वर्षांपूर्वी 'दि ओल्ड टेस्टामेंट दि ख्रिश्चन बायबल' मधील गोष्टीत सापडते. दोन भाऊ. मोठा केन (Cain) व धाकटा अबेल (Abel) निर्वाहासाठी भौतिक साधनसंपत्तीविषयी दोघात संघर्ष त्यातून केनने अबेलचा खून केला. खूनापूर्वी ईश्वराने वडिलोपर्जित मिळकतीची धूर्तपणे दोघांत वाटणी केली. एकाला संपूर्ण जमीन तर दुसऱ्याला संपूर्ण पशुधन.जमिनीशिवाय पशुधन जगू शकत नाही. आणि पशुधनाशिवाय जमीन पिकू शकत नाही. दोघात संघर्ष पेटला. त्यातून अबेलचा खून झाला. 'बोध' वाटणीनंतरही त्यानी सहजीवन जगावे. पण लक्षात कोण घेतो? त्यानंतर सॉक्रेटीस व प्लेटो यांच्या लिखाणात या वादाचा उल्लेख झाला तो असा बहिर्गत सक्तीशिवाय मनुष्य जन्मतः चांगला असतो. थोडक्यात, स्वहिताने ध्यानी-मनी नसताना लोकहित आपोआप साधते. या संदर्भात पुढे स्मिथ यानी 'निरुद्देशित परिणाम' (Unintended consequences) हा शब्दप्रयोग करून सॉक्रेटीस यांच्या पक्षाला आपला पाठिंबा दिला. उलट, प्लेटो यांच्या रिपब्लिकमध्ये त्यांचा अनुयायी ग्लॉडकॉन (Glaucon) याने स्वहितवादाच्या विरूद्ध व लोकहितवादाच्या बाजूने आपले मत दिले. असो.

आता एका गैरसमजाच्या स्पष्टीकरणानंतर परीक्षणातील पुस्तकाकडे परत येवू तेव्हा ओल्डुटेस्टामेट-सॉक्रेटीस - स्मिथ - बेकर व अंशतः जॉन लिस्ट यांचा स्वहितवादी मनुष्य (Homoeconomicus) नामशेष केल्याचा वर्तनवादी/प्रयोगशील अर्थशास्त्रज्ञांचा (त्यांच्यात काही नोबेल विजेते आहेत) दावा, जसा आहे तसा, स्वीकारता येत नाही. ते कसे? या प्रश्नाचे स्वतः जॉन लिस्ट यानी दिलेले व परीक्षणातील पुस्तकाच्या लेखकांनी स्वतः उचलून धरलेले स्पष्टीकरण थोडक्यात वर उल्लेख केल्याप्रमाणे खुद लिस्ट हे एक प्रयोगशील अर्थशास्त्रज्ञ होते ही गोष्ट ध्यानात घेऊन त्यांच्या स्पष्टीकरणाकडे वळू. प्रयोगशील

अर्थशास्त्रज्ञांच्या प्रयोगाचे एक गृहीत होते.ते म्हणजे अभिमत अर्थशास्त्रातील स्वहितवादी मनुष्य लोकहितवादाच्या विरोधात होता. येथेच स्वहितवादी मनुष्याचे खच्चीकरण झाले. दुसरी गोष्ट अशी की त्यांच्या प्रयोगशाळेतील निष्कर्षांवर दोन मर्यादा पडतात. एक 'निवडीचा पक्षपातीपणा, पूर्वगृह (Selection bias), म्हणजे प्रयोगासाठी निवडलेले काही संशोधक विद्यापीठाचा दुसऱ्या वर्षाचा पाठयक्रम अभ्यासणारे विद्यार्थी होते. (वस्तूनिष्ठ निष्कर्षासाठी प्रयोगशाळेतील संशोधकांसाठी शिक्षण व पात्रता चाचणी यांची किमान पातळी वाढविणे जरूर आहे, दोन, छननी (Scrutiny) प्रयोगशाळेत एक प्रयोग पूर्ण करून दुसरा हाती घेण्यापूर्वी संशोधकांनी आपले हात धुवून स्वच्छ करणे जरूर आहे. हेतु हा की जंतु संसर्गाची दुसऱ्या प्रयोगाच्या परिणामाला बाधा होवू नये. बरेच प्रयोगार्थी वरिष्ठांना खूष ठेवण्यासाठी फक्त त्यांच्या उपस्थितीत स्वतःचे हात स्वच्छ करतात (पृ.120.21). या तथाकथित प्रयोगांविषयी लेखकांचा प्रकरणाच्या शीर्षकातील 'अनबिलिव्हेबल स्टोरीज' हा शब्दप्रयोग यथार्थ आहे.

प्रकरण 4: 'दि फिक्सइज इन–अँड इट इज चीप अँड सिंपल' हे या प्रकरणाचे विषय शीर्षक आहे. या प्रकरणात लेखकांनी विविध विद्याशाखांना स्पर्श केला आहे. सजीव पेशींचा अभ्यास, औषधनिर्मिती, रोग प्रतिबंधक लसीचे उत्पादन, रोगनिदान, प्राण्यांचे प्रजनन, कृषी क्षेत्रात नवीन बियाणांची निर्मिती, सुखकर मानवी जीवन, इत्यादी बदलांचा धावता आढावा घेण्यात आला आहे.

मानवी बुद्धी सर्जनशील व शोधसंपन्न आहे. तंत्रविद्या म्हणजे कमी कष्ट व परिव्ययातून जास्त फल. उदाहरणार्थ मोबाइल फोन व मोबाइल मनी सुलभ व साधी शोधसाधने महत्त्वाचा कार्यभाग पार पाडतात. आपले पूर्वज तिमीरात चाचपडत होते. नंतरच्या पिढ्यांना तेजाचा मार्ग उपलब्ध झाला. तसे आपण भाग्यवान आहोत. परंतु या शोधांची, बदलांची दुसरी एक बाजू आहे. लेखक आशावादी आहेत. तेजाचा मार्ग सापडला खरा. परंतु मुक्कामाचे (अधोरेखन माझे) काय? जैवतंत्रविद्येच्या माध्यमातून बर्गरची व पिझ्झांची विपुलता आली. जी. एम. फूड्समुळे भूकेवर विजय शक्य झाला. परंतु एक उष्मांक देणारे खाद्यान्न तयार करण्यापूर्वी ते दहा उष्मांक संपविते. जागतिक तापमानात वाढ करणारा हा ऊर्जेचा अपव्यय नव्हे काय?

या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी पुढील अखेरच्या प्रकरणाचा विचार करु.

प्रकरण 5 'वॉट डु अल गोर अँड मॉउंट पिनॅटुबो हॅव इन कॉमन?' हा या महत्त्वाच्या प्रकरणाचा विषय आहे. प्रकरणातील चर्चेकडे वळण्यापूर्वी वेदांतातील एका दृष्टांताचा उल्लेख करू. एकदा गुरूनी शिष्याला एक पक्षी (पर्यावरण संवर्धनाचा) दिला. कोणीही पाहाणार नाही अशा ठिकाणी मारुन टाक. अशी शिष्याला आज्ञा केली. शिष्य पक्षी घेवून जंगलात गेला. कारण तेथे पक्षी मारताना कोणी पाहाणार नव्हते. तो पक्षाची मान कापणार इतक्यात त्याच्या लक्षात आले की 'मी हे कृत्य पाहात आहे.' त्याने पक्षी मारण्याचा बेत बदलला. कारण कोणीही पाहात नसताना 'अगदी स्वतः देखील पर्यावरण संवर्धनाचा पक्षी मारता कामा नये' मीच माझा स्वतःचा 'फौजदार' होणार.

आज हवामान बदल, जागतिक तापमान व पर्यावरण ऱ्हास यांविषयी भरपूर संशोधन झाले

आहे. राजेंद्र पचौरी म्हणतात की, वाढणाऱ्या तापमानाने मानव जातीच्या अस्तित्वापुढे प्रश्नचिन्ह उभे केले आहे. म्हीरवोल्ड (Myhrvold) सारखे आंतरराष्ट्रीय ख्यातीचे पर्यावरण तज्ज्ञ युक्तीवाद करतात की दगडी कोळसा स्वस्त व विपुल असलेल्या आफ्रिका खंडातील देशांनी कोळशा शिवाय वीज निर्मिती करणे ही एक 'आर्थिक आत्महत्या' आहे. परंतु म्हणून त्या देशांच्या किती सरकारांनी कोळशावर चालणारी औष्णिक वीज निर्मिती केंद्रे सुरु केली?

वरील एक दृष्टांत व दोन तज्ज्ञांची विधाने यांच्यावरुन आपल्या ध्यानात आले असेल की, आज पर्यावरण समतोलाविषयी माहिती असणे महत्त्वाचे आहेच, परंतु, त्या दिशेत प्रत्येकाने स्वतः कृती करणे जास्त महत्त्वाचे आहे. एवढया प्रास्ताविकानंतर आता आपण प्रकरणाकडे वळू.

44 पृष्ठांच्या या प्रकरणात मागील जवळजवळ तिनशे वर्षांतील पृथ्वीच्या हवामान बदलांचा धावता आढावा घेण्यात आला आहे. पूर्वी शीत हवामान ही समस्या होती. आज तिची जागा वाढत्या तापमानाने घेतली आहे. शास्त्रविषयक राष्ट्रीय प्रबोधिनीच्या (National Academy of suienes) अहवालावर आधारित लेख न्यूज वीक नियतकालिकात 1975 च्या दरम्यान प्रसिद्ध झाले. त्या लेखांचा हवाला देवून लेखक वसुंधरेच्या घटणाऱ्या तापमानाकडे वाचकांचे लक्ष वेधतात. वसुंधरेला भेडसावणाऱ्या या 'शीत परिणामाचा' (cooling effect) कृषीवर प्रतिकूल परिणाम होत असे. पिके गोठली जात. कृषी हंगामाच्या कालमानात घट होई. नक्त परिणाम म्हणजे कृषी उत्पादकतेत घट. अशा शीत परिणामाचे (तापमान घटीचे) प्रमुख कारण म्हणजे वारंवार पर्वत व डोंगर फोडून बाहेर पडणाऱ्या १५-२० मीटर उंचीच्या ज्वाला व त्यामुळे गंधक द्विप्राणिदचे (Sulfur di-oxide) वातावरणात मिसळणारे लोळ. आजही असे स्फोट होतात. परंतु शीतगृह वायूंचा वेग व श्रेणी त्या शीत परिणामावर मात करतात. आज जागतिक तापमानात सतत वाढ होत आहे. विविध प्रकारच्या प्रदूषणांमुळे पर्यावरणाचा समतोल प्रतिकूल होत आहे. कोण आहे या प्रदूषणांचा खलनायक? काय आहे प्रदूषण प्रक्रिया? प्रदूषण निर्मिती प्रक्रियेचे स्पष्टीकरण करताना लेखक म्हणतात, ''बरेच प्रदूषण ही आपल्या सेवनाची प्रतिकूल बाहयता (Negative externality) आहे, हे ध्यानात घ्या (पृ.203) काय आहे ही प्रतिकूल बाहयता? कडक उन्हाळयाचे दिवस आहेत. जॅक स्वतःच्या गाडीतून घरी परत येतो. जोडे व मोजे काढतो वातानुकुलन यंत्र चालू करतो. त्याच्या गाडीतून हवेत मिसळणारे अपायकारक उत्सर्जन, घरी वातानुकूलन यंत्रासाठी त्याने वापरलेल्या विजेचा उत्पादन परिव्यय आणि त्या उत्पादनासाठी वापरण्यात आलेल्या निविष्टींच्या ज्वलनातून तापमानात पडणारी भर जॅकने दिलेल्या वीज किंमतीशी कोठे ताळमेळ लागत नाही.

यावर उपाय काय? गाडीचा वापर करावयाचा नाही? वातानुकूलन यंत्राचा वापर करावयाचा नाही? लाल मांसजन्य व प्रक्रिया केलेल्या खाद्यान्नाऐवजी (असे एक उष्मांक देणारे खाद्यान्न जवळजवळ दहा उष्मांक संपविते.) पालेभाज्यांचे सेवन वाढवावयाचे? आठवडयातून एक दिवस सायकलींचा वापर करावयाचा? इंधनाची बचत करण्यासाठी कार्यालयात न जाता घरी सुट्टी भोगावयाची? (जसे 'ॲनिमल फार्म' मध्ये 'नेपोलियनने' इतर प्राण्यांसाठी तेलाची बचत करण्यासाठी कंदीलांचा वापर करण्यास सक्त मनाई

केली.) मग त्या दिवसाच्या प्रमाणात जी.डी.पी. मध्ये होणाऱ्या घटीची भरपाई कोणी व कशी करावयाची? ज्ञानदेव एका ठिकाणी म्हणतात त्याप्रमाणे बैल विकला व गोठा केला, असा तर हा सारा प्रकार नाही ना? असे पुस्तकात उल्लेख केलेले व उल्लेख न केलेले विविध प्रश्न निर्माण होतात.

अशा परिस्थितीत जरूर काही उपाय आहेत. माणसांच्या कृतीमधून तापमानात वाढ होत असली, तरी त्या माणसानांच शोधकतेची सर्जनशीलतेची देणगी देखील लाभली आहे. एक, शक्य झाल्यास प्रदुषणाला अटकाव करणे. दोन,ते शक्य नसेल,तर प्रदूषणाची पूर्णपणे अंशतः भरपाई करणे, पुस्तकात या सर्व उपायांचा कमी – जास्त प्रमाणात विचार केला आहे. त्या सर्वांचा येथे विचार करण्याचे कारण नाही. शिवाय, बऱ्याच उपायांची वारंवार होणारी चर्चा विशिष्ट पुस्तकांत व अभ्यासांत सहजपणे उपलब्ध होवू शकते. म्हणून पुढील परिच्छेदांत तापमान,प्रदूषण यांच्या संबंधात (जे नवीन संशोधन) जे इतरत्र सहजपणे उपलब्ध नाही, त्या अनुषंगाने विचार केला आहे. दुसऱ्या शब्दात केन कॅल्डीरा व पॉल कृट्झन या विख्यात पर्यापरणतज्ज्ञांच्या पुढील चर्चा योगदानापुरतीच मर्यादीत केली आहे.

**कॅल्डीरा :**

सन 2007 चे शांतता नोबेल पारितोषिक कॅल्डीरा व अल गोर यांना विभागून देण्यात आले. त्यांच्या योगदानानुसार कर्बाम्ल वायु (Co2) वाढत्या तापमानाचा खरा खलनायक नाही. कर्बाम्ल वायुत दोन टक्के वाढ केली असताना पृथ्वीवरील किरणोत्सर्जनात तो 2 टक्क्यापेक्षा अल्प प्रमाणात शोषला जातो. वनस्पती हवेतून कर्बाम्ल घेतात. जमीनीतून पाणी घेतात. म्हणून वृक्ष हे पर्यावरणीय शाप होत. कर्बाम्ल वायूत दोन पट वाढ केली असताना व, पाणी व अन्य पोषक द्रव्यासारख्या विषिष्टीचे प्रमाण स्थिर असताना, वनस्पतीच्या वृध्दीत घसघसीत 70 टक्के भर पडते. कृषी उत्पादकतेसाठी हे एक वरदान आहे. थोडक्यात, वृक्ष लागवड करणे म्हणजे प्रतिकूल तापमान जास्त प्रतिकूल करणे. कारण वृक्षांची घनदाट पाने गवतापेक्षा जास्त सूर्यप्रकाश शोषून घेतात. म्हणून तापमानाचे नियंत्रण करण्यासाठी वृक्षांपेक्षा गवताची लागवड जास्त चांगली असते.

अशा प्रकारे, कॅल्डीरा यानी त्यांच्या अभ्यासात प्रस्थापित सत्यांना आव्हान देणारे निष्कर्ष काढले प्रकरणाच्या शीर्षकात ज्या 'मॉउंट पिनॅटुवो' घटनेचा उल्लेख आहे. तिच्यावर आधारीत प्रयोगाविषयी देखील कॅल्डीरा यानी आपला विरोध नोंदविला. आपण पाठीमागे उल्लेख केल्याप्रमाणे ती घटना 1991 मध्ये घडली. मॉउंट पर्वतातील ज्वालामुखी जिवंत झाला. आकाशात 15-20 मीटर उंचीच्या ज्वाला भडकल्या. पृथ्वीच्या वातावरणीय स्तरावर धुराचे लोळ निर्माण झाले. हे धुराचे लोळ म्हणजेच गंधक वायुचे ढग. त्यामुळे पृथ्वीवर 'शीत परिणाम' निर्माण झाला. तापमानात लक्षणीय घट झाली. त्याचा पूर्वी उल्लेख झाला. येथे ध्यानात घ्यावयाची गोष्ट अशी की, पृथ्वीवर नियंत्रण कक्ष कार्य करत आहे. त्याला एक नळी जोडली आहे. तिच्या दुसऱ्या टोकातून पृथ्वीच्या वातावरणीय स्तरावर गंधक वायूचे पृथ्वीवरील नियंत्रण कक्षातून प्रक्षेपण करावयाचे. या प्रयोगाने पृथ्वीवरील तापमान घट करणे शक्य होवू शकते. अर्थात, त्यासाठी मोठा परिव्यय करावयाचा आहे. पॉल कृट्झन व इतर पर्यावरण तज्ज्ञांनी या परिव्ययाचे अंदाज दिले आहेत. त्यांचा असा दावा आहे की,त्या

परिव्ययापेक्षा त्याचे तापमान घटीचे फायदे भारी आहेत. या प्रयोगाला निसर्गप्रेमी कॅल्डीरा यानी विरोध केला. त्यांचा असा युक्तिवाद आहे. गंधकाचे इंजेक्शन देवून पृथ्वीच्या वातावरणात गंधक वायू निर्मितीचे हे कृत्य (प्रयोग खर्चिक (अधार्मिक व अव्यवहार्य आहे) पृ.19)

**पॉल कृट्झनः**

निसर्गवादी पर्यावरणतज्ज्ञ केन कॅल्डीरांचा गंधकाचे इंजेक्शन देवून वातावरणात गंधक वायू सोडण्याच्या प्रयोगाला विरोध होता. त्या विरोधातून तो प्रयोग पुढे नेण्यास ज्या हवामान शास्त्रज्ञांना ऊर्जा मिळाली त्यांचे नाव आहे पॉल कृट्झन. 1995 चे वातावरणातील शुद्ध, ताज्या हवेचे प्रमाण घटण्याविषयीच्या संशोधनासाठीचे नोबेल विजेते शास्त्रज्ञ. 2006 मध्ये 'क्लायमेट चेंज' नियतकालिकात शोधनिबंध प्रसिध्द झाला. त्यात वातावरणात सोडण्यात येणाऱ्या हरितगृह वायूचे प्रमाण घटविण्यात आलेल्या अपयशाबदल त्यानी खंत व्यक्त केली आणि त्यावेळीच गंधकाचे इंजेक्शन देवून तापमान वाढीला अटकाव करण्याच्या प्रयोगाला जास्त चांगला पर्याय उपलब्ध नाही असा अढळ निर्धार त्यानी व्यक्त केला. त्यांच्या 'भूअभियांत्रिकी (Geoengineering) संशोधनाला काही पाखंडीनी (Sceptics) विरोध केला. वातावरणातील शुध्द व ताज्या हवेचे (197) परंतु कृट्झन यानी विरोधकांचे सौम्य शब्दात समाधान केले. ते म्हणाले की, त्यांच्या संशोधनाने वातावरणातील शुद्ध हवेचे प्रमाण खरोखर घटलेच तर गंधक इंजेक्शनचा प्रयोग थांबविणे शक्य आहे. जेणेकरुन काही वर्षांतच पृथ्वीचे वातावरण पूर्वपातळीवर येईल.

**अल गोर व पिनॅटुबो (तुलना):**

प्रकरणाच्या शेवटी तापमान कमी करण्याच्या दृष्टिकोनातून अल गोर व पिनॅटुबो घटना यांच्यात कोणत्या बाबतीत सारखेपणा आहे? या शीर्षकातील प्रश्नाला लेखकांनी दिलेल्या उत्तराचा गोषवारा पुढे दिला आहेः पृथ्वीच्या तापमानात घट करुन तिला थंड करण्याच्या बाबतीत गोर प्रतिष्ठान व गंधक इंजेक्शन प्रयोग यांच्यात मतैक्य आहे. परंतु त्यासाठी करावयाच्या परिव्ययाच्या पद्धती दोन टोकाच्या आहेत. गोर प्रतिष्ठानचा प्रमुख भर लोकात तापमानाविषयी सजगता निर्माण करण्यावर आहे. उलट गंधक इंजेक्शनवाद्यांचा असा युक्तिवाद आहे की कर्बाम्ल वायुत घट करुन तापमानात घट करणे चूक आहे. त्याचे स्पष्टीकरण देताना ते म्हणतात की, मुळात हरितगृह उत्सर्जनामुळे वायुमुळे तापमानात पडणारी भर नगण्य आहे. अर्थात गंधक इंजेक्शनचा प्रयोग परिपूर्ण आहे, असे नाही. परंतु, पुढे पुढे गोर यानी त्या प्रयोगाला तत्वतः पाठिंबा दिला. फरक इतकाच की गंधक इंजेक्शन प्रयोगासाठी नवीन व उंच नळयांचा वापर करण्याऐवजी सध्या आस्तित्वात असलेल्या कोळशापासून वीज निर्माण करणाऱ्या औष्णिक केंद्रांच्या चिमण्यांची (धुराडी) उंची वाढविण्याची त्यानी पुस्ती जोडली.

**उपसंहारः** 'मंकीज आर पिपल टू' या उपहासगर्भ गोष्टीने प्रयोगाने पुस्तकाचा बोलका उपसंहार करण्यात आला आहे. येल विद्यापीठातील कीथ चेन (Keith Chen) या अर्थशास्त्राच्या सहायक प्राध्यापकाने दुसऱ्या मानसशास्त्रज्ञांच्या मदतीने कॅप्युचिन जातीच्या सात माकडांवर (4 नर व 3 माद्या) प्रयोग केला. लेखकांनी त्या प्रयोगाचे कथन केले आहे. त्या प्रयोगाचा गोषवारा पुढे दिला आहे.

स्मिथ यानी वस्तू विनिमयाची जागा

घेणाऱ्या पैशाचे महत्त्व विशद केले. त्या बदलाचे वैशिष्ट्य स्पष्ट करताना स्मिथ यांनी म्हटल्याप्रमाणे हा बदल केवळ मनुष्यप्राण्यापुरता मर्यादित राहिला. चेन यांना व पर्यायाने लेखकांना देखील ते खटकले आणि स्मिथ यांचा दावा खोडून काढण्यासाठी चेन यांनी प्रयोगाचा प्रपंच केला.

त्यासाठी त्यांनी चलन म्हणून चांदीच्या एक इंच व्यासाच्या व मध्यभागी छिद्र असलेल्या चकत्यांचा वापर केला. माकडांचे खाद्य म्हणून द्राक्षे, सफरचंद, इत्यादी फळांचा उपयोग केला. त्यांच्यासाठी एक निवासासाठी मोठा व त्यातच दुसरा प्रयोगासाठी छोटा असे दोन पिंजरे तयार करण्यात आले. प्रोत्साहन-प्रतिसाद पद्धतीचा उपयोग करुन चेन व त्यांच्या सहकाऱ्यांनी माकडांना पुढील प्रमाणे विद्या शिकविली व त्यांच्या वर्तनात अपेक्षित बदल घडवून आणण्यात चेन यशस्वी झाले. (अ) काही महिन्यांच्या सरावाने नाणे व खाद्यान्नाची देवघेव (Exchange) करण्याची गरज माकडांच्या ध्यानात रुजली. (ब) प्रयोगाच्या दुसऱ्या टप्प्यात खाद्यान्नाच्या किती मात्रेसाठी किती नाणी द्यावी लागतात हे विनिमय गुणोत्तर (किंमत). त्यांना अवगत झाले या टप्प्यात खाद्यान्नाची किंमत वाढली. त्यावेळी माकडांनी त्याची खरेदी कमी केली. (अर्थशास्त्रातील मागणी -पुरवठा या मूलभूत नियमानुसार माकडांच्या वर्तनात बदल होवू लागले.)

आतापर्यंतचा प्रयोग चेन यांच्या अपेक्षेप्रमाणे पार पडला. पुढे एके दिवशी अनपेक्षित घडले. नाणी व खाद्यान्न मात्रा यांचा देवघेव पर माकडांच्या मनात पक्का बिंबला. एके दिवशी ट्रे मध्ये नेहमी प्रमाणे सर्व 12 चकत्या नाणी ठेवून ट्रे पिंजऱ्याच्या प्रयोग दालनात सरकविण्यात आला. परंतु त्या दिवशी ट्रेमधील नाण्यांचा खाद्यान्नासाठी वापर न करता माकडांनी ती नाणी पिंजऱ्यात इतस्तत: फेकली. त्या नाण्यांचा मागे सर्व माकडे धावू लागली. पिंजऱ्यात गोंधळ सुरु झाला.(जसा गोंधळ बँक चोरीच्या वेळी निर्माण होतो.) थोडया वेळाने चेन व त्यांच्या सहकाऱ्यांनी पिंजऱ्यात प्रवेश केला. ते जमिनीवरील नाणी गोळा करु लागले. एव्हाना त्या नाण्यांना देव-घेव मूल्य प्राप्त झाल्याची माकडांची खात्री झाली होती. कदाचित त्यामुळे ती चेन व त्यांच्या सहकाऱ्यांविषयी काहीशी आक्रमक दिसली. म्हणून चेन व सहकाऱ्यांनी त्यांना खाद्यान्न देण्याची तयारी दर्शवली. जेणेकरुन माकडांनी सर्व नाणी घेवू नयेत म्हणून लेखकाच्या मतानुसार मनुष्याने माकडांना दिलेली ती 'लाच' होती. इतक्यात आणखी एक नवल घडले. एका नर माकडाने जमिनीवरील एक नाणे उचलले, व ते मादी माकडाला दिले. आणि त्याच्या बदलात मादी व नर यांचा शरीरसंयोग सुरु झाला. या अनपेक्षित घटनेला लेखक 'माकडातील वेश्या व्यवसाय' हे नाव देतात.

येथे प्रयोग थांबविण्यात आला. प्रयोगाच्या माध्यमातून माकडांच्या पिंजऱ्यात पैशाची मात्रा लागू केल्यामुळे अपेक्षित घटनांबरोबर काही अनपेक्षित घटना घडल्या. जर सर्व कॅप्युचिन माकडांच्या बाबतीत पैशाची थेट मात्रा लागू केली, तर कदाचित कॅप्युचिन माकडांच्या संरचनेला धोका पोहोचेल, असे लेखकांचे मत आहे. म्हणजेच माणसांप्रमाणे माकडांतील लाचखोरी, माकडांतील वेश्या व्यवसाय, माकडांतील खूनी माकडांतील दहशतवादी, माकडांतील प्रदूषक तयार होतील. आणि मानवी समाजाप्रमाणे माकडांच्या भविष्यातील पिढयांना अकारण या प्रश्नाचे निवारण

करण्यासाठी साधनसंपत्तीचा अपव्यय करावा लागले. या उपहासगर्भ भाष्याने पुस्तकाचा उपसंहार करण्यात आला (पृ 212-15) म्हणून अखेरीला पुस्तकाच्या आपल्या समारोपाकडे वळू.

**समारोपः** अधिअपसामान्य अर्थशास्त्र हे पुस्तक लिहून लेबिट व डबनर यांनी अर्थशास्त्राचे एक नवे दालन खुले केले. निदान अशी एक ताबडतोबीची प्रतिक्रिया निर्माण झाली. आज जवळजवळ एका वर्षानंतर त्या प्रतिक्रियेचे तरंग सागराच्या किनाऱ्याला धडक मारलेल्या लाटेप्रमाणे सागराच्या पाण्यात विरल्यासारखे वाटतात. खरे तर सुपर फ्रीकॉनॉमिक्सने आर्थिक विश्वात भय व विषाद निर्माण केला. भाकित करणे अर्थशास्त्राच्या प्रांतात बसत नाही. वास्तव आर्थिक विश्व काय आहे त्याचे स्पष्टीकरण करणाऱ्या व अर्थशास्त्रापेक्षा निराळ्या अशा आर्थिकदृष्टीकोनावर लेखकांनी लक्ष केंद्रीत केले. ही पुस्तकाची जमेची बाजू म्हटली पाहिजे. परंतु अर्थव्यवस्थेतील विविध, स्वतंत्र व व्यष्टी खेळांडूवर (Players) लक्ष केंद्रित करताना अर्थव्यवस्था व भाव फुगवटा यांची समष्टी चर्चा 'निर्मोल' (Worthless,P.16) आहे, असे लेखकांनी विधान केले आहे. अशा साहसी विधानाची सविस्तर चर्चा लेखकांकडून अपेक्षित आहे सहजपणे जबाबदारी टाळता येणार नाही. आणखी एक जमेची बाजू. वेश्या व्यवसायाच्या संदर्भात लेखक म्हणतात त्याप्रमाणे विधीमंडळाच्या कायद्यांपेक्षा अर्थशास्त्रातील मागणी पुरवठयाचे कायदे 'नियम' जास्त 'बलवत्तर' असतात. आतापर्यंतच्या चर्चेच्या आधारे येणाऱ्या आणखी एका निष्कर्षा विषयी दोन शब्दपुस्तकात एकाच विषयावर सखोल चर्चा नाही. तो त्या पुस्तकाचा हेतूही नाही. एकूण पाच प्रकरणे व उपसंहार यांच्यापैकी तिसऱ्या प्रकरणात मानवरुप वर्तनाविषयी मार्मिक चर्चा करण्यात आली आहे. ती चर्चा करताना 'कैद्यांची शृंगापत्ति' (Prisoners dilemma) या संज्ञेचा संदर्भ देवून काही अहवाल व प्रयोग यांचे निष्कर्ष देण्यात आले आहेत. परंतु हे प्रकरण व त्याच विषयावरील न्यूमन व मॉर्गेन्स्टर्न यांचा 'दि थिअरी ऑफ गेम्स अँड इकॉनॉमिक बिहेविअर ' (1953) हा अभिजात अभ्यास यांची तुलना होवू शकत नाही. खरे तर, एक प्रकरण व एक पुस्तक यांच्या तील हा फरक आहे.येथे मला एकाला कमी लेखून दुसऱ्याचे महत्त्व वाढवावयाचे नाही. पुस्तक एकाच विषयाची सखोल चर्चा करणारे (Unifying subject) नाही, एवढया स्पष्टीकरणा पुरताच हा मुद्दा मर्यादीत आहे. आणि त्याच परिप्रेक्ष्यातून (Perspective) त्याच्याकडे पाहिले जावे. पाच प्रकरणांत पाच स्वतंत्र विषय हाताळणारे पुस्तक काहिसे कथासंग्रह स्वरुपाचे (Anecdotal) वाटते.

**संदर्भ :**

1.Quoted in Levitt Steven D. and Dubner Stephen J. Freakonomics, Penguin Books Ltd. P.47.
2. Ibid, P.210

[N.B. unless notified otherwise, the numbers into the brackets in the text of the article indicate the page numbers of the book under review.]